# प्रारंभिक शिक्षणातील पदविका

## (डी. ई एल. इडी)

## अभ्यासक्रम - 501

## भारतातील प्रारंभिक शिक्षण सामाजिक सांस्कृतिक स्वरुप

## गट - 2

## भारतातील प्राथमिक शिक्षण एक आव्हान – I


**NATIONAL INSTITUTE OF OPEN SCHOOLING**

A – 24/25, Institutional Area, Sector – 62, NOIDA

Gautam Buddha Nagar, UP – 201309

Website : www.nios.ac.in

# *गट* – 2

# *भारतातील प्राथमिक शिक्षण एक आव्हान* – I

**गट घटक**

**घटक 5 :** प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी कार्यनीती

**घटक 6 :** प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासंबंधी कार्यनीती II

**घटक 7 :** सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचे आयोजन व व्यवस्थापन

# पाठ्यक्रम


| अ.नं. | घटकांचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1. | घटक – 5 : प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी कार्यनीती | 1 |
| 2. | घटक – 6 : प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासंबंधी कार्यनीती – II | 20 |
| 3. | घटक – 7 : सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचे आयोजन व व्यवस्थापन | 31 |

# घटक 5 : प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी कार्यनीती

Notes

**घटक :**


5.0 प्रस्तावना

5.1 अध्ययन उद्दिष्ट्ये

5.2 प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण

5.3 विविध राज्यांमध्ये प्राथमिक शिक्षणांचे सार्वत्रिकीकरणाचे प्रकल्प

- 5.3.1 उत्तर प्रदेशामधील मूळ बेसिक शिक्षक प्रकल्प
- 5.3.2 बिहार मूलभूत शिक्षण प्रकल्प / योजना
- 5.3.3 लोक जंम्बिश
- 5.3.4 शिक्षा कर्मी योजना
- 5.3.5 प्राथमिक शिक्षणाशी संबंधित महाराष्ट्रात कार्यान्वित असलेल्या विविध योजना - एक केस अध्ययन
  - 5.3.5.1 सामाजिकरीत्या वंचित बालकांसाठी योजना
  - 5.3.5.2 मुलींसाठी असणाऱ्या योजना
  - 5.3.5.3 आर्थिकदृष्ट्या अप्रगत / मागे असणाऱ्या मुलांसाठी योजना
  - 5.3.5.4 दूरस्थ क्षेत्रात राहणाऱ्या मुलांसाठी योजना
  - 5.3.5.5 शाळाबाह्य बालकांसाठी योजना
  - 5.3.5.6 विशेष बालकांसाठीच्या योजना (विकलांग, देवदासी मुले)

5.4 डी. पी. ई. पी. (जिल्हा प्राथमिक शिक्षण परियोजना)

- 5.4.1 डी. पी. ई. पी चे उद्देश्य
- 5.4.2 डी. पी. ई. पी चे मुख्य घटक
- 5.4.3 डी पी. ई. पी अंतर्गत कार्यान्वित योजना
- 5.4.4 कार्यनिति अथवा क्रियाकल्प
- 5.4.5 सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणावर परिणाम

5.5 सारांश

5.6 शब्दार्थ / शब्दावली

5.7 संदर्भ ग्रंथ


## 5.0 प्रस्तावना

जसे तुम्ही जाणता की भारताध्ये प्राथमिक शिक्षण हा एक शैक्षणिक धोरण व नियोजन ठरविण्यासाठी महत्त्वपूर्ण घटक आहे. राज्य आणि केंद्र या दोन्ही सरकारचा विषय आहे. शिक्षण हा स्वातंत्र्योत्तर काळापासून शिक्षणाचे दायित्व हे राज्य सरकारकडे आहे. 1986 मध्ये केंद्र सरकारने देखील राष्ट्रीय शिक्षण नितीअंतर्गत बऱ्याच प्रायोजित कार्यक्रमांची सुरुवात केली की ज्याची फलप्राप्ती म्हणून प्राथमिक शिक्षणाची स्थिती विकसित झाली आहे. सध्या भारतातील विविध राज्यातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती काय आहे? या संदर्भात आपण सध्या कुठे आहोत? प्राथमिक शिणक्षात सुधारणात्मक बदल घडविण्यासाठी राज्य सरकारकडून कोणते प्रयत्न केले जात आहेत? वरील सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी या प्रकरणाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

Notes

याव्यतिरिक्त या प्रकरणात आपण अशा कार्यनीतींचा अभ्यास करणार आहोत की ज्यामुळे प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण प्रभावीपणे घडून आले.

## 5.1 अध्ययन उद्दिष्ट्ये :

**या प्रकारच्या अध्ययनानंतर तुम्ही**

- महाराष्ट्र राज्याच्या एका संशोधनानहंतर अध्ययनावरून, GER (Gross Enrollment Ratio) आणि NER (NET Enrollments Ratio) स्वरुपात आपल्या राज्याची प्राथमिक शिक्षणाची स्थितीवर अहवाल तयार करणे शक्य होईल.
- प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिककिरणासंदभात प्राथमिक शिक्षणाच्या विविध राज्यातील योजनांचा अभ्यास वा पडताळणी करता येईल.
- आपल्या राज्यातील विविध निती आणि योजना यांना अनुसरून प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकी करणाच्या प्रगतीचा अभ्यास करता येईल.
- प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी डी. पी. ई. पी द्वारे अवलंबविण्यात आलेल्या विविध कार्यनीतीची यादी व वर्णने लिहिता येतील.
- आपल्या राज्यातील विविध जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणावरील डी. पी. ई. पी. चा प्रभाव याची तुलना करता येईल.

## 5.2 प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण (यू. ई. ई.)

आपण सर्वांना एक गोष्ट नक्की माहिती आहे की, आपल्या राज्यात प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षण प्रदान करताना येणाऱ्या प्रत्येक अडचणींचा सामना करण्यासाठी कठोर परिश्रमांची आवश्यकता आहे.

बालकांना शाळेत जाण्यासाठी येणाऱ्या विविध अडचणी विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या आहेत. पुढे जाण्याअगोदर खाली बॉक्समध्ये दिलेल्या उदाहरणावर दृष्टिक्षेप टाकुयात.

प्रकाश गणेश पाटील हा डूमका जिल्ह्यातील मोहाडी या गावातील चवथीच्या वर्गातील एक विद्यार्थी आहे. त्याचा एक छोटा भाऊ दुसरीच्या वर्गात तर एक मोठी बहीण सहावीची विद्यार्थीनी आहे. प्रकाशचे वडील लोहार असून ते बैलांच्या पायाला नाल लावण्याचे काम करतात. ऊस तोड करणारे लोक ऊसाची वाहतूकीसाठी त्यांच्यासोबत बैल आणतात. त्यामुळे गणेशला खूप प्रमाणात काम मिळतात. सहा महिने तो ऊसतोड कामगारांसोबत राहतो. गणेश त्याच्या परीवारासाठी दिवाळी अगोदर प्रत्येक वर्षी कारखान्याच्या ठिकाणी येतो.

कारखान्याच्या ठिकाणी आल्यानंतर प्रकाश त्याचे शिक्षण चालू ठेवण्यासाठी जिल्हा परीषदेच्या शाळेत जाऊ इच्छितो. मात्र गावातील शाळेतून जिल्हा परिषदेच्या शाळेत जाण्यासाठी शाळेचा दाखला मिळविण्यासाठी येणाऱ्या प्रक्रियेतील अडचणींमुळे त्याचे दोन वर्षे वाया जातात. शेवटी...........

आता खालील प्रश्नांवर दृष्टीक्षेप करून अथवा तुम्ही काय करू शकता ते सांगा.

- प्रकाश विचार करत आहे की त्याने त्याचे शिक्षण बंद करावे आणि त्याच्या वडिलांच्या व्यवसायात त्यांना मदत करावी.
- तुम्ही प्रकाशच्या वडिलांना कशा प्रकारे मार्गदर्शन करू शकता की जेणेकरून प्रकाशचे शिक्षण चालू राहील.

या प्रकारच्या अडचणींच्या निरसनासाठी महाराष्ट्र सरकारने 2001 मध्ये उभारलेल्या बालकांचे शिक्षण मध्येच थांबू नये म्हणून 'साखर शाळा सुरू केल्या. या साखर शाळा पूर्ण वर्षभर चालत नाही. मात्र शैक्षणिक वर्षाच्या दुसऱ्या सत्रामध्ये चालतात. सामान्यपणे, शाळा ग्रीष्म ऋतूच्या सुट्यानंतर जून महिन्याच्या सुरुवातीला सुरू होतात. ऊस लागवडीच्या मोसमात ऊसतोड कामगार कारखाना क्षेत्रात जवळपास येवून राहतात की, जे ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यात सुरू होतात. या स्थानांतरणामुळे त्यांची मुले बरेच महिने शाळेत जाऊ शकत नाहीत. आणि पुढच्या वर्षी मार्च-एप्रिल महिन्यात जेव्हा ते आपल्या परीवारासोबत गावात परत येतात तेव्हा ते त्यांचे शिक्षण जेथे बंद केले होते तेथून पुढे-चालू ठेवू शकत नाहीत. त्यामुळे ते शाळा बाह्य होतात त्यांना गळती म्हणतात. त्यासाठी साखर शाळांमध्ये स्थानांतरण काळात (6 महिने) या बालकांसाठी साखर कारखान्याच्या आसपास त्यांच्या सोयीनूसारच्या सुविधाजनक वेळेत शाळा उपलब्ध करून दिल्या जातात. या शाळांना द्वितीय सत्र शाळा म्हटल्या जातात.

या अध्ययनाची फलप्राप्ती म्हणजे. आपण प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणाची व्याख्या खालील प्रकारे करू शकतो.

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण म्हणजे बालकांच्या विविध आवश्यकेनुसार आणि जागेनूसार सर्व ठिकाणी शिक्षणाची उपलब्धता करून देणे होय. भारतात शालेय शिक्षणाला मुख्यत: खालील स्तरांमध्ये वर्गीकरण करता येईल.



**ऊस क्षेत्रात साखर शाळा**

**बिन भिंतीची शाळा**

**पूर्व प्राथमिक शिक्षण :** पूर्व प्राथमिक शिक्षण वय 3 ते 6 पर्यंत

**प्राथमिक शिक्षण** : प्राथमिक शिक्षण वय 6 ते 11 पर्यंत (वर्ग I ते V पर्यंत)

: उच्च प्राथमिक शिक्षण वय 11 ते 14 (वर्ग IV ते VIII पर्यंत) वयापर्यंत.

**माध्यमिक शिक्षण** : माध्यमिक शिक्षण वय 15 ते 16 वयापर्यंत
(वर्ग IX ते X पर्यंत) वयापर्यंत

**उच्च माध्यमिक** : 17 ते 18 वर्ग (वर्ग XI व XII)

प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शिक्षणास प्राथमिक शिक्षण म्हणतात. प्राथमिक शिक्षण हे आपल्या शिक्षण प्रणालीच्या पिरॅमिडचे आधार स्तंभ आहे. ज्यावर दहाव्या पंचवार्षिक योजनेत सर्व शिक्षा अभियान द्वारे विशेष भर देण्यात आलेला आहे. सर्व शिक्षा अभियानामुळे प्राथमिक शिक्षणाच्या

सर्व क्षेत्रांमध्ये विकसित होण्यासाठी सुलभता प्राप्त झाली आहे. ज्यामुळे प्राथमिक शिक्षणाचा मार्ग सुगम बनला आहे.

**प्राथमिक शिक्षाचा सार्वत्रिकीकरणाचे घटक**

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणाची खालील प्रमाणे व्याख्या सांगता येईल.

प्रत्येक व्यक्तिला स्वत:ला सुशिक्षित करण्यासाठी शाळा आणि शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून देणे होय.

प्राथमिक शिक्षणाचे प्रामुख्याने तीन घटक आहेत ते पुढील 5.1 या आकृतीत दाखविलेले आहेत.




**आकृती 5.1**

- **सार्वत्रिक शैक्षणिक प्रवेश :**

  विद्यार्थ्यांसाठी शाळेची सुलभरीतीने उपलब्धी करून देण्यासाठी भारत सरकारने प्रत्येक किलोमीटर अंतरावर एक प्राथमिक शाळा स्थापन करण्याची योजना आखलेली आहे. शाळेद्वारा वर्षाच्या सुरुवातीला शाळेच्या अधिकार क्षेत्रात सर्वेक्षण सर्व कुटुंबांचे केले जाईल शाळेत येण्यास पात्र बालके आणि जे शाळेत जातच नाहीत अशा विद्यार्थ्यांची यादी करण्यात येईल की जेणेकरून या दोन्ही प्रकारच्या बालकांना शाळेत आणता येईल. जेव्हा शाळा सुरू होतील त्यावेळी एक आठवडा नावनोंदणी आठवडा म्हणून असावा यामुळे सर्व शाळेत येणाऱ्या पात्र बालकांचे १००% नावनोंदणी करणे शक्य होईल.

- **उपस्थिती व अवबोध :**

अधिकाधिक मुलांची नावनोंदणी करणे तसेच वंचित घटकातील मुलांची नावनोंदणी करणे अधिक कष्टाचे काम आहे हा अनुभव अधिक प्रमाणात येत आहे. तसेच 14 वर्ष वयाच्या सर्व बालकांना शाळेत ठेवणे अनिवार्य आहे. तसेच. बरीच अशी कुटूंब आहेत की ज्यांच्या मुलांना शाळेत टिकवून ठेवण्यासाठी दैनिक उपस्थिती मला, मोफत यात्रा पास, मोफत मध्यान्ह भोजन या सारख्या सोयीसुविधा दिल्या जातात. तसेच त्यांच्या उपस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी नवनवीन अध्ययन तंत्रांचा वापर केला जातो.

- **शिक्षणाची गुणवत्ता :**

शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये हे अपेक्षित आहे की, प्रत्येक बालकाला त्याच्या क्षमतेनुसार उच्चत्तम शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे की ज्यामुळे तो शिक्षणाची किमान पातळी प्राप्त करू शकेल. याबरोबरच मुलभूत सुविधांसारख्या जसे पिण्यायोग्य पाणी शौचालय, शिक्षक प्रशिक्षिण तसेच विद्यार्थी शिक्षक गुणोत्तर यामध्ये सुधारणात्मक बदल घडवून आणता येईल.

Notes

**क्रियाकल्प - 1**

कल्पना करा. की, एका शाळेत सजीद आणि त्यांची बहिण प्रत्येक शनिवारी अनुपस्थित असते आणि त्यासाठी ते त्यांच्या शिक्षकांना खोटी कारणे सांगतात. एक शिक्षक म्हणून त्यांच्या अनुपस्थितीची पडताळी करण्यासाठी तुमचे पहिले पाऊल काय असेल ?

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

## 5.3 विविध राज्यांमधील प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकी करणासाठीच्या प्रकल्प / योजना :

21 व्या शतकाच्या प्रारंभापूर्वीच भारत सरकारने 14 वर्ष वयापर्यंतच्या बालकांसाठी मोफत व सक्तिचे शिक्षण देण्याचे आश्वासन दिले आहे. हे आश्वासन राष्ट्रीय शिक्षण योजना (1986) तसेच राष्ट्रीय शिक्षण योजना आराखडा (1992) या अंतर्गत देण्यात आले होते. हा हेतू साध्य करण्यासाठी उपयुक्त कार्यक्रमांचे उपयोजन एका मिशनच्या रुपात केले गेले. ज्याचा हेतू हा की, योजनेतील सर्वांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण वय वर्ष 14 वर्षेपर्यंत करण्यात आले. यामध्ये हेतू, स्वरूप, उपयोजनाचे क्षेत्र, वेळ आणि निश्चित परीणामांची सीमा इ. गोष्टीचे निर्धारण करण्यात आले. या व्यतिरिक्त मापन योग्य निष्पत्तिचे स्पष्टीकरण केले गेले. तसेच प्रत्येक स्तरावर योग्य ती मदत देण्यात आली.

### 5.3.1 उत्तर प्रदेशातील मुळ / बेसिक शिक्षण योजना :

उत्तर प्रदेश सरकारने 1993 मध्ये जागतिक बँकेच्या बदतीने मूलभूत शिक्षण योजनेची सुरुवात केली. या योजनेचे नाव दिले ‘सभी के लिए शिक्षा परियोजना परिषद’ शिक्षण योजना परिषद नावाच्या संस्थेकडे सोपविण्यात आले.

- **योजनेचे उद्देश्य :**
  - शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण : या अंतर्गत दोन गोष्टी प्रामुख्याने मांडण्यात आल्या.
    - क) 14 वर्षे वयाच्या सर्व बालकांना प्राथमिक शिक्षणाची उपलब्धता
    - ख) जोपर्यंत बालक औपचारिक तथा अलौपचारिक रीत्या शिक्षण पूर्ण करत नाही. तोपर्यंत सार्वत्रिक सहभागित्व गरजेचे आहे.
  - तरुणांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम योजना
  - निम्नस्तर अध्ययन पातळीसाठी जागतिक संपादणूक कार्यक्रम योजना
  - महिला सबलीकरण तसेच शिक्षणात अधिकाधिक लैंगिक समानता
  - अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमाती यासाठी शैक्षणिक समान संधीची उपलब्धता
- **कार्यनीति :**
  - या योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे विविध कार्यनीति स्वीकारण्यात आल्या.
  - योजना बनविणे - नियोजन तसेच व्यावसायिक मदत देण्यासाठी जिल्हा स्तरावर एक मजबूत आराखडा तयार करण्यासाठी एक संघटना स्थापन करण्यात आली.
  - शिक्षणातील गुणवत्तेमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी पूर्व प्राथमिक अभ्यासक्रम, तसेच पाठ्यपुस्तकांचे पुर्नरचना सेवांतर्गत प्रशिक्षण, महिला व मुलींचे शिक्षण तसेच शालेय व्यवस्थापन मजबूत बनविणे.

Notes

- प्रतिकूल सुविधा क्षेत्रांमध्ये अधिकाधिक प्राथमिक शिक्षण तसेच उच्च प्राथमिक शाळा स्थापन करून 10 जिल्ह्यांमध्ये मूलभूत शिक्षण पद्धतीमध्ये सुधारणा करणे आणि वंचित असणाऱ्या बालकांसाठी अनौपरिक शिक्षणासाठी सुधारीत आराखडा कार्यान्वित करण्यासाठी समर्थन देणे.

- **क्रियाकल्प :**
  - संस्कृती तसेच संप्रेषणासंबंधी शैक्षणिक क्रिया कल्प
  - विज्ञान आणि पर्यावरण
  - सामाजिक न्याय भावनेची जाणीव निर्मिती
- **कार्यनीती :**

  या परिषदेचे क्रियाकल्प उत्तरांचलसहित उत्तर प्रदेशातील 63 जिल्ह्यामधील 10 निर्धारीत जिल्ह्यांमध्ये सकेंद्रित होते. या जिल्ह्यांमध्ये – वाराणसी, इलाहाबाद बांदा, इटावा, सीतापूर, अलीगढ, सहारनपूर, गोरखपूर, पौरी तसेच नैनीताल यांचा समावेश होता. 1993 पासून सुरुवातीला या योजनेचा कालावधी निर्धारीत 10 जिल्ह्यासाठी 5 वर्षे ठेवण्यात आला होता. परंतु. 2003 पर्यंत याचा विस्तार 17 जिल्ह्यात करणे असा होता.

### 5.3.2 बिहारमधील शैक्षणिक योजना :

या योजनेचा मुख्य हेतू राज्यातील शैक्षणिक गुणवत्ता सुधारणावर असून प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे असा होता. ही योजना उत्तर प्रदेशातील मूलभूत योजना तसेच तिला कार्यान्वित करणारी एजेंसीच्या उपलब्धीवर आधारित होती. अर्थातच बिहार शिक्षण योजनेचे उत्तर देखील उत्तर प्रदेश बेसिक शिक्षण योजनेलाच सोपविण्यात आले होते. ही योजना युनिसेफ भारत सरकार तसेच बिहार राज्य सरकार यांचे सहयोग निर्मित योजना होती. या योजनेचा विशेष भर हा समाजातील सुविधावंचित वर्गाचे शिक्षण जसे की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच महिलांवर होता. ही पहिली अशी योजना होती की ज्याचे वित्तीय प्रबंध राज्यात नसून बाहेरून होते. या योजनेच्या सुरुवात प्रथम रांची, रोहताश तसेच पश्चिमी चंपारण या जिल्ह्यांमध्ये करण्यात आली आणि नंतर 1992 -93 मध्ये याचा विस्तार अधिक चार जिल्ह्यामध्ये करण्यात आला.

- **या योजनेचे उद्‌देश्य :**
  - शिक्षणाचे असे सार्वत्रिकीकरण की, ज्यातून सर्व 14 वर्ष वयाच्या बालकांना शिक्षण तसेच अध्ययनाच्या न्यूनतम स्तराची प्राप्तीसाठीचा एक संयुक्त कार्यक्रम समजला जातो.
  - शिक्षण पद्धतीचे असे उद्‌बोधन करणे की ज्यामधून महिलांना समानता तथा सशक्तीकरण हेउद्‌देश्य पूर्ण होऊ शकतील
  - प्रौढ तसेच गौण जाती जमाती समुदायातील तसेच आर्थिकदृष्ट्या गरीब वर्गातील मुलांना समान शिक्षणाच्या संधी देण्यासाठी योग्य ते प्रयत्न करणे.
  - शिक्षणातील नावनोंदणी क्षमतेमध्ये वाढ करणे तसेच विशेषत: अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीमधील विद्यार्थी व मुलींमधील गळतीचे प्रमाण कमी करणे.
- **कार्यनीती :**

  या योजनेअंतर्गत खालील कार्यनीतींचा स्विकार करण्यात आला.
  - जवळजवळ 11,000 प्राथमिक तसेच उच्च प्राथमिक वर्गांची स्थापना
  - सुमारे 16000 अतिरिक्त शिक्षकांची भरती
  - नवनियुक्त शिक्षकांचे प्रशिक्षण
  - नवीन उभारलेल्या वर्गांमध्ये आवश्यक साधन सामुग्रीची तरतूद
  - नियोजन आणि कार्यवाहीमध्ये सहभाग

– महिला समक्षा घटकामध्ये कार्यवाही

- **क्रियाकल्प :**
  - – ग्रामीण शिक्षण समितिंचे नियोजन तसेच सामाजिक सहभाग वाढवून तळाच्या घटकापासून कार्यवाही करणे.
  - – एन. जी. ओ (Non Goverment Organization) यांच्या माध्यमातून अनौपचारिक शिक्षण
  - – राज्यस्तरीय कार्यशाळांचे आयोजन : संसाधन शिक्षक व प्राथमिक शिक्षक यांना प्रशिक्षित करणे.
  - – महिलांसाठी एका कोअर समूहाची राज्यस्तरावर स्थापना करणे.
  - – नावनोंदणी अभियान
  - – पोस्टर कार्यशाळा : ग्रामीण ग्रंथालयांचा विस्तार
  - – महिला समिक्षा : शाळांसाठी स्थानिक उत्तरदायित्वाची स्थापना करणे. पूर्ण बाल्यावस्थेची देखरेख आणि शिक्षण तसेच अनौपचारिक शिक्षण केंद्र, सहाय्यक शाळेतील नियोजनामध्ये सक्रिय सहभाग दाखविणे आणि ग्रामीण शिक्षण समितीमध्ये सहभागी होणे.
- **उपयोजन :**

जिल्हा किंवा राज्यस्तरावर नियोजन संरचना, महिला सबलीकरण, विस्तारित समुदाय संघटन, बेसिक शिक्षणात अधिकाधिक राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय आवड निर्माण करण्यासाठी संघटन इ. ची. स्थापना करणे, वर्गांची निवड, योजनेचे पर्यवेक्षण तसेच ग्रामीण स्तरावर योजनासंबंधी सूक्ष्म योजनांचे निर्धारण करण्यात आले.

ही योजना उत्तर प्रदेश बिहार मधील 12 जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आली.

### 5.3.3 लोक जम्बिश :

लोक जम्बिश, ज्याला सर्व शिक्षणाचे लोक अभियान समजले जाते. राजस्थान सरकारने ‘स्विडिश इंटरनेशनल डेव्हलपमेंट ॲथॉरिटी’ (SIDA) च्या सहयोगातून 1992 मध्ये सुरू केली.

या कार्यक्रमाचा मुख्य हेतू हा औपचारिक वा अनौपचारिक मार्गाने तसेच प्रत्यक्ष साक्षरतेच्या माध्यमातून संतोषजनक स्तरापर्यंत प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणाच्या हेतूला साध्य करणे आहे. याचा मुख्य भर हा मुलींची साक्षरता आणि विकास यावर आहे. साक्षरतेनंतर तसेच निरंतर शिक्षणासोबत लोक समुदायात सक्रियता येते.

- **योजनेचे उद्देश्य :**
  - – लोक संघटन आणि सहभागाच्या माध्यमातून वर्ष 2000 पर्यंत सर्वांसाठी शिक्षण उपलब्ध करणे
  - – मुली आणि महिला यांच्यावर विशेष लक्ष्य केंद्रित करून मुलींची नावनोंदणीमध्ये सुधारणा करणे.
  - – शिक्षणाला समानतेचे साधन बनवून महिला सशक्तीकरण करणे.
  - – महिला आणि पुरूष दोन्हींमध्ये 15 ते 35 वर्ष वयामध्ये 80 टक्के पर्यंत साक्षरता वाढविणे.
  - – अध्ययन प्रक्रियेमध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी प्रशिक्षण तसेच तांत्रिक संसाधने, सहाय्यक संरचना प्रणालीची निर्मिती करणे.
  - – जिथे माहितीच्या आकडेवारीचा संग्रह केला जातो. तंत्राचा वापर करणे की ज्यांचा प्रत्यक्ष संबंध त्या प्रक्रियेशी येतो, त्यामध्ये गुणात्मक सुधारणा घडवून आणणे.
- **मुख्य घटक :**
  - – कार्यक्रमांची सुरुवात करणे तसेच त्याचे नियोजन करण्यासाठी एक अशी स्वायत्ता संस्था निर्माण करणे, ज्यामध्ये सशक्त समिती असेल आणि त्यांच्याकडून प्रगतीचे पुनपरीक्षण करावे.

Notes

– ग्रामीण स्तरावर विद्यालयाचे मापन आणि सूक्ष्म योजना हे लोक जम्बिशच्या मुख्य संचालनात्मक हेतूचे सादरीकरण करतात. हे काम सामाजिक कार्येकर्ते, शिक्षक आणि लोक जम्बिशचे कार्यकर्ते यांच्याकडून शिक्षणाचे मूल्यमापन केले जाते. ज्यामुळे प्रत्येक बालकाची व्यक्तिगत प्रगतीची माहिती समजते.

- **कार्यनीती :**

– मूलभूत स्तरावर एक रचनातंत्र निर्माण केले जसे प्रेरक दल, भवन निर्माण समिती, ग्रामीण शिक्षण समिती, क्लस्टर, खंड, स्तरीय शिक्षण नियोजन समिती (Level management) आणि ब्लॉक स्टीयरींग समूह हे पाच जिल्ह्यांमध्ये विविध प्रयोगांतून कार्यक्रमासाठी सहाय्यता देत होते. तसेच त्यांचे नियोजन देखील करत होते.

– पाठ्यपुस्तकांचा विकास तसेच शिक्षकांना प्रेरणा यासाठी स्थानीक शिक्षक व शिक्षक विकास

– महिलां सहभाग वाढविण्यासाठी अध्यापिका मंच तयार करण्यात आला.

– सर्व स्तरावर कार्यकर्त्यांची संख्या वाढविण्यास आली जेणेकरून त्या क्षेत्रातील संपूर्ण जबाबदारी पूर्ण करता येईल.

– कलस्टर तथा खंड स्तरावर सर्व कार्यकर्त्यांची समीक्षा योजना मिटिंगचे / चर्चेचे आयोजन प्रत्येक महिन्याला केले जात होते. कारण त्यामुळे अगोदरच्या कामाचे पुनर्रपरीक्षण होऊ शकत असे आणि त्यावरून पुढील महिन्याच्या योजनेची कार्यवाहीची रुपरेषा ठरविण्यात येत असे.

– प्रवेशोत्सव : प्रवेशोत्सव एक अशी घटना आहे. की ज्या माध्यमातून बालकांमध्ये, शाळेमध्ये तसेच समुदायामध्ये सकारात्मक आणि सृजनात्मक वातावरणाची निर्मिती करता येईल.

- **क्रियाकल्प : या योजनेतील क्रियाकल्प खाली दिलेल्या सारणी 5.2 मध्ये दाखविले आहे.**

| | |
|---|---|
| आदिवासी बालकांसाठी वसतीगृह | हंगामी स्थलांतरीतांच्या आवश्यकतेनुसार तसेच जे शाळेपासून दूर ठिकाणी राहतात. |
| महिला शिक्षण विहार | 15 वयाच्या शाळाबाह्य मुलींसाठी निवासीय पाठ्यक्रम चालविण्यात येतो. ज्यामध्ये ग्रामीण भागातून आलेल्या मुलींना गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्यात येते. |
| बालिका शिक्षण विहार | 9 + वयाच्या शाळा सोडलेल्या मुलींसाठी 6 ते 8 महिने शिबीराचे ज्यामुळे मुलींना औपचारिक शिक्षणात पुन्हा सामिल करता येणे शक्य झाले. |
| मुक्तांगण | किशनगंज जिल्ह्यातील खंडेला येथील आदिवासी मुलांसाठी योजना |
| मदरसे | भरतपूर कॉमन ब्लॉकमधील मुसलमान मुलांसाठी हा कार्यक्रम चालवला होता. |
| सहज शिक्षण केंद्राचे संस्थानीकरण | हा कार्यक्रम काम करणाऱ्या बालकांच्या गरजांची पूर्तीसाठी एक अनौपचारिक प्रकारचा शिक्षण कार्यक्रम आहे. |
| विद्यालयी स्वास्थ्य कार्यक्रम | या कार्यक्रमाचा हेतू शाळेतील बालकांना आरोग्यसंबंधी जाणीवजागृती निर्माण करणे असे होते. |
| आंगणवाडी केंद्र | हा पूर्व प्राथमिक शाळेला मजबूती देण्यासाठी तसेच याचा संबंध प्राथमिक शिक्षणाला जोडण्याचा कार्यक्रम आहे. उत्तर प्रदेशद्वारा आयोजित एन.जी.ओ. विहान ने 245 आंगणवाड्यांचे उत्तरदायित्व घेतले होते. |

**सारणी 5.2**

Notes

### 5.3.4 शिक्षाकर्मी योजना :

शिक्षाकर्मी योजना एक शैक्षणिक कार्यक्रम असून राजस्थान सरकारने 1987 पासूश्न स्विडिश इंटरनॅशनल डेव्हलपमेंट ॲथॉरीटी च्या सहाय्याने शिक्षाकर्मी बोर्डीच्या माध्यमातून चालवले जाते.

या योजनेअंतर्गत शिक्षकांच्या अनुपस्थिती वर लक्ष दिले गेले की जे प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणासाठीचा मुख्य अडथळा होता. प्रथमिक शाळेच्या शिक्षकाला एक शिक्षकी शाळेची स्थापना करून त्याच्या जोडीला दोन स्थानिक निवासी, ज्यांना शिक्षाकर्मी म्हटले गेले त्यांना मदतीसाठी दिले गेले.

स्थानिक निवासी व्यक्ति (शिक्षाकर्मी) यांची नियुक्तीसाठी शिधरकासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रतेची आवश्यकता मुख्य न मानता नियुक्ती नंतर त्यांना योग्य ते प्रशिक्षण तसेच शैक्षणिक मदत देण्यात आणि जेणेकरून ते एक शिक्षक म्हणून प्रभावी काम करू शकतील.

- **योजनेचे उद्देश्य :**
  - प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणाच्या एक संयुक्त कार्यक्रम समजला गेला ज्या अंतर्गत 6-14 वर्ष वयाच्या सर्व बालकांसाठी प्राथमिक शिक्षणाची उपलब्धता तसेच अध्ययनाची निम्नतम स्तरांवर सार्वत्रिक आकलन समाविष्ट असेल.
  - शिक्षण प्रणालीच उद्‌बोधनातून महिलांची समानता आणि सशक्तीकरणाचा हेतू साध्य करता येवू शकेल.
  - प्रौढ तसेच अल्पसंख्यांक नृजातीय सामाजिक वर्ग, आणि समाजातील गरीबांच्या मुलांना शिक्षणाच्या समान संधी प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करणे.
  - नावनोंदणीतील मुख्य समस्या तसेच मुलांची गळतीचे प्रमाण (प्रामुख्याने मुली) या समस्यांवर उपाय शोधणे.
- **कार्यनीती :**

  या योजनेतंर्गत खालील कार्यनीतींचा अवलंब करण्यात आला.
  - शिक्षाकर्मी योजनेच्या पुनपरीक्षणासाठी SIDA द्वारा एक मॉनीटरींग मिशन नियुक्त वर्षातून दोनदा योजनेच्या प्रगतीची पडताळणी करेल.
  - प्रत्यक्ष अनुभव आणि एकमेकांच्या सहमतीने घेतलेल्या निर्णयावर आधारित नवीन योजनेचे निर्धारण केले गेले.
  - अधिकाधिक विकेंद्रिकरण तसेच समुदायाचे सहभागित्व
  - शिक्षणाच्या दृष्टीने लिंग तसेच, सामाजिक संवेदनशीलतेचे समर्थन
- **कार्यान्वियन / उपयोजन :**

  योजना निर्देशकासोबत राजस्थान सरकार तसेच स्वयंसेवी संस्था एकत्र येवून काम करत आहेत ज्यामुळे शिक्षाकर्मींचे प्रशिक्षणाचे नियोजन केले जाते. कार्यक्रमांचे आयोजन तसा संचालन केले जाते. या व्यतिरिक्त शिक्षाकर्मींच्या प्रशिक्षणाचे निरीक्षण देखील केले जाते.

  या योजनेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी ग्रामीण भागातील सुविधावंचित वर्गाच्या गरजांच्या पूर्तीसाठी केलेल्या शैक्षणिक प्रयत्नांना पंचायत समिती, शिक्षाकर्मी सहयोगी विशेष विशेषज्ञ स्वयंसेवी संस्था आणि ग्रामीण समुदायांचे समर्थन करणे अनिवार्य आहे.
- **क्रियाकल : या योजनेचे मुख्य क्रियाकल्प सारणी 5.3 प्रमाणे स्पष्ट करता येतील.**

| | |
|---|---|
| डे- केंद्र | जेव्हा प्राथमिक शाळा ही शिक्षाकर्मीकडून चालविली जाते तेव्हा त्यास डे-केंद्र हे नाव दिले जाते. |

Notes

| | |
|---|---|
| परिहार पाठशाला | जेव्हा काही कारणास्तव मुलं हे केंद्रावर शिकण्यासाठी येवू शकत नसतील आणि ते रात्रीच्या वेळी येवू शकत असतील तर त्यास परिहार पाठशाला म्हटले जाते. |
| महिला प्रकाशन केंद्र | या योजनेचा भर शिक्षाकर्मी म्हणून महिलांची भरती करणे आणि महिला शिक्षा कर्मी प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यावर होता या केंद्रांना महिला प्रकाशन केंद्र म्हणतात हा स्थानिक महिलांना शिक्षा कर्मीचे प्रशिक्षण देत असे |
| संघटित उपागम | एका सर्वेक्षणानूसार हे स्पष्ट झाले आहे कि. 14 वर्ष वयाचे घाटोल व बलोत्रा ब्लॉकमध्ये 6% बालके शारीरिक अंपगत्वाने पिडित असतात. त्यांची काळजी घेण्यासाठी शिक्षाकर्मी योजनांमध्ये या मुलांचा समावेश करण्यात आला. |

**सारणी 5.3**

- **क्रिया कल्प 2**
  1. आपल्या भागातील कोणत्याही एका संस्थेला भेट द्या की जी शाळाबाह्य मुलांसाठी कार्य करत आहे. खालील दिलेल्या मुद्द्यांच्या आंधारे अहवाल तयार करा.
     - सामान्य सूचना : संस्थेचे नाव, पत्ता, फोन नं, कार्यक्षेत्र सीमा, विद्यार्थी, राज्यस्तरीय / राष्ट्रस्तरीय आहे का / नाही.
     - उद्देश्य आणि अन्य क्रियाकल्प
     - नावनोंदणी उपस्थिती, अवबोधासाठी / अध्ययनासाठी करण्यात आलेले प्रयत्न

### 5.3.5 प्राथमिक शिक्षणाशी संबंधित महाराष्ट्रात कार्यान्वित असलेल्या योजना – एक केस स्टडी

#### 5.3.5.1 सामाजिकरीत्या वंचित बालकांसाठी योजना :

सर्वांसाठी प्राथमिक शिक्षण ही भारतातील राज्यात योजना राबवताना महाराष्ट्रातील चित्र कसे आहे ते पाहू.

- दहावीपर्यंत शिष्यवृत्ती
- मोफत गणवेश आणि पुस्तके
- वसतीगृह
- सरकारी आणि खाजगी संस्थांची वसतीगृहे
- एन्. सी. ई. आर. टी द्वारे स्थापित राष्ट्रीय प्रज्ञाशोध बोर्डाकडून अनुसूचित जाती / जमातींच्या मुलांना माध्यमिक शिक्षण पूर्ण आल्यावर शिष्यवृत्ती दिली जाते.
- उपस्थिती भत्ता
- आश्रमशाळा
- बुकबॅक योजना

#### 5.3.5.2 मुलींसाठी योजना :

कुटूंब तसेच समाजासाठी मुलांना शिक्षणाचे महत्त्व या गोष्ट लक्षात ठेवून राज्यशासनाने यांच्या शिक्षणासाठी विविध योजनांची सुरुवात केली आहे.

- **उपस्थितीसाठी भत्ता** – वर्ग 1 ली ते 5 वी पर्यंत गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी वंचित वर्गातील सर्व मुलींसाठी दरदिवशी एक रूपया मला दिला जातो. परंतु ती शाळेमध्ये 75% शाळेच्या कामाच्या दिवशी उपस्थित असली पाहिजे.

- **अहिल्याबाई होळकरद्वारे मुलींसाठी मोफत प्रवास पास योजना –** 1997 मध्ये सरकारने ग्रामीण भागातील मुलींसाठी मोफत प्रवास पास योजनेची सुरूवात केली जेणेकरून मुली शिणापासून वंचित राहणार नाहीत. ही योजना जे शाळेमध्ये 75% कामाचे दिवस हजर असतील त्यांनाच लागू पडते.
- **मातृ प्रबोधन योजना –** ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा हेतू साध्य करण्यासाठी आईला बालकांचे शिक्षण, आरोग्य, आणि वैयक्तिक विकास याबाबत शिक्षित करण्यासाठी हा कार्यक्रम राबवला जातो.
- **आर्मी स्कूल / शाळा –** महाराष्ट्रातील मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यासाठी सरकारने नाशिक मध्ये भोर या ठिकाणी आर्मी शाळांची सुरूवात केली आहे. जिथे मुलींना काही प्रमाणात शिष्यवृत्ती मिळते. तसेच जर त्या शारीरिक दृष्ट्या सशक्त असतील तर पुढे प्रशिक्षणाची संधी देखील दिली जाते.
- **समूह निवासी शाळा –** या शाळा अशा विद्यार्थिनीसाठी आहेत ज्या खूप दूरच्या ठिकाणी राहतात. त्यामुळे त्या शाळेत येवू शकत नाहीत अशा मुलींसाठी समूह निवासी शाळा आहेत.

### 5.3.5.3 आर्थिकदृष्ट्या वंचित जातीतील बालकांसाठी योजना :

समाजात कोण्याही जाती धर्मातील विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या कमजोर असू शकतात. गरीबीमुळे असे विद्यार्थी मध्येच शाळा सोडून कुटुंबासाठी कमाई करण्यासाठी जातात. अशा मुलांसाठी काही योजना खालीप्रमाणे :

- **शिष्यवृत्ती –** 1978 मध्ये महाराष्ट्र सरकारने आर्थिक दृष्ट्या वंचित विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना लागू केली आहे. याअंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्यांस 70 रु. प्रति महिना आणि विद्यार्थीनीला 80 रु प्रतिमहिना दिले जातात.
- **आर्थिकरीत्या वंचित जाती –** महाराष्ट्र सरकारने ही योजना 1957 मध्ये सुरू केली. या अंतर्गत आर्थिक दृष्टीने गरीब वर्गाशी संबंधित बालकांना शिष्यवृत्ती दिली जाते. जर ते 75% उपस्थित असतील तर आणि त्यांच्या आई वडिलांचे उत्पन्न निर्धारीत सीमेपेक्षा कमी असणे गरजेचे आहे.
- **पोषण आहार –** या योजनेचा आरंभ 1995 मध्ये झाला असून या अंतर्गत प्रत्येक बालकास जो नियमित शाळेत उपस्थित असेल अशा मुलांना मध्यान्ह योजन दिले जाते.
- **सावित्रीबाई फुले दत्तक – पालक योजना –** 1993 मध्ये ही योजनेची सुरुवात झाली या योजनेअंतर्गत शाळेचे मुख्याध्यापक, कोणताही अधिकारी अथवा समाजातील अक्षम व्यक्ति कोणत्या ही एका कन्येला दत्तक घेवू शकतात परंतु ती गरीबीमुळे शाळेत येऊ शकत नसेल तिला आर्थिक मदत प्रतिमहिना देवू शकेल परंतु ही सर्व प्रक्रिया शाळेच्या माध्यमातून करता येवू शकते.
- **बुक बँक योजना –** प्राथमिक शाळेतील मुलींसाठी मोफत पुस्तके उपलब्ध करून दिली जातात वर्षाच्या शेवटी ही पुस्तके जमा करून घेतली जातात. जेव्हा विद्यार्थीनी पुढच्या वर्गात प्रवेश करते त्यावेळी त्या वर्गाची पुस्तके तिला मिळतात.

### 5.3.5.4 दूरस्थ क्षेत्रांत राहणाऱ्या बालकांसाठी योजना :

महाराष्ट्र सरकारने 1970 मध्ये दूरस्थ भागात राहणाऱ्या मुलांसाठी खालील योजना आहेत.

- **पोषक आहार योजना –** याचा हेतू 6 वर्ष वयापर्यंतच्या मुलांना दर्जेदार आहार देणे हा होता. आंगणवाडी आणि बालवाडीच्या माध्यमातून देण्यात येत आहे. इ. 1 ते 5 वीपर्यंतच्या मुलांसाठी ही योजना होती.

Notes

- **आश्रमशाळा –** आदिवासी विकास संचालनालयाने या योजनेस कार्यान्वित केले. अतिशय गरीब विद्यार्थ्यांना या आश्रमांमध्ये प्रवेश दिला जातो. त्यांना मोफत शिक्षण, आश्रय, तसेच गणवेशाची सुविधा असते. या आश्रमशाळेत पहिलीपासून दहावीपर्यंत शिक्षण दिले जाते. आणि याचे पर्यवेक्षण सकारकडून केले जाते. आश्रमशाळा या प्रकारच्या होत्या.

  i) मूलभूत आश्रमशाळा – वर्ग पहिली ते सातवी

  ii) परा बेसिक आश्रमशाळा – वर्ग पाचवी ते दहावी

- **विद्या निकेतन –** जनजातीय प्रतिभाशाली मुलांसाठी ही एक नवीन योजना असून 1981 मध्ये फक्त एक किंवा दोन जिल्ह्यांत सुरू करण्यात आली. यामध्ये देखील मोफत शिक्षण दिले जाते असे. मुलींसाठी सुद्धा नंतर विद्यानिकेतन सुरू करण्यात आले. याप्रकारे प्रत्येक संस्थेत आदिवासी मुलांसाठी 10 जागा राखीव ठेवण्यात येत.

- **बालशिक्षा योजना –** योजना महाराष्ट्र सरकारने 1982 मध्ये युनिसेफच्या मदतीने सुरुवात करण्यात आली. यामध्ये मुलांना आकर्षक, सुंदर चित्रे असणारी पुस्तके मोफत दिली जात असत. ज्यामुळे मुलांमध्ये पुस्तकांप्रती आवड निर्माण होईल. तसेच मुलं शाळेत नियमित उपस्थित राहतील.

- कुरण शाळा : श्रीमती ताराबाई मोडक व श्रीमती अनुताई वाघ यांनी वनातील मुलांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी या शाळा सुरू केल्या. या मुलांना अनौपचारिकरित्या चांगल्या सवयी, स्वच्छता भाषा, औषधोपचार यासाठी फिरत्या शाळा सुरू केल्या.

- आदिवासी मुलांसाठी योजना : या मुलांची बोलीभाषा वेगळी असते राज्यातील भाषेंसाठी समांतर अशी मिश्रभाषेची महाराष्ट्र राज्याने पुस्तके तयार केलेली असून शिक्षक प्रशिक्षण आयोजित केले जाते.

### 5.3.5.5 शालाबाह्य बालकांसाठी योजना :

बऱ्याच प्रमाणात विद्यार्थी गरीबी किंवा अन्य कारणास्तव शाळेत येत नाहीत आणि जरी येतात ते मध्येच काही शाळा सोडतात. अशा मुलांसाठी येजना पुढीलप्रमाणे

- **सेतू शाळा –** या शाळांचा हेतू म्हणजे अशा विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेत आणणे की, ज्यांनी मध्येच शाळा सोडली आहे आणि जे अध्ययन केले आहे ते विसरले आहेत, अशा मुलांना आपले शिक्षण पूर्ण करण्यास पुन्हा संधी देणे होय. अशा मुलांना 45 दिवस वेगळे शिकवले जाते आणि पुन्हा नियमित शाळेत नावनोंदणीसाठी पाठविले जाते.
- **इंडस बाल श्रम योजना –** काही असे विद्यार्थी असतात की जे कुठे ना कुठे मजदूरी करतात आणि शाळेत जात नाहीत या योजनेचा हेतू म्हणजे बालश्रम थांबवून त्यंना साक्षर बनविणे होय. या योजनेस महाराष्ट्रात 5 जिल्ह्यांत कार्यान्वित केले गेले. जिल्हे – गोंदिया, अमरावती, जालना, औरंगाबाद, मुंबई – याचे दायित्व काही स्वयंसेवी संस्थामधील अशा व्यक्तिंना दिले होते जे ठिकठिकाणी अशा मुलांची छाननी करतील जे कारखाने, उद्योग, हॉटेल इ. मध्ये बालकामगारी करतात. अशा मुलांना आणून शाळेत भरती केले जात आणि त्यंना (शिष्यवृत्ती दिली जाते.) त्या मुलांचा कल पाहून व्यावसायशिक्षण दिले जाते. अशा शाळेत 50 मुलांना प्रवेश दिला जातो.
- **साखरशाळा –** अशा शाळा ऊसतोड कामगाराच्या ठिकाणी असतात आणि त्यांच्या मुलांना साक्षर करण्याचे काम करतात. कारण त्यांचे आई – वडील ऊसतोड मोसमात साखर कारखान्याच्या आसपास वस्ती लावत आणि काही आपल्या कुटुंबासोबत राहतात. अशा मुलांचे शिक्षणासाठी साखरशाळा सुरू करून त्या मुलांना शिक्षण दिले जाते. यांना द्वितीयय सेमिस्टर / सत्र शाळा म्हणतात. या शाळा केवळ त्या ऊस हंगामात कार्यरत असतात जेव्हा विद्यार्थी आईवडिलांसोबत परत जातात तेव्हा साखरशाळादेखील बंद असतात.

Notes

- **वस्तीशाळा –** या अशा प्राथमिक शाळा असतात ज्या डोंगरी भागात, आदिवासी भागात तसेच दूरस्थ भागात अनौपचारिक शिक्षण देतात. कि. जेथे एक कि. मी. अंतरावर कोणतीही शाळा उपलब्ध नाही. या मुलांना 1-4 थी पर्यंतचा अभ्यासक्रम शिकविण्यात येतो. हक वस्तीशाळा चालविण्यासाठी ग्राम पंचायतकडे कमीत कमी 15 विद्यार्थ्यांची नावनोंदणी असणे आवश्यक असते ग्रामीण शिक्षा समिती योग्य शिक्षकाचे नियोजन करतात. या शिक्षकांना विशेष प्रशिक्षण डाईट (DIET) कडून 30 दिवसांचे प्रशिक्षण दिले जाते.
- **केप प्रकल्प –** हा स्वयं अध्ययन उपक्रम असून शिक्षणशास्त्र महाविद्यालयांशी सलग्न प्रकल्प आहे. 25/30 मुलांनी सोईनुसार शाळेत यावे व स्वत: अभ्यास करावा.

### 5.3.5.6 विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी योजना (विकलांग / अपंग) देवदासी मुली इ.):

विशेष गरजा असणाऱ्या विविध सामाजिक स्तरांमध्ये जाती, धर्म, तसेच शैक्षणिक दृष्ट्या वंचित बालके आणि अपंग बालकांचा समावेश होतो. ही मुली कोणत्या न कोणत्या कारणास्तव आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत यांच्याकडे विशेष लक्ष पुरविणे आवश्यक असते.

- **देवदासी मुलांसाठी योजना –** देवदासी व वारांगणा परंपरा ही एक समाजाची नकारात्मक परंपरा आहे. अंधविश्वासामुळे बऱ्याचश्या देवदासी सामाजिक अथवा आर्थिक दृष्ट्या वंचित आहेत तसेच त्या आपल्या मुलांना शिक्षण देवू शकत नाहीत यांच्यासाठी तयार केलेल्या योजनेत पुढील सुविधा दिल्या जातात. स्नेहालय, स्त्री – प्रबोधन तसेच मोफत पास योजना, बुक बँक योजना, उपस्थिती भत्ता इ.
- **अपंग मुलांसाठी शिक्षण योजना –** अशा मुलांना अपेक्षित शिक्षण दिले जाते. यामध्ये मोफत शिक्षण सुविधा समाविष्ट असतात ज्या माध्यमातून अनौपचारिक शिक्षण चालते फिरते विद्यालय, उपचारात्मक शिक्षण पार्ट टाईम शिक्षण, व्यावसायिक शिक्षण इ. दिले जाते.
- **दूर्बल मुलांसाठी शिक्षण –** महाराष्ट्र सरकारने अशा मुलांसाठी विशेष शाळा स्थापन केल्या आहेत. 1985 मध्ये मुंबईमध्ये मूकबधिर विद्यालयाची स्थापना केलली तेथे ही मुले सामान्य मुलीप्रमाणे वाचन – लेखन शिकू शकतात. नंतर तंना सामान्य शाळांमध्ये प्रवेश दिला जातो. या पद्धतीला समावेशित शिक्षण पद्धती म्हटले जाते.

**क्रियाकल 3**

तुम्ही तुमच्या राज्यात चालणाऱ्या या प्रकारच्या योजनांचा अभ्यास करून त्यांची तुलना महाराष्ट्र राज्यात चालवल्या जाणाऱ्या योजनांशी करा यांच्या समान बाबी व विभिन्न नोंद करा.

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

## 5.4 डी. पी. ई. पी. (जिल्हा प्राथमिक शिक्षण योजना)

DPEP

DISTRICT PRIMARY EDUCATION PROGRAMME

Notes

डी पी. ई. पी ही एक जागतिक स्तरावर सर्वात मोठी योजनांमधील एक येजना असून 1995 मध्ये सुरुवात झा. या योजनेचा हेतू प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिक्षकरण असा आहे. यासाठी सर्व स्तरावर जिल्हा विशिष्ट योजना विकेंद्रीकृत नियोजन सहभागीत्व कार्यक्रम, सशक्तीकरण आणि क्षमता निर्मिती वर भर देण्यात आला आहे. प्राथमिक शिक्षणाला पुन्हा नवीन शक्ती देणे तसेच उच्च प्राथमिक शिक्षणाला पुन्हा नवीन शक्ती देणे तसेच उच्च प्राथमिक शिक्षणाच्या हेतूंची पूर्ती करणे हे या कार्यक्रमाचा मुख्य हेतू आहे.

ही योजना केंद्र सरकारची योजना असून जागतिक बँकेकडून सहाय्यता देवून पाच राज्यात कार्यरत करण्यात आली. नंतर याचा विस्तार अन्य राज्यात करण्यात आला. या योजनेअंतर्गत योजनेची सुरुवात करण्यासाठी प्रत्येक राज्याला पाच जिल्ह्यांची निवड करावी लागते. अधिकमागास जिल्हे असे असावेत. जिथे महिला साक्षरता राष्ट्रीय दराच्या कमी असेल, जिथे टी. एल. सी., (समग्र साक्षरता अभियान) यशस्वी झालेला असावा आणि ज्याची फलप्राप्ती म्हणून तिचे प्राथमिक शिक्षणाची मागणी वाढलेली असणे गरजेचे आहे.

### 5.4.1 डी. पी. ई. पी चे उद्देश्य :

या योजनेचे उद्देश्य खालीलप्रमाणे :

- औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून 6 ते 14 वर्ष वयाच्या मुलांना शिक्षणाच्या 100% सोयी सुविधांची उपलब्धता
- 100% नावनोंदणी
- दर्जेदार शिक्षणाच्या किमान निम्म्याइतकी पातळी
- शाळेतील अप्रगती आणि गळतीवर नियंत्रण
- शिक्षक आणि समाजाची क्षमता निर्माण – अधिकाधिक विकेंद्रिकरण आणि समुदाय सहभागीत्व
- समाजातल प्रत्येक घटकाकडून नावनोंदणीत वाढ करणे.

### 5.4.2 डी. पी. ई. पी चे मुख्य घटक :

या योजनेचे मुख्य चार घटक आहेत.

- **सिव्हिल कार्य :** नवीन अशा शाळेचे बांधकाम ज्यामध्ये दोन वर्ग आणि एक वरांडा असेल, जेथे 5 वी पर्यंत वर्ग वाढ तेथे शौचालय, पाणी सुविधा, शाळेची डागडुजी शिक्षकांसाठी खोल्या. महिला वसतीगृह यांची स्थापना करण्याचे नियोजन आहे.
- **कार्यक्रम :** बऱ्याचश्या वैकल्पिक प्रवाहांची सुविधा मिळू शकतील यासाठी डी. पी. ई. पी ने काही विशेष क्रियाकल्प निर्धारित केले आहेत.
- **व्यवस्थापन :** जिल्हा स्तरावर व्यवस्थापन संरचना व्यवस्थापन सूचना प्रणाली तयार करणे तसेच आर्थिक नियोजन या विविध संस्थांवर राष्ट्रीय राज्य तसेच जिल्हा स्तरावर प्रकल्पाचे अंतीम टप्प्यात समावेशन करण्याचे धोरण ठरविले आहे.
- **शाळा मापन आणि सूक्ष्म स्तर योजना नियोजन :** याचा उद्देश्य नावनोंदणीमध्ये येणाऱ्या अडथळे – अडचणी माहिती करून घेणे तसेच प्राथमिक शिक्षणात समुदायाचे सहभागित्व निश्चित करणे असा आहे. सूक्ष्म योजना अंतर्गत ग्रामीण शिक्षण समितीच्या कार्याला स्थूल रूप देवून उत्तरदायित्व निर्धारित करणे होय.

### 5.4.3 डी. पी. ई. पी अंतर्गत कार्यान्वित योजना :

विकेंद्रिकरण नियोजनाचा प्रारंभ राष्ट्रीय संस्थाद्वारे राज्य तसेच जिल्हा स्तरावर व्यावसायिक सहाय्यता देवून करण्यात आले. डी. पी. ई. पी कडून खालील पायऱ्यांद्वारे विक्रेंद्रिकरणाची संकल्पना मूर्त स्वरूपात आणण्यासाठी गंभीर प्रयत्न करण्यात आले.

- या कार्यक्रमांतर्गत विकेंद्रिकृत शैक्षणिक नियोजनाला प्रारंभ करण्यासाठी जिल्ह्याला एक घटक मानले गेले.
- या अंतर्गत संसाधनासंबंधी निर्णय घेण्यासाठी राज्य स्तर ते स्थानीक स्तरांपर्यंत प्रयत्न करण्यात आले.
- या कार्यक्रमांतर्गत आयोजन प्रक्रियेला मजबुत करण्याचा प्रयत्न करण्यात आला जेणेकरून अधिक सल्लामसलत, सहभागपूर्ण तथा पारदर्शी होऊ शकेल.
- या अंतर्गत व्यावसायिक संगठनात्मक व्यवस्था तसे बी. आर. सी आणि सी. आर. सी. यांच्या माध्यमातून शैक्षणिक क्रियाकल्पास व्यावसायिक संसाधन सहाय्यता मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल.
- या अंतर्गत प्रत्येक विद्यालयास 2000 रू. वार्षिक आणि प्रत्येक शिक्षकास 500 रु वार्षिक अनुदान दिले जाईल.
- नियोजन प्रक्रियेच्या माध्यमातून जिल्हा आणि उपजिल्हा स्तरांवर स्थानिक क्षमतेचा विकास करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात.

## 5.4.4 : कार्यनीती / क्रियाकल्प :

- **उपलब्धता :** दूर्गम, आदिवासी क्षेत्रांमध्ये नवीन प्राथमिक शाळा उभारणे, अशा क्षेत्रात बहूश्रेणी अध्ययन केंद्र, वैकल्पिक शाळा उभारणे की ज्यामुळे प्राथमिक शिक्षणाची पर्यायी शाळा म्हणून विकसित होईल.
- **आदिवासी आणि सागर किनाऱ्यावरील शिक्षण :** पंचायत, स्वयंसेवी संस्था, व व्यक्तिंद्वारे नावनोंदणी अभियान, प्रबोधन, कार्यक्रम आणि आदिवासी, सागरी किनारी भागात विद्यार्थ्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तके देणे.
- **गुणवत्ता सुधार :** क्रिया आधारित शिक्षण पद्धती द्वारे जागृती निर्माण करून शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.
- **समुदाय संघटन :** ग्रामीण शिक्षण समितीची स्थापना आणि पंचायत मॉनिटरींग कक्ष यांना प्रशिक्षण तसेच पालकांचे उद्‌बोधन
- **नियोजन आणि व्यवस्थापन :** शाळा आधारित योजनेसाठी योजना बनविणे, वार्षिक नियोजन करणे. ज्यासाठी गट सल्लागार समिती, जिल्हा सल्लागार समिती आणि जिल्हा कार्यवाही समिती यांच्या बैठका घेण्यात याव्यात.
- **संशोधन आणि मुल्यमापन :** क्रियात्मक संशोधन ब्लॉक संसाधन केंद्र आणि जिल्हा स्तरावर अध्ययन करणे.
- **विकलांग बालकांची ओळख आणि त्यांच्या शिक्षणाचे व्यवस्थापन (IEDE) :** व्यवस्थापन यासाठी शिक्षकांना विशेष प्रशिक्षण आवश्यक संसाधने आणि अन्य सामग्री देणे. पालकांचे उद्‌बोधन इत्यादी.
- **मुलींच्या शिक्षणास प्राधान्य :** मोफत पुस्तके प्रबोधन कार्यक्रम तसेच शिक्षक संवेदनशील कार्यक्रम राबविणे.
- **व्यवस्थापन सूचना प्रणाली (MIS) :** सर्व डी.पी. ई. पी. च्या जिल्हा केंद्र एकमेकांना नेटने जोडणे, डायलरची पूर्तता करणे तसेच संगणक कर्त्यांची नियुक्ती इ. समाविष्ट आहे.
- **ग्रामीण शिक्षण नोंदणी आणि शिक्षण नोंदणीची सुरुवात करणे**

- **मिडिया :** जिल्हा, गट पंचायत पातळीवर प्रदर्शन भरविणे.

### 5.4.5 सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणावर कार्य क्रमाचा परिणाम

या कार्यक्रमास / अभियान स्वरूपात चालवले गेले. या संदर्भात खालील निष्कर्ष समोर आले.

| | |
|---|---|
| **व्याप्ती (विस्तार) (248 विभाजित जिल्हे)** | |
| ❑ समाविष्ट जिल्हे | 219 |
| ❑ फेज I (1994 - सप्टें 2001) | 42 |
| ❑ फेज II (1996 - 2002) | 80 |
| ❑ फेज III (1998 - 2003) | 27 |
| ❑ इतर फेज | 70 |
| ❑ राज्य कार्यक्रम सुरुवात | 18 |
| ❑ योजना अंतर्गत विद्यार्थी | 513 लाख |
| ❑ एकूण शिक्षक | 11 लाख |
| **शाळा** | |
| ❑ योजनेअंतर्गत शाळा | 3,75,000 |
| ❑ नवीन शाळा | 10,000 |
| **ई. सी. डी** | |
| ❑ ई. सी. डी. सेंटर | 56124 |
| ❑ एकूण विद्यार्थी | 21 लाख |
| **वैकल्पिक शाळा (Alternaive schools)** | |
| ❑ एकूण केंद्र | 56124 |
| ❑ एकूण विद्यार्थी | 21 लाख |
| **नावनोंदणी** | |
| ❑ नावनोंदणी दर | 102% |
| ❑ शुद्ध नोंदणी दर | 90% |

सारणी 5.3

**स्त्रोत :** डी. पी. ई. पी. फॅक्ट शीट, खंड VII संख्या 11

**नोंद :** GER तथा NER ची गणना करण्यासंबंधी फॉर्म्युले घटकाच्या शेवटी दिलेले आहेत.

## 5.5 सारांश

भारताची शिक्षण प्रणावली अधिक विशाल आहे. यामध्ये एकूण 300 दशलक्ष विद्यार्थी आणि 6.5 दशलक्ष शिक्षक आहेत. नोंदणी सुमारे 100 % आहे, 120 दशलक्ष विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन दिले जाते. साक्षरता दर 2001 च्या तुलनेत 65% पासून 75% पर्यंत आहे. शिक्षणास एक संपन्न जीवनाकडे जाण्याचे लक्षण समजले जाते.

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरणाच्या हेतू प्राप्तीसाठी विविध योजनांच्या माध्यमातून विविध कार्यनीतींचा अवलंब केला जातो. उत्तर प्रदेश बेसिक योजना,बिहार बेसिक शिक्षण योजना, लोक जम्बिश मुलींसाठी शिक्षण योजना तसेच शिक्षक अनुपस्थिती भरून काढण्यासाठी शिक्षाकर्मी योजना आहेत.

1990 च्या दशकाचा मध्यात ज्या जिल्ह्यांमध्ये महिला साक्षरता दर कमी होता तिथे डी. पी. ई. पी. योजनेची सुरुवात केली. या योजनेने अनेक नवीन मार्गांचे उपयोजन केले. ज्यामुळे

शाळाबाह्य विद्यार्थ्यांना साक्षर करता येईल. याची विशेषता म्हणजे ही योजना विकेंद्रिकृत होती तसेच समुदायाचे सहभाग घेतला गेला. लोक सहभाग ही भावना गावाच्या स्तरावर पसरली असून त्यामुळे क्रियाकल्पाचे उपयोजन यशस्वीपणे झाले आहे. ग्रामीण शिक्षण समितीने विभिन्न जिल्ह्यात अंदाजे 100% गावांना सहभागी केले आहे. या सकारात्मक परीवर्तनासोबत भारत लवकरच प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणाचे लक्ष्य प्राप्त करता येईल अशी आशा करता येईल.

## 5.6 शब्दावली

- **शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण :** बालकांच्या गरजेनुसार तसेच सर्वत्र अनुरूप शिक्षणाची उपलब्धता निश्चित करणे.
- **सार्वत्रिकीकरणाचे तीन घटक :** सहजता येईल, नावनोंदणी करता येईल हजर राहता येईल असे गुणवत्ता प्रधान शिक्षण
- **जी. ई. आर (GER) :** सर्कल नावनोंदणी दर
- **एन. ई. आर. (NER) :** शुद्ध नोंदणी दर
- **डी. पी. ई. पी. (DPEP) :** जिल्हा प्राथ. शिक्षण योजना
- **यू. पी. बी. ई. पी. :** उत्तर प्रदेश बेसिक शिक्षण योजना
- **यू. ई. ई. (UEE) :** प्राथ. शिक्षण सार्वत्रीकीकरण
- **बी. ई. पी (BEP) :** बिहार शिक्षण योजना
- **सूत्र :**

$$\text{GER} = \frac{\text{प्राथमिक शाळेत नावनोंदणी झालेली एकूण विद्यार्थी}}{\text{प्राथमिक शाळेतील वयाचे विद्यार्थ्यांची एकूण संख्या}}$$

$$\text{NER} = \frac{\text{प्राथमिक शाळेच्या वयाची शाळेत नावनोंदित एकूण विद्यार्थी}}{\text{प्राथमिक शाळेच्या वयाचे विद्यार्थांची एकूण संख्या}}$$

**GER =** 100% पेक्षा अधिक असेल तर प्राथमिक शाळेच्या वयापेक्षा मुलांचे वय अधिक आहे.

**NER =** 100% पेक्षा कमी असेल तर काही मुले शाळाबाह्य आहेत किंवा माध्यमिक वर्गात असतील.

## 5.7 संदर्भ ग्रंथ

1. Lok Jumbish : the sixth report Reviewshttp://books Volume 1/1970 - Volume 41/2011

## 5.8 घटकांचा अभ्यास

1. योग्य पर्यायाची निवड करून गाळलेल्या जागा भरा.
   a) ............ पंचवर्षीय योजनेत सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून प्राथमिक शिक्षणाला अधिक प्रोत्साहन मिळाले आहे. (दहावी / अकरावी)
   b) सन 2009-10 या वर्षी सर्वाधिक शाळांची संख्या ................ राज्यात होती. (म. प्रदेश / उ. प्रदेश)

Notes

c) ............. चा अर्थ आहे सर्वांसाठी शिक्षण लोक अभियान (लोक जम्बिश / महिला समाख्या)

d) डी. पी. ई. ची मुळे नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्येमध्ये सर्वात अधिक घट सुमारे 50% .......... या राज्यात झाली (म. प्रदेश, आसाम)

e) राजस्थान सरकारद्वारे 1987 मध्ये ............... ची वित्तीय सहायत्तामुळे शिक्षाकर्मी योजना कार्यान्वित करण्यात आला. (SIDA) (विश्व बँक)

f) समाजातील सुविधावंचित वर्गाची शिक्षणावर .......... चा विशेष भर आहे. (यू. पी.–बी. ई. / बी. ई. पी)

2. खालील स्थितीत कार्यान्वित करणारी योजनेचे नाव लिहा.

क) डी. पी. ई. पी. च्या सर्व जिल्ह्यात / राज्य योजना कार्यालयास संगणक तथा नेटवर्किंग देणे........

ख) बालकामगार प्रथा बंद करून आणि त्यांना शिक्षणाच्या मुख्यप्रवाहात आणणे = .............

ग) शिक्षाकर्मी प्रथिमिक शाळा केव्हा चालवतात = .............

3. योग्य जोड्या लावा.

| गट 'फ' | गट 'ख' |
|---|---|
| i) बिहार शिक्षण योजना | क) मुलींचे शिक्षण |
| ii) लोक जम्बिश | ख) शिक्षक अनुपस्थिती |
| iii) शिक्षा कर्मी | ग) प्राय–शिक्षणात गुणवत्तेत सुधारणा करणे |

(उत्तरे – i) ग, ii) क, iii) ख )

4. गाळलेल्या जागा भरा.

i) शिक्षणाचे सार्वत्रिकी करणाचा अर्थ म्हणजे बालकांची विशेष गरजांनुसार तसेच ठिकाणानुसार योग्य ठिकाणी शिक्षणाची ................. सुनिश्चित करणे.

ii) भारत सरकार प्राथमिक स्तरावरील शाळांच्या संदर्भात ............. कि. मी. दूरीवर प्राथमिक शाळेची उपलब्धता निश्चित करते.

iii) भारतात डी. पी. ई. पी. ............. मध्ये सुरुवात झाली.

vi) महाराष्ट्रात मुलींच्या संख्येला प्रोत्साहित करण्यासाठी सरकारने नासिकमध्ये ............. च्या ठिकाणी आर्मी शाळेची सुरुवात केली.

5. एका वाक्यात उत्तरे लिहा.

i) कोणत्या शाळेचे दुसरे नाव द्वितीय सेमिस्टर शाळा आहे?

ii) बालश्रम योजनांचा राष्ट्रीय बालश्रम योजना का म्हटले जाते?

iii) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरणाची व्याख्या लिहा.

iv) महाराष्ट्रात कुरण शाळा कोणी सुरू केल्या.

v) शिक्षाकर्मी कोणास म्हटले जाते?

vi) DPEP ची सांख्यिकी माहिती कशी मिळते?

6. एका वाक्यात उत्तरे लिहा.

i) यु.ई.ई. म्हणजे काय? त्याचे त्यांचे घटक कोणते?

ii) विद्यालय मापन तसेच सूक्ष्म योजना लोक जम्बिशचे प्रमुख कार्यात्मक बधंणाचे समर्थन करते. स्पष्ट करा.

iii) सकल नावनोंदणी दर (GER) म्हणजे काय? उदा. सहित स्पष्ट करा.

iv) आर्थिकदृष्ट्या वंचित बालकांना राज्य सरकार कडून कोणत्या सोयीसुविधा दिल्या जातात?

Notes

v) बेसिक शिक्षण योजनेअंतर्गत उत्तर प्रदेश सरकारने कोणकोणत्या कार्यनीती तर क्रियाकल्पांची योजना तयार केली?

vi) मुलींसाठी प्राथमिक शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या विविध योजना लिहा?

vii) राजस्थानच्या शिक्षाकर्मी योजनेमध्ये शिक्षाकर्मीची भूमिका थोडक्यात लिहा.

viii) विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासाठी उपलब्ध योजनांचे स्पष्टीकरण करा.

ix) डी. पी. ई. पी. चे. उद्देश्य मुख्य घटक तसेच विविध कार्यनीती कोणकोणत्या आहेत ते स्पष्ट करा.

x) DPEP चा UEE वर झालेला परिणाम स्पष्ट करा.

# घटक 6 : प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासंबंधी कार्यनीती II

**उपघटक :**

6.0 प्रस्तावना
6.1 अध्ययन उद्दिष्ट्ये
6.2 सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम प्रमुख लक्षण
  6.2.1 सर्व शिक्षा अभियानाचे प्रमुख विशेष लक्षण
6.3 सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाचे उद्देश्य
6.4 सर्व शिक्षा अभियानाची मख्य कार्यनीती
6.5 सर्व शिक्षा अभियानासंबंधित आर्थिक निकष
6.6 सर्व शिक्षा अभियानामध्ये शाळा तसेच इतर संबंधित सुविधांचा विकास
6.7 माध्यान्ह भोजन व्यवस्था तसेच सर्व शिक्षा अभियानात याचे योगदान
6.8 सर्व शिक्षा अभियानातील मुख्य दोष / त्रुटी आणि याच्या यशस्वी कार्यनीतीसाठी उपचारात्मक उपाय
  6.8.1 उपस्थिती वाढविण्यासाठी उपचारात्मक उपाय
6.9 सर्व शिक्षा अभियान किंवा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, 2009 यांचे एकत्रीकर
6.11 संदर्भग्रंथ
6.12 घटक अभ्यास

## 6.0 प्रस्तावना

प्रकरण 5 मध्ये तुम्ही विविध राज्यात लागू असलेल्या प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण याशी संबंधित विविध योजनांचा अभ्यास केला. तुम्ही डी. पी. ई. चा प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण प्रभाव देखील अभ्यासला या प्रकरणात सर्व शिक्षा अभियानाचे मुख्य लक्षणे, व्यवस्थापन आणि पर्यवेक्षणाचा अभ्यास करणार आहोत. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणासाठी देशातील एक मुख्य अभियान आहे. सर्व शिक्षा अभियानाचे प्रारूप हे 6 वर्ष ते 14 वर्ष वयापर्यंतच्या मुलांसाठी शिक्षण देण्यासाठी केलेले आहे. तथापि देशात प्राथमिक शिक्षणाच्या अधिकारात पर्याप्त प्रगती झाली आहे. परंतु या व्यतिरिक्त विविध राज्यांमध्ये असे बरेच विद्यार्थी शाळेत जात नाहीत. सर्व शिक्षा अभियानाच्या कार्यक्रमावर चर्चा करताना आपण याला शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 बरोबर जोडण्याचा प्रयत्न करुयात. ज्या अंतर्गत प्राथमिक शिक्षणाला मुलभूत अधिकाराचा दर्जा दिला गेला आहे.

## 6.1 अध्ययन उद्देश्य :

**या प्रकरणाच्या अध्ययनानंतर तुम्ही योग्य व्हाल कि.**

- सर्व शिक्षा अभियानाची पार्श्वभूमी तसेच याचे अनिवार्य बाजूंचे विवरण देता येईल.
- सर्व शिक्षा अभियानाच्या उद्देश्यांना स्पष्ट करता येईल.
- सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाची प्रमुख कार्यनीतीची ओळख करता येईल आणि त्याची व्याख्या करता येऊ शकेल.
- सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाचे मुख्य वित्तीय मानदंड सांगता येतील.
- या कार्यक्रमाची यशस्वीतेसाठी मध्यान्ह भोजन व्यवस्थेचे महत्त्व विहिता येईल.

- शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 चे महत्त्व आणि सर्व शिधा अभियानासोबतचा संबंध वर्णन करता येईल.
- निरक्षरतेचा नायनाट करण्यासाठी सर्व शिक्षा अभियानाचे योगदान यांचे विवेचन करू शकाल.

## 6.2 सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाचे मुख्य लक्षण

जसे तुम्ही जाणता कि, सर्व शिधा अभियान 6 वर्षे ते 14 वर्ष वयापर्यंतच्या बालकांना प्राथमिक शिक्षणाची उपलब्धी सुनिश्चित करण्यासाठी भारत सरकारचा सर्वश्रेष्ठ महत्त्वपूर्ण कार्यक्रम आहे. या कार्यक्रमाचे उद्‌देश्य बालकांची नावनोंदणी, अध्ययन, तसेच शिधणाची गुणवत्ता यामध्ये सुधारणा घडवून आणणे जेणेकरून विद्यार्थी श्रेणीस अनुकूल अध्ययन स्तर प्राप्त करू शकतील याचा उद्देश्य लिंग भेद तसेच विविध सामाजिक वर्गातील अंतर कमी करणे असा आहे. 1998 मध्ये राज्याचे शिक्षणमंत्र्यांनी कॉंग्रेसच्या शिफारशींचे फलस्वरूप सर्व शिक्षा अभियानाची सुरुवात 2009 मध्ये झाली तथापि संविधानातील 86 व्या दुरुस्ती अनुसार ज्यांचे अधिनियम 2002 मध्ये झालेल्या प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे एक मुलभुत अधिकाराच्या रुपात स्विकार करण्याची चर्चा झाली परंतु एक अधिनियमाच्या स्वरूपात हा ऑगस्ट 2009 मध्ये भारतीय संसदेत हा कायदा सम्मत करण्यात आला.

### 6.2.1 सर्व शिक्षा अभियानाचे प्रमुख लक्षण :

सर्व शिक्षा अभियानाची खालीलप्रमाणे प्रमुख लक्षणे दिलेली असून प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणाचे उद्देश्यांच्या रूपात दिलेली आहे.

- सर्व शिक्षा अभियानाचा प्रमुख उद्‌देश हा सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण प्रभावी कार्यक्रम.
- हा कार्यक्रम देशभरात गुणवत्तापूर्ण बेसिक शिक्षणाप्रती अपेक्षांचे प्रतिउत्तर आहे.
- बेसिक शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक न्यायास प्रोत्साहित करण्याची संधी आहे.
- बालकांचे शिक्षणात पंचायती राज्य संस्था शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामीण शिक्षण समिती पालक – शिक्षक संघ आणि स्थानिक जनतेस सहभागी करण्याचा एक प्रभावी प्रयत्न आहे.
- देशभरात सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाप्रती ही एक राजनैतिक इच्छा शक्तीची अभिव्यक्ती आहे.
- ही प्राथमिक शिक्षणांच्या व्यवस्थापनात स्वायत्त समत्या, व मूलभूत व त्या आधारित संरचनेला सामिल करून घेते.
- या अंतर्गत केंद्र, राज्य तसेच स्थानिक शासनाची भागीदारीचे स्वागत केले जाते.
- राज्यासाठी प्राथमिक शिक्षणाचा स्वतःच स्वतःचे दर्शन विकसित करण्याची ही एक संधी आहे.
- कार्यनीतींच्या प्रत्यक्ष उपयोजनात सरकारी व खाजगी भागीदारी करण्याची संधी आहे.
- या व्यतिरिक्त सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम बालकांमध्ये मानवी योगदानामध्ये सुधारणा घडवून आणण्याची संधी देते. की जे एका अभियान स्वरूपात समुदायाद्वारा स्वीकृत गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून साध्य होते.

## 6.3 सर्व शिक्षा अभियानाचे ध्येय व उद्दिष्ट्ये

- **सर्व शिक्षा अभियान ध्येये :**

सर्व शिक्षा अभियानाचे लक्ष्य आहे कि, सन 2010 पर्यंत 6 वर्ष ते 14 वर्ष वयापर्यंतच्या सर्व बालकांना उपयुक्त प्राथमिक शिक्षण प्रदान करणे होय. या कार्यक्रमाचे अन्य लक्ष्य आहे कि, शाळेच्या व्यवस्थापनात लोक समुदायाची सक्रिय सहयोगाजून सामाजिक, क्षेत्रीय आणि लिंगभेद यातील अंतर दूर करणे.

उपयुक्त आणि संगत शिक्षा म्हणजे अशी शिक्षण प्रणालली शोधणे कि जो समुदायापासून विमुक्त करू शकणार नाही. किंवा समुदायातील बंधूभाव आणि एकता यावर वाढेल अशी शिक्षण प्रणालीचा उद्‌देश्य आहे की, बालकांना त्यांच्या नैसर्गिक वातावरणामध्ये शिक्षणाच्या संधी प्राप्त करून देणे आणि त्या वातावरणाला असे काबिज करणे की ज्यामुळे मूल्यांधिष्टीत शिक्षण देवून परस्परांतील चांगल्या गुणांना वाव देवून स्वार्थाला थारा न देणे व 1 ते 14 वयोगटाचे शिक्षणाचे सातत्य राहील व मानवी आध्यात्मिक व भौतिक स्वरुपात विकास होईल.

- **उद्‌देश्य :**

जसे की वरील खंड 6.3.1 मध्ये स्पष्ट करण्याप्रमाणे सर्व शिक्षा अभियान देशात प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकीकरणासाठी चालवले गेलेले एक प्रमुख अभियान असून याचे उद्‌देश्य पुढीलप्रमाणे :

- हे सुनिश्चित करणे कि सर्व बालके, शाळेत यावेत जे विद्यार्थी शालाबाह्य आहे, त्यांना विशेष शाळेच्या विविध योजनानी, जसे शिक्षण हमी योजना, वैकल्पिक तथा नवाचारी शाळा प्रणाली या अंतर्गत नावनोंदणी करावी. बॅक टू स्कूल (शाळेकडे चला) अभियान 2003 पर्यंत पूर्ण करण्यासाठी ठरविण्यात आले होते ज्याला नंतर 2005 पर्यंत कालावधी वाढवण्यात आला.
- वर्ष 2007 पर्यंत सर्व बालके 5 वर्षांची प्राथमिक शिक्षण पूर्ण करतील.
- वर्ष 2010 पर्यंत सर्व बालके 8 वर्षांची प्राथमिक शिक्षण पूर्ण करतील.
- संतोषजनक प्राथमिक शिक्षणाची गुणवत्तेवर भर असून जीवनासाठी शिक्षण यावर विशेष भर आहे. याप्रकारे गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षणात विद्यार्थ्यांना जीवन कौशल्य शिकवले जावेत.
- वर्ष 2010 पर्यंत सार्वत्रिक अवधारणा / अवबोध या व्यतिरीक्त प्राथमिक गुणवत्तापूर्ण शिक्षणामधील लिंगभेद, आणि सामाजिक अंतर नाहीसे केल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांमध्ये प्राथमिक शिक्षणाच्या पूर्ततेनंतर शाळा न सोडण्यावर भर दिला गेला.
- राष्ट्रीय विशाल धोरणाच्या पायावर स्थानिक गरजांवर आधारित नियोजन करणे.

## 6.4 सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम म्हणून आराखडा

- **संस्थागत सुधारणा :** सर्व शिक्षा अभियानाचे कार्यकुशलता प्रगत करण्याच्या दृष्टीने केंद्र तसेच राज्य सरकार आवश्यक त्या सुधारणा करतील. राज्याचे शैक्षणिक व्यवस्थापन, शाळेतील उपलब्धीस्तर, वित्तीय घटक, विकेंद्रीकरण शिक्षक भरती, मॉनीटरींग आणि मुख्यांकन, समुदाय स्वामित्व राज्य शिक्षण अभियान, मुलींचे अनुसूचित जाति / जमाति आणि वंचित समुहातील मुलांचे शिक्षण तसेच पूर्व बाल्यावस्थेची देखभाल समावेशन. यांचे शिक्षण प्रणालीचे एक प्रकारे वस्तुनिष्ठ मुल्यांकन करावे लागेल. अनेक राज्यांमध्ये आपली प्राथमिक शिक्षण प्रणालीचे एक प्रकारे वस्तुनिष्ठ मल्यांकन करावे लागेल. अनेक राज्यांमध्ये आपली प्राथमिक शिक्षण प्रणालीची संचालन प्रक्रियेत पहिल्यापासूनच बरेचसे परीवर्तन करण्यात आलेले आहेत.
- **शाश्वत वित्तीयता :** सर्व शिक्षा अभियान हे या तर्कावर आधारित आहे कि प्राथमिक शिक्षणाची शाश्वत वित्तीयत्ता ही निरंतर राहिली पाहिजे. यासाठी केंद्र आणि राज्याच्या माध्यमतून वित्तीय भागीदारीमध्ये एक दीर्घकालीन हेतूंची अथवा घटकांची अनिवार्यता आहे.
- **समुदाय स्वामित्व :** सर्व शिक्षा अभियानासाठी हे आवश्यक आहे की प्रभावी विकेंद्रिकरणाद्वारे शाळा आधारित कार्यक्रमांमध्ये लोक समुदायाचे सहाय्य घेण्यात यावे. यामध्ये सुधारणा करण्यासाठी महिला, ग्रामीण शिक्षण समितीच्या सदस्य तथा पंचायत राजच्या सदस्यांना सहभागी करण्यात यावे.

- **संस्थानिक क्षमता निर्माण :** सर्व शिक्षा अभियानंतर्गत एन. यू. ई. पी. ए. एन. सी. सी. ई. आर. टी, NIEPA / NCERT / NCTE / SCERT / SIEMAT/ DTET आणि राज्य स्तीयीय संस्थांची क्षमता निर्मितीमध्ये भूमिका महत्त्वपूर्ण समजली जाते.
- **गुणवत्तेमध्ये सुधारणा :** गुणवत्तेमध्ये सुधारणा करण्यासाठी विशेषज्ञ आणि संस्थांची एक अखंड सहाय्यक प्रणालीची आवश्यकता असते.
- **मुलभूत शैक्षणिक व्यवस्थापनात सुधारणा :** यासाठी संस्थागत विकास, नवीन नवीन पद्धतींचा प्रभावी तथा यशस्वी प्रयोग शिक्षण प्रणालींमध्ये करणे गरजेचे आहे.
- **पूर्ण पारदर्शिकतेबराबेर समुदायआधारित मॉनिटरींग :** सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमामध्ये मॉनिटरींग प्रणालीचा प्रयोग केला जातो. शैक्षणिक व्यवस्थापन प्रणाली, सूक्ष्म नियोजन, तसेच सर्वेधणातून प्राप्त लोक समुदायाच्या सुचना आणि शाळा स्तरातील आराखड्यात समन्वय होणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त प्रत्येक शाळेला प्राप्त अनुदानासहित सर्व प्रकारच्या सूचनांना इतर शाळांमध्ये प्रसार करणे अपेक्षित आहे.
- **वस्ती नियोजन प्रकरण स्वरूपात :** वस्ती आधारित योजना या जिल्हा योजनेचा आधार बनतील
- **समुदायाप्रती उत्तरदायित्व :** सर्व शिक्षा अभियानांतर्गत शिक्षक आणि पालकांच्या माध्यमातून सहयोगाची कल्पना केली जाते. तसेच हे सर्व समुदायाप्रती उत्तरदायी आणि पारदर्शी असतील.
- **मुलींच्या शिक्षणास प्राधान्य :** सर्व शिक्षा अभियानात मुलींच्या शिक्षणाकडे प्रामुख्याने अनुसुचित जाति / जमाति तसेच अल्पसंख्यांक वर्गातील मुलींच्या शिक्षणास प्राधान्यक्रम देण्यात आला आहे.
- **विशेष समुदायांवर भर :** शैक्षणिक प्रक्रियेत अनुसूचित जाति / जमाति, अल्पसंख्याक समुह शहरी वंचित बालके, इतर वंचित समुह आणि विशेष गरजा असणारी बालकांना समाविष्ट करणे तसेच भागीदारी बनवण्यावर भर दिला जाईल.
- **शिक्षकांची भूमिका :** सर्व शिक्षा अभियानाचा हा विश्वास आहे. कि शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आणि केंन्द्रिय आहे. तसेच त्यांच्या विकासात्मक गरजांवयर भर दिला जातो. यासाठी खंड संसाधन केंद्र क्लस्टर संकुल संसाधन केंद्र, योग्य शिक्षकांची भरती, पाठ्यक्रमांसंबंधित आवश्यक साधनसामुग्रीचा विकास इ. मध्ये सहभागी करून आणि शिक्षकांसाठी अभिदर्शन प्रत्यक्ष भेटींचे आयोजन केले जाते कारण. शिक्षकांसाठी अभिदर्शन प्रत्यक्ष भेटींचे आयोजन केले जाते कारण शिक्षकांचा मानवी संसाधनाच्या स्वरूपात विकास होऊ शकेल.
- **जिल्हा प्राथमिक शिक्षण योजना :** सर्व शिक्षा अभियानाच्या आराखड्यानुसार प्रत्येक जिल्हा स्वत:चे एक जिल्हा स्तरीय प्राथमिक शिक्षण योजना तयार करतील ज्यामध्ये सर्व प्रकारच्या क्षेत्रात आवश्यक असणाऱ्या सुचनांची अमलबजावणी करता येईल.
- **सर्व शिक्षा अभियानात सरकारची व खाजगी भागीदारी :** सर्व शिक्षा अभियान या गोष्टीला मानतो कि प्राथमिक शिक्षणांची प्रक्रिया मुख्यत: सरकारी आणि खाजगी संस्थांची सहाय्यत्ता घेवूनच शाळेत पूर्ण होते. परंतु देशातील विविध भागांमध्ये बऱ्याच अशा संस्था आहेत कि ज्या खाजगी असून देखील प्राथमिक शिक्षणाचे उत्तरदायित्व स्विकारत आहेत. गरीब वर्गातील कुटूंब देशातील विविध भागांमध्ये चालविल्या जाणाऱ्या खाजगी शाळेत शुल्क / फि देवू शकत नाहीत. परंतु काही अशा खाजगी शाळा आहेत कि त्यांचे शुल्क सामान्य असते आणि जेथे गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची प्रक्रिया चालते. यातील काही शाळांमध्ये सुविधांची कमतरता दिसून येते आणि शिक्षकांना कमी वेतन दिले जाते. सरकार यासाठी सामाजिक न्याय आणि शिक्षणास

Notes

प्राधान्य देवून सहाय्यता देत आहे सरकारी आणि खाजगी सहभाग इतर अनेक भागांमध्ये पहायला मिळतो. उदा. मध्यान्ह भोजन दूसरीकडे जर खाजगी क्षेत्र आपल्या प्रयत्नांतून सरकारी शाळेच्या स्थितीमध्ये सुधारणात्मक बदल करत असेल तर सरकारी आणि खाजगी संस्थांचे सहभागीत्व अनिवार्य आहे.

## 6.5 सर्व शिक्षा अभियानासंबंधित वित्तीय मानदंड

- या अभियानाअंतर्गत केंद्र आणि राज्याकडून प्राप्त सहाय्यता दर नवव्या. पंचवार्षिक योजनेतील 85:15 चा असेल. दहाव्या पंचवार्षिक योजनेत 75:25 चा असेल आणि त्यानंतर हा दर 50:50 असेल.
- भारत सरकार राज्य सरकारला आणि केंद्रशासित राज्यांना नवीन अनुदान देईल जर असे सुनिश्चित होईल कि मागील अनुदान रक्कम राज्य कार्यान्वित सोसायटीच्या खात्यांमध्ये खर्च केलेली रक्कम / खर्च केलेला असेल तरच पुढील अनुदानाची रक्कम मिळेल.
- प्राथमिक शिक्षा पहिल्यापासून चाललेल्या नवीन योजना, नववी पंचवार्षिक योजनेनंतर एकत्रित केल्या जातील. प्राथमिक शिक्षणाची पोषणात्मक सहाय्यताचे राष्ट्रीय कार्यक्रम (मध्यान्ह भोजन) एक विशिष्ट कार्यक्रम असून त्यामध्ये अन्न आणि वाहन खर्च केंद्र सरकार देईल आणि अन्न शिजवण्यासाठी येणार खर्च राज्य सरकार देईल.
- जो निधी सुधारणात्मक प्रयोग करण्यासाठी शाळाअध्यापन, अध्यापन साधनसामुग्री यांची देखरेख यासाठी स्थानीक व्यवस्थापन समिती जसे ग्रामीण शिक्षण समिती/ शाळा व्यवस्थापन समिती, ग्राम पंचायत इ. समुदायांना अंतर्भुत केले जाईल.
- स्कॉलरशीप, युनिफॉर्मचा खर्च सर्व शिक्षा अभियानातून राज्य सरकार करेल.

## 6.6 सर्व शिक्षा अभियानात शाळा तसेच इतर संबंधित सुविधांचा विकास

- जसे आपण जाणतो कि, प्राथमिक शिक्षण हे राज्याचे उत्तर दायित्व आहे. परंतु प्राथमिक शिक्षणाचे वित्तीयता केंद्र सरकारदेखील करते त्याचे फलस्वरूप राज्य सरकार पायाभूत सोयीसुविधा शिक्षक भरती शिक्षक प्रशिक्षण देण्यासाठी अतिरीक्त वित्तीय संसाधनांचा प्रयोग करू शकतात. तसेच सर्व शिक्षा अभियान भौतिक आणि मानवी संसाधन हेतूला विशेषत: वर्गखोल्या, पाठ्यपुस्तकांचे वाटप, शिक्षक नियुक्ति आणि शिक्षक प्रशिक्षणाच्या दृष्टीने पूर्ण यश प्राप्त करू शकलेले नाही.

**वैकल्पिक तसेच नवीन शिक्षण पद्धती**

i) **AIE** – सर्व विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक शिक्षणाची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी वैकल्पिक आणि नवनवीन पद्धतींची महत्वपूर्ण भूमिका आहे. आदिवासी आणि समूद्रतटीय क्षेत्रांत राहणाऱ्या उपेक्षित आणि सुविधावंचित समूहातील बालकांचा शिक्षणात सहभाग निश्चित करण्यासाठी विविध कार्यनीती विकसित करण्यात आलेली आहेत.

ii) **लोकसेवा कार्य (Civil works)** – सर्व शिक्षा अभियानात लोक सेवा कार्य एक महत्त्वपुर्ण घटक आहे. या घटकाअंतर्गत योजनेचे 33% चांगल्या प्रकारे निरुपण केले जाते शाळेची पायाभूत सुविधा वाढविण्यासाठी बालकांचे शिक्षण आणि अवबोध वाढविण्यासाठी सहाय्यता मिळते आणि या दोन्ही बाबी सर्व शिक्षा अभियानाचे महत्त्वाचे उद्देश्य आहेत. या व्यतिरिक्त यांना शैक्षणिक सहाय्यता मिळते त्यातून शाळेचा गुणवत्ता विकास होण्यास मदत मिळते.

iii) **नवनवीन उपक्रम** – सर्व शिक्षा अभियानंतर्गत काही असे नवीन उपक्रम चालवले जातात कि जे बालकांना शाळेत खेचून आणणे आणि अध्ययन करण्यास सहाय्यभूत आहेत यातील काही

महत्त्वपूर्ण योजनापूर्व बाल्यावस्था देखभाल आणि शिक्षण अनुसूचित जाति /जमातिंचे शिक्षण आणि संगणक शिक्षण इत्यादी. सर्व उपक्रम प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी पोषक असून यामुळे मुलांना शिक्षणात रूचि, आवड, आनंद निर्माण करण्यास मदत होते.

**iv) संशोधन आणि मुल्यमापन** – या घटकाच्या अंतर्गत संशोधन, मुल्यांकन पर्यवेक्षण, मॉनिटरींग या बाबी येतात विशेषत: खालील क्रियाकल्पांचा यामध्ये समावेश होतो.

- क्षेत्र आधारित मॉनिटरिंगसाठी विशेषज्ञांचा संच बनविला जातो.
- नियमित स्वरूपात समुदाय आधारित आकडेवारी एकत्रित करण्यात येते.
- उपलब्ध परीक्षण आणि मुल्यमापन अध्ययन केले जाते.
- संशोधन कार्ये केले जातात.
- जिल्ह्यांमध्ये जेथे महिला साक्षरता कमी आहे तिथे विशेष कार्यावर भर दिला जातो.
- अनुसूचित जाति जमातिमधील मुलींचे शिणाचे विशेष प्रकारे मॉनिटरींग करण्यात येते.
- शिक्षण व्यवस्थापन माहिती तंत्रज्ञानावर विशेष खर्च केला जातो.
- दृश्य मॉनिटरींग प्रणालीसाठी तक्ते, पोस्टर, स्केच पेन, ओ. एच. पी., दृक्श्राव्य उपकरणे इ. वर खर्च केला जातो.

**v) शाळा अनुदान** – या योजने अंतर्गत प्रत्येक शाळेला 2,000 रु. अनुदानाच्या स्वरुपात दिले जाते. या अनुदानात 1000 रुपये शाळेच्या ग्रंथालयाच्या सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि उर्वरीत रक्कम 1000 रु. खराब झालेल्या शालेय उपकरणांना दूरूस्त करण्यासाठी केला जातो. या व्यतिरिक्त उर्वरीत रक्कमेचा उपयोग शाळा सुशोभिकरण – फर्निचर दूरूस्ती, वाद्य यंत्राची खरेदी वा दूरूस्ती आणि शाळेचा सर्वांगिण विकासासाठी केला जाऊ शकतो.

**vi) शिक्षक अनुदान** – वर्गानुसार संपादनामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि शिक्षक सहाय्यक साधन सामुग्री निर्मितीसाठी प्रत्येक शाळेला 500 रु ची अनुदान रक्कम दिली जाते.

**vii) शिक्षक प्रशिक्षण** – आपण जाणतो कि, सर्व मुलांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण प्रदान करणे हे सर्व शिक्षा अभियानाचा मुख्य हेतू आहे. तसेच या योजनेअंतर्गत शिक्षकांना सतत योग्य वेळी प्रशिक्षण देणे हे देखील या योजनेचा हेतू आहे कारण गुणवत्तापूर्ण शिक्षण हे गुणवत्तायुक्त शिक्षकावर आधारित आहे.

या प्रशिक्षणासाठी विशेष कार्यनीती पुढील प्रमाणे सांगता येतील.

- शिक्षकांना प्रशिक्षित करणे तसेच पुन: प्रशिक्षण देणे.
- या प्रशिक्षणाद्वारे शिक्षकांना नवीन पाठ्यक्रम आणि पाठ्यपुस्तकांची ओळख करून दिली जाते.
- शिक्षकांना राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCF) याची ओळख करून देणे.
- परीक्षेतील सुधारणा करण्यासाठीचे उपाय सुचविणे
- श्रेणी प्रणाली आणि मुल्यमापन व ग्रेडींगचे प्रभाव स्पष्ट करणे.
- शिक्षकांना समावेशित शिक्षणासाठी प्रशिक्षण देणे.
- गुणवत्तापूर्ण शिक्षणाची योजना बनवून ती कार्यान्वित करणे.

शिक्षक प्रशिक्षणाचे कार्य डाइट (DIET) कडे आहे. DIET शिक्षक प्रशिक्षणासंबंधी गरजा ओळखून अनुकूल शिक्षकांसाठी प्रशिक्षण योजना कार्यक्रम तयार करतात. या प्रकारे प्रशिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यात सुधारणा केली जाते. जिल्हानिहाय 300-350 संसाधन शिक्षक तयार केले जातात.

Notes

प्राथमिक शिक्षकांना शैक्षणिक प्रक्रिया, बाल मानसशास्त्र, अध्यापन, मुल्यमापन, प्रक्रिया आणि पालक प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण दिले जाते.

- **दूरस्थ शिक्षण –** दूरस्थ शिक्षण कार्यक्रम (DEP) हा सर्व शिक्षा अभियाना एक राष्ट्रीय घटक असून भारत सरकारच्या मानव संसाधनद्वारा संचलित आहे. दूरस्थ शिक्षण कार्यक्रमाला कार्यान्वित करण्याचे दायित्व इग्नूला सोपविण्यात आलेले असून त्या राज्य व केंद्रशासित प्रदेश सहाय्य देत आहेत. शिक्षक तसेच प्राथ. शिक्षणाशी संबंधित सर्व कर्मचाऱ्यांचे सशक्तीकरण करण्यासाठी सर्व शिक्षा अभियानाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. याच्या माध्यमातून वर्ग अध्यापनाला बहूआयामी पॅकेज सारखे स्वयं–अध्ययन साहित्य दृक–श्राव्य कार्यक्रम रेडिओ आकाशवाणी ब्रॉडकास्ट टेली कॉन्फरन्सींग इ. ने प्रेरित केले जाते. शाळेचे दूरस्थ शिक्षणाशी केवळ एक मोठा जनसमुदाय जोडणे शक्य नाही. याच्याशी तुम्ही सहमत नसाल परंतु याद्वारे सर्वांना एकसारखे समान प्रशिक्षण मिळू शकते.

सर्व शिधा अभियानातील विविध मानदंड
↓
1. वैकल्पिक तसेच नवीन शिक्षण पद्धती (AIE)
↓
2. लोक कार्य
↓
3. नवनवीन क्रियाकल्प
↓
4. विद्यालय अनुदान
↓
5. संशोधन आणि मुल्यांकन (R & E)
↓
6. शिक्षक अनुदान
↓
7. शिक्षक अनुदान
↓
8. दूरस्थ शिक्षण

## 6.7 मध्यान्ह भोजन व्यवस्था आणि त्याचे सर्व शिधा अभियानातील प्रमुख योगदान

मध्यान्ह भोजन योजन (Mid day meal - MDM) भारतात एक लोकप्रिय भोजना असून तिचा प्रारंभ 1960 च्या दशकात झाला. हे आपणास माहीतच आहे. या योजनेअनुसार शाळेच्या सर्व कामाच्या दिवशी विद्यार्थ्यांना मोफत भोजन दिले जाते. या योजनेचा मुख्य हेतू असा की, विद्यार्थी शाळेत उपाशीपोटी राहू नयेत, विद्यार्थ्यांच्या नावनोंदणीत वाढ तसेच अधिकाधिक मुलांची उपस्थिती वाढविणे असा आहे. या व्यतिरीक्त या योजनेची फलप्राप्ती म्हणजे सर्व जाती धर्माचे विद्यार्थी एकत्र बसून एकाच प्रकारचे अन्न ग्रहण करतील. ज्यामुळे त्यांच्या सामाजिकरणात वाढ होईल आणि कुपोषणाचा सामना करता येईल. या योजनेचा अप्रत्यक्ष लाभ असा होईल की महिलांना व्यवसाय प्राप्ती होईल व त्यामुळे त्यांचे सामाजिक सशकितकरण होईल.

**प्राथमिक शिक्षणाला पोषण संबंधी सहाय्यता देण्यासाठीचे राष्ट्रीय कार्यक्रम**

या कार्यक्रमांच्या प्रक्रियेअंतर्गत भारत सरकार शाळांना मोफत अन्नधान्य देईल आणि अन्न शित्तजविण्यासाठी उपयुक्त अन्न पदार्थ साधन सामग्रीची खरेदीची किंमत राज्य सरकार देईल.

Notes

कारण, अधिकतर राज्य सरकार या कार्यासाठी सहमत होते. तसेच, भारत सरकारकडून प्राप्त अन्नधान्य विद्यार्थ्यांच्या पालकांपर्यंत सरकारकडून पोहचविण्यात येऊ लागले. या प्रक्रियेला Dry Rations प्रक्रिया म्हटले गेले. परंतु नोव्हेंबर 2001 मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे सरकारला सूचित केले गेले की त्या अंतर्गत मुलांना शिजविलेले अन्न देण्याची तरतूद देण्यात आली. या आदेशाला जून 2002 पासून लागू करावयाचे होते. परंतु बऱ्याचश्या सरकारने हा आदेश फेटाळून लावला. त्यानंतर न्यायालयाच्या दबावाकारणाने आणि भोजनाचा अधिकार अधिनियमाच्या कारणास्तर राज्य सरकारने शिजवलेले अन्न देण्यास सुरूवात केली. मे 2004 मध्ये केंद्र सरकारकडून हे ठरविण्यात आले की, अन्नाचा पूर्ण खर्च केंद्र सरकार करेल आणि इतर आर्थिक खर्च राज्य सरकारकडून देण्याचे निश्चित करण्यात आले.

## 6.8 सर्व शिक्षा अभियानातील मुख्य त्रुटी / उणीवा आणि सर्व शिक्षा अभियान यशस्वी कार्यान्वित करण्यासाठी उपचारात्मक उपाय

खाली दिलेल्या सारणीचा अभ्यास करा. सर्व शिक्षा अभियान हे वर्तमान स्तितीमध्ये प्राथमिक शिक्षणाचा मुख्य घटकाच्या स्वरूपात कार्यान्वित करण्यात आले होते. परंतु या अभियानात कोणकोणत्या मुख्य उणीवा आहेत आणि त्या दूर करण्यासाठी कोणकोणते उपचारात्मक उपाय करता येतील ते खालीलप्रमाणे :

| क्र. | चूका / उणीवा | उपचारात्मक उपाय |
|---|---|---|
| 1) | आधारित स्तरावर लोकांचा सहभाग कमी प्रमाणात आहे. | प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणासाठी आधारित स्तरावर लोकांच्या सहभागाला प्रोत्साहित करणे अनिवार्य आहे. त्यामुळे कार्यक्रम यशस्वी होवू शकेल. |
| 2) | ग्रामीण शिक्षण / व्यवस्थापन आणि विकास समितींची अनुपस्थिती | अधिकतर राज्यांमध्ये गट किंवा शाळा स्तरावर ग्रामीण शिक्षण समिती / शाळा व्यवस्थापन / आणि विकास समिती / शहरी झोपडपट्टी स्तरावरील शिक्षण समिती पालक–शिक्षक संघ इ. स्थापन करण्यात आले. त्यांची भूमिका आणि कार्य निश्चित स्वरूपात स्पष्ट करणे आवश्यक आहे. |
| 3) | प्रशिक्षण गरजांची आणि समुदायाचे सहभागीत्व यांचा प्रभाव मुल्यमापन करणे बाकी आहे. | लोक समुदायाचा सहभाग आणि संबंधित क्रियाकलाची योजना आणि त्याचे प्रत्यक्ष कार्यन्वयन यावर सूचना मिळविण्यासाठी प्रशिक्षण आराखडा आणि सर्व शिक्षा अभियानाची प्रगती अहवाल यांची पडताळणी केली पाहिजे. विशिष्ट कार्यनीतीसाठी एक स्वंयचित आराखडा बनविणे आवश्यक आहे. |
| 4) | अल्पसंख्यांक आणि वंचित वर्गाच्या मुलींना शिक्षण देण्यासाठी नवीन पद्धतींचा अभाव आहे. | मुलींचे शिक्षण पूर्ण बाल्यावस्था देखभाल आणि शिक्षण अनुसूचित जाति/जमाती अल्पसंख्यांक समुदाय, सुविधा वंचित विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि उच्च प्राथमिक स्तरासाठी संगणक शिक्षणास प्रेरणा देणे आवश्यक आहे. |
| 5) | योजना निर्माण प्रक्रियेमध्ये लोकसमुदायाच्या सहभाग पूर्णपणे घेण्यात आलेला नाही. | योजना बनविण्यासाठी प्रक्रियेत लोकसमुदायांचा पुरेसा सहभाग असावा. तसेच कर्मचाऱ्यांच क्षमता निर्मितीमध्ये सहाय्यता दिली पाहिजे. योजना निर्मिती प्रक्रियेत स्थानिक विशिष्टता आणि लोकांच्या शैक्षणिक गरजा |

Notes

| | | |
|---|---|---|
| | | आणि इच्छा प्रतिबिंबित झाले पाहिजे हे सर्व काम समुदाय आणि इतर बाह्य समुहाच्या चर्चात्मक बैठकीतील निष्कर्षांवर आधारीत असावी. |
| 6) | वय लिंगानूसार बालकांच्या संख्येवर अद्ययावत सूचनेचा अभाव | नाव नोंदणी आणि शाळाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या 6-14 वर्ष वयाच्या बालकांची अद्ययावत सूचना जी लिंग व वय अनुसार, अनुसूचित जाति / जमाति, अल्पसंख्यांक ग्रामीण, शहरी दृष्टीने असावी. |
| 7) | शैक्षणिक प्रक्रियेमध्ये संगणक वापराबाबत सूचनेचा अभाव | संगणक सहाय्याने अध्ययन (CAL) ज्यामध्ये सरकारी यू. पी. एस. ची सारख्या लाभार्तीची संख्या संगणक सहारियत अध्ययनात प्रशिक्षित शिक्षक यांची संख्या तसेच एक वर्षात प्राप्त होणाऱ्या यु. पी. एस. ची संख्या यावर पूर्णपणे सूचना देणे आवश्यक आहे. |

### 6.8.1 उपस्थिती वाढविण्यासाठी उपचारात्मक उपाय

सर्व शिक्षा अभियानास सफलतापूर्वक लागू करण्यासाठी उपयुक्त उपायांचा विचार करून विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये सुधारणा करता येईल.

खाली दिलेल्या सारणी 6.2 पहिल्या कॉलममध्ये संभाव्य कारणांविषयी सांगण्यात आले आहे की ज्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत येण्यासाठी अडचणी येतात, अथवा मुले शाळाबाह्य असतात. दुसऱ्या कॉलममध्ये संभाव्य कार्यनीतीवरील उपाय सुचविलेले आहेत.

| विद्यार्थी शाळाबाह्य असण्याची कारणे | वर्गात उपस्थिती वाढविण्यासाठी संभाव्य उपाय |
|---|---|
| • मुलांना घरासाठी उत्पन्न वाढविण्यासाठी काम करावे. | • पालकांना हे समजावून दिले पाहिजे की, शाळेत जाणे हे आई–वडिलांसाठी लाभप्रद गोष्ट आहे. |
| • निर्धनता / आर्थिक कारण | • शैक्षणिक कर्जांमध्ये वाढ करणे. |
| • घरगुती कामांमध्ये सहाय्यता द्यावी लागते. | • आई–वडिलांमध्ये जाणीव जागृती निर्माण करण्याची आवश्यकता आहे. |
| • आई वडिलांना शिक्षणाचे महत्त्वाची जाणीव नाही. | • पालकांमध्ये यासंदर्भात जाणीव जागृती निर्माण केली पाहिजे. |
| • छोट्या बहीण भावांची देखभाल करावी लागते. | • पालकांमध्ये यासंदर्भात जाणीव जागृती निर्माण केली पाहिजे. |
| • शाळेची स्थिती सुविधाजनक नाही. | • विद्यर्थ्यांच्या घराजवळ शाळा स्थापन करून त्यांना येण्याजाण्यासाठी प्रवासाच्या सोयी सुविधा दिल्या पाहिजे. |
| • विद्यार्थी शारीरिक / मानसिकरित्या आजारी असेल तर | • शिक्षकांना आवश्यक ते प्रशिक्षण दिले जावे आणि त्यांना विशेषत: मानवी व्यवहारासंबंधी कौशल्यांची जाणीव करून देणे गरजेचे आहे. |
| • विद्यार्थ्यांचे वय शाळेत जाण्यासाठी कमी असते. | • उपयुक्त सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. |

**प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासंबंधी कार्यनीती – II**

| | |
|---|---|
| • शाळेत अध्यापन कार्य आनंददायक नाही. | • के. जी. चे वर्ग वाढविण्यात आले पाहिजेत. |
| • विद्यार्थ्यांसोबत शिक्षकाचे वर्तन योग्य नाही. | • अध्यापनात आधूनिक अध्यापन पद्धतींचा प्रयोग केला पाहिजे. |
| • एकाच इयत्तेत वारंवार नापास होणे. | • शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 मध्ये निर्धारीत केलेल्या योजनांचा स्विकार केला जावा. |
| • विद्यार्थी अभ्यासात रुची आवड घेत नाही. | • पाठ्यक्रमास विद्यार्थ्यांची योग्यता आणि आवश्यकतेनुसार रुपांतरीत करावे. |

Notes

**क्रियाकल्प – 1**

1) विद्यार्थ्यांची संख्या वाढीसाठी कोणतेही पाच उपाय सुचवा.

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

## 6.9 शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 आणि सर्व शिक्षा अभियानाचे एकत्रीकरण / संयोगीकरण

1 एप्रिल 2010 पासून शिक्षणाचा अधिकार अधिनियम लागू करण्यात आला आहे. या अधिनियमाअंतर्गत 6 - 14 वर्ष वयाच्या प्रत्येक बालकास त्याच्या घराजवळील शाळेत प्राथमिक शिक्षण दिले जाईल.

परंतु या स्थितीमध्ये प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळांच्या कमतरतेमुळे अधिकारी स्तरावरील प्रणाली कोणत्या प्रकारचे शैक्षणिक अधिकार अधिनियमास शैक्षणिक सत्रात लागू करण्यासाठी कोणती योजना मनवतात ही पाहण्यासारखी बाब आहे. सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत निर्धारीत मापनदंडानुसार बालकांना मोफत तसेच सक्तीचे प्राथमिक शिक्षणाचा अधिकार आहे. भारत सरकारच्या मानदंडानुसार प्रत्येक 300 लोकसंख्या असणाऱ्या भागांसाठी एक कि. मी. अंतरावर प्राथमिक शाळा असावी आणि 800 लोकसंख्या असणाऱ्या भागांसाठी दोन कि. मी. अंतरावर एक उच्च प्राथमिक शाळा असावी. सध्या बेसिक शिक्षण विभागाच्या रेकॉर्ड अनुसार जिल्ह्यात 1032 प्राथमिक शाळा आणि 352 उच्च प्राथमिक शाळा आहेत. याव्यतिरिक्त जिल्ह्यात 780 अन्य मान्यता प्राप्त प्राथमिक शाळा आणि 570 उच्च प्राथमिक शाळा आहेत. या संख्यांना एकत्र केले तर जिल्ह्यात एकूण 1912 प्राथमिक शाळा असून 929 उच्च प्राथकि शाळा आहेत. परंतु सर्व शिक्षा अभियानाच्या मानदंडानुसार ज्या जिल्ह्यात 31-38-671 लोकसंख्या (2001 ची जनगणना) असेल, 10432 प्राथमिक शाळा तसेच 3923 उच्च प्राथमिक शाळा असणे गरजेचे आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात इतर अन्य खाजगी, गैरसरकारी शाळा आणि मदरसे आहेत.

सर्व शिक्षा अभियान केंद्रिय सरकारचे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्यक्रम असून त्याची सुरुवात 2001 मध्ये करण्या आली. निर्धारित वेळेच्या आत प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे हा याचा हेतू आहे. या योजनेला राज्य सरकार अंतर्गत लागू करण्यात आले आहे. शाळाबाह्य विद्यार्थी (6-14 वर्ष वयाचे) यांना विविध कार्यनीतींचा वापर करून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्यांना 8 वर्षीय प्राथमिक शिक्षण देणे हा या योजनेचा मुख्य केंद्रबिंदू आहे. हे कार्य 2010 पर्यंत पूर्ण

Notes

करणे गरजेचे होते. परंतु पूर्ण झाले नाही. भारतीय संविधानाच्या 86 व्या संविधान दूरुस्तीनुसार, प्राथमिक शिक्षणाला मुलभूत अधिकाराचा दर्जा देण्यात आला आहे आणि आता 2009 मध्ये 1 एप्रिल 2010 पासून मोफत आणि सक्तीचे शिक्षण अधिकार लागू करण्यात आले आहे. याचा अर्थ म्हणजे प्रत्येक बालक बालिका 6-14 वर्ष वयातील शाळेत आले पाहिजेत. या योजनेची पूर्तता करणे हे आपले कर्तव्य आहे.

राष्ट्रीय स्तरावर अखिल भारतीय शैक्षणिक सर्वेक्षणानुसार देशभरात 3878 शहरी केंद्र असावेत ज्याची अंदाजे लोकसंख्या 195 करोड आहे. यामध्ये एकूण शाळा 74546 असून प्राथमिक शिक्षणाच्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध आहेत. याव्यतिरिक्त तुम्हाला याची जाणीव आहे की 5 ते 14 वर्ष वयाचे 12 लाख भारतीय बालके असे आहेत की जे निर्मिती आणि उत्पादनासारख्या धोकादायक व्यवसायात काम करत आहेत.

शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 च्या सर्व शिक्षा अभियानाची व्यापकता आणि कार्यन्वयाची कार्यनीतींसाठी आवश्यक आहे आणि हे अनिवार्य आहे की, सर्व शिक्षा अभियानाचे स्वरूप, कार्यनीती तसेच मानदंड यांचे शिक्षणाचे अधिकार अधिनियमासोबत मेळ असला पाहिजे. या संदर्भात मानव संसाधन विकास मंत्रालयाने श्री अनिल बोर्डिया यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली जी सर्व शिक्षा अभियान आणि शिक्षण अधिकार अधिनियम यासाठी उपयुक्त कार्यवाहीसाठी उपाय सुचवेल.

## 6.10 सारांश

वरील प्रकरण प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण संबंधी कार्यनीती II यामध्ये सर्व शिक्षा अभियानाची पार्श्वभूमी व त्याच्या विविध घटकांचे स्पष्टीकरण केले. तसेच प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणात प्राथमिक शिक्षणाचे योगदान स्पष्ट केले आहे. तसेच पुढे सर्व शिक्षा अभियानाचे उद्देश या अभियानाची व्यूह रचनांचे विवेचन केले आहे. या संदर्भात आपण मध्यान्ह भोजन व्यवस्थेच्या योग दानावर चर्चा केली आणि कशी विद्यार्थ्यांच्या शालेय अवबोध आणि उपस्थित वृद्धी झाली ते आपण पाहिजले. सर्व शिक्षा अभियानाच्या मानदंडावर विचार केला. शेवटी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची उपलब्धता वाढविण्यासाठी शाळेत कोण कोणत्या सोयी सुविधांचा विकास झाला पाहिजे तसेच आर. टी. ई. अधिनियम 2009 आणि सर्व शिक्षा अभियान यांचे संयोगीकरण याची समीक्षा केली.

## 6.11 संदर्भ ग्रंथ


- www.education for all india. com
- www.indianexpress.com/news/lesson-learnt-mp-monitors-ss
- depssa.ignou.ac.in/wiki/index.php/publicetions.
- feb 2010 - Bhamika : A Hand Book on Roles as Responsibilities of Head Mastens/Head Techers under SSA Bihar, A Guide Book for Early child care.


## 6.12 घटक अभ्यास

1) सर्व शिक्षा अभियानाचे मुलभूत लक्षण कोणते आहे?
2) परिसरातील 6 - 14 वर्ष वयातील विद्यार्थी सर्व शिक्षा अभियानांतर्गत शिक्षण घेत असतील तर त्याचा अहवाल तयार करा.

Notes

# घटक 7 : सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचे आयोजन व व्यवस्थापन

**उपघटक :**


7.0 प्रस्तावना

7.1 अध्ययन उद्देश्य

7.2 प्राथमिक शिक्षणाच्या व्यवस्थापनाचे विकेंद्रिकरण

7.2.1 केंद्रिकृत अंतर्गत विकेंद्रिकृत प्रणाली

7.2.2 विकेंद्रिकरणावर भारताचा अनुभव

7.3 सूक्ष्म स्तरावर नियोजन

7.3.1 नियोजनाचा अर्थ

7.3.2 लोकसमुदाय प्रभुत्व

7.3.3 सूक्ष्म नियोजन प्रक्रियेत समुदाय सहभागी करण्याच्या विविध पायऱ्या

7.3.4 डी. ई. ओ., डी. आर. सी. (डाइट), बी. ई. ओ (बी. आर. सी.) आणि सी. ई. ओ. (सी. आर. सी) यांच्या भूमिका आणि कर्तव्य

7.4 प्राथमिक शिक्षणात अधिशासन आणि व्यवस्थापन संबंधी अडचणी

7.4.1 अभिशासनासंबंधी समस्या

7.4.2 शिक्षकांची भरती आणि व्यवस्थापन

7.4.3 शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका

7.5 शाळा व्यवस्थापनेद्वारे शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 (आर. टी. आई. एक्ट 2009)

7.6 प्रभावी व्यवस्थापन आणि क्षमता निर्मितीसाठी नेटवर्क

7.6.1 प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाच्या व्यवस्थापनासाठी सूचना तसेच संप्रेषण तंत्रज्ञान (आई. सी. टी.)

7.6.2 शाळा नेट काय आहे?

7.6.3 शाळा नेटचे कार्य आणि सुविधा

7.6.4 शाळा नेट – एक शैक्षणिक व्यवस्थापन सूचना प्रणाली स्वरूपात

7.7 आर्थिक व्यवस्थेसंबंधी आराखडा

7.8 सारांश

7.9 संदर्भ ग्रंथ

7.10 घटक अभ्यास


## 7.0 प्रस्तावना

प्रकरण 5 आणि 6 मध्ये शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 या अंतर्गत प्राथमिक शिक्षणास सर्व बालकांसाठी (6 ते 14 वय वर्ष) मुलभूत अधिकार बनविण्यात आला. या प्रकरणामध्ये प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरणासाठी अवलंबिलेली कार्यनीती सुद्धा स्पष्ट करण्यात आली होती. एक शिक्षकाच्या स्वरूपात आपले हे कर्तव्य आहे की, शिक्षणाचा अधिकार अधिनियम याची मूळ भावना अनुसार तिला शाळेत कार्यान्वित करावे. आतापर्यंतच्या अनुभवातून सरकार सर्व बालकांना अशक्त कुपोषित, अल्पसंख्याक वर्गाशी संबंधित, प्रवासी कुटुंबातील बालके अनुसूचित जाति/जमाति, आदिवासी बालके, शालाबाह्य विद्यार्थी असे विद्यार्थी की ज्यांची नावनोंदणी झालेली नसेल, ते मध्येच शाळा सोडलेले असतील त्यांना अनेक प्रयत्नांतून शाळेत आणण्याच प्रयत्न करत आहेत.

Notes

या कायद्याच्या कार्यान्वियासाठी सरकारने वरपासून निम्न स्तरापर्यंत विस्तृत कार्यक्रम तयार केला आहे. कारण शिक्षण सर्वापर्यंत पोहोचले जावे. या प्रकरणात आपण शिकणार आहोत की, एक शिक्षकाच्या रूपात तुम्ही या अधिनियम वा सरकारी तंत्राचा उपयोग कसा करणार आहात. जेणे करून विद्यार्थ्यांना त्यांचा शिक्षणाचा अधिकार देण्यासाठी सहाय्य करता येईल. यासाठी तुम्हाला युई. ई. चा कार्यान्वित राष्ट्रीय, राज्य, जिल्हा, तालुका आणि ग्रामीण स्तरावर योजनाबद्ध कसे केले जाते. यामुळे तुम्हाला शाळेला संसाधने उपलब्ध करण्यासाठीचे मार्ग यासाठी कोणाशी संपर्क करावा लागतो हे जाणून घेण्यासाठी मदत होईल या प्रकारचे ज्ञान, शाळा तसेच स्थानिक प्रशासन स्तरावर निर्णय प्रक्रियेत समर्थपणे सहभागी होण्यासाठी सहाय्यता करेल.

## 7.1 अध्ययन उद्देश्य :

**या प्रकरणाच्या अध्ययनातून आपणास माहिती होईल की,**

- प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकरणासाठी आवश्यक संसाधनाची नावे सांगता येतील.
- यू. ई. साठी उपयुक्त विविध योजनांचे विवेचन करता येईल.
- शाळेच्या आसपास क्षेत्रांतून येणारे विविध विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडथळ्यांचे विश्लेषण करता येईल.
- ज्या क्षेत्रात शाळा आहेत तेथे सद्य लोकसमुदाय संसाधनांच्या उपलब्धतेवर चर्चा करता येईल.
- प्राथमिक शिक्षणास बालकांसाठी सुखद तसेच अनुभावधारीत बनविण्यासाठी विशेष क्रियाकल्पांचे नियोजन आणि कार्यान्वय करता येईल.
- अध्यापन करताना तुमच्यासमोर येणारी आव्हानांशी सामना करण्यासाठी पालक, स्थानिक प्रशासन, स्थानिक नेते. विशेषज्ञ तसेच अन्य संघटनाच्या भूमिकांचे वर्णन करता येईल.

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरणाच्या व्यवस्थापन तथा नियोजन करण्यासाठी स्विकारलेली कार्यनीती तसेच आराखडा हे एक संदर्भ बिंदू चे काम करते. उपलब्ध संसाधनांचा कुशलतापूर्वक उपयोग करताना उद्देशांची प्राप्ती साठी एक सुनियोजित योजना असा अभिप्राय या कार्यनीतीमुळे मिळतो.

## 7.2 प्राथमिक शिक्षणाच्या व्यवस्थापनाचे विकेंद्रिकरण

### केंद्रित विरुद्ध विकेंद्रित व्यवस्थापन

### 7.2.1 केंद्रिकृत विकेंद्रिकृत प्रणाली

कोणत्याही केंद्रिकृत शिक्षण प्रणालीमध्ये निर्णय क्षमता, मॉनिटरींग आणि व्यवस्थापनाचे कार्य राष्ट्रीय स्तरावर शिक्षण मंत्रालयाच्या घातामध्ये तसेच राज्य स्तरावर शिक्षण विभागाच्या अंतर्गत केंद्रित असते. केंद्र तसेच राज्य सरकार शिक्षण प्रणालीच्या सर्व घटकांचे नियमन करते. तसेच नियंत्रण आणि व्यवस्थापन, योजना नियमन, शिक्षण वेतन, सेवापूर्व व सेवांतर्गत प्रशिक्षण, पाठ्यक्रम निर्मिती अध्ययनाचा निम्न स्तराची पातळी गाठणे इ. कार्य करते. कारण काही बाबी अशा असतात की ज्यांना शाळा कर्मचारी स्थानिक स्तरावर संपादन करू शकतात. परंतु असे कार्य जसे की अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तक शिक्षणाचे माध्यम इ. च्या विषयाबाबत शिक्षकास अधिक अधिकार दिले जातात.

Notes

या व्यतिरिक्त एका विकेंद्रिकृत प्रणालीमध्ये स्थानिक / जिल्हा ग्रामीण पातळीवर प्राथमिक शिक्षणाच्या विविध घटकावर पर्यायी अधिकार दिले जातात. तथापि काही संबंधित अधिकार केंद्र, राज्य किंवा जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांकडे असतो. व्यवहारात प्राथमिक शिक्षण प्रणालीमध्ये केंद्रिकृत आणि विकेंद्रिकृत या दोन्ही प्रणाली काम करतात. बऱ्याचशा राज्य सरकारांनी प्राथमिक शिक्षणाच्या विकेंद्रिकरण प्रक्रियेला अगोदरच सुरुवात केलेली आहे. प्राथमिक शिक्षणाची सुरुवातीचे उत्तरदायित्वाचा आराखडा क्रियाशील प्रणाली तयार करण्यासाठी एक नवीन प्रयत्न आणि त्याचे संचालन करण्यासाठी अनेक राज्य सरकारांनी नवीन कायद्याची तरतूद केली आहे. काही राज्य सरकारांनी जिल्हा स्तरावर एक प्राथमिक शिक्षण प्रदान करण्यासाठी लोक समुदाय आणि खाजगी संघटनांविषयी सहाय्यता आणि सहभागांचे समर्थन केले आहे. सर्वांगिण विचार करता एक केंद्रिकृत प्रणालीपेक्षा विकेंद्रिकृत प्रणालीसाठी रुपांतरण ही एक मंद प्रक्रिया आहे. निर्णय प्रक्रियेचा फोकस हा त्या–त्या राज्यातील जिल्हा–उपजिल्हा आणि लोक समुदाय स्तरावर आणून देश प्राथमिक शिक्षणाचे विकेंद्रिकरणाच्याकडे विकसित होईल.

विकेंद्रिकरणाचे फलस्वरूप जिल्हा स्तरीय आणि उपजिल्हा स्तरीय अधिकाऱ्यांच्या हातामध्ये अधिकाधिक उत्तरदायित्व सोपविण्यात येते. तसेच अधिकारी शैक्षणिक सेवांना उपभोक्त्यांच्या जवळ आणून शिक्षक शाळा तसेच स्थानिक प्रशासनास बालकांच्या आवश्यकतेनुसार क्रियाशील बनवते.

विकेंद्रिकरणाचे महत्त्वपूर्ण उद्देश्य म्हणजे प्राथमिक शिक्षणात निपक्षता आणि समावेशन सुनिश्चित करणे हा आहे. जोपर्यंत हे बदल सुनियोजित होत नाहीत आणि कार्यान्वित होत नाहीत तोपर्यंत हे उद्देश्य पूर्णपणे प्राप्त होणार नाहीत. जसे राष्ट्रीय शिक्षण निती 1986 ने विचार केला होता. आणि उत्तरवर्ती बऱ्याच समित्यांनी यावर भर दिला, राष्ट्रीय सरकार संस्थागत बदलांमध्ये समन्वयनमध्ये तसेच, राज्य स्तरावर प्राथमिक शिक्षणाचे राष्ट्रीय लक्ष प्राप्त करण्यासाठी होणाऱ्या प्रगतीस मॉनिटर करण्यात एक भूमिका बजावत राहील.

परंतु शिक्षणाचे विकेंद्रिकरणामध्ये काही मर्यादा पण आहेत. प्राथमिक शिक्षणाचा आर्थिक / वित्तीय, शक्ती आणि उत्तरदायित्वाचे विभाजन स्थानिक उत्तरदायित्त्व आणि कुशलतेस प्रभावित करू शकतो. यू. ई. ई. चे उद्देश्यांची प्राप्तीमधील असफलतेस प्रत्येक स्टेकहोल्डर एक दुसऱ्यांवर दोषारोपन करतो.

प्राथमिक शिक्षणाचे विकेंद्रिकरण आणि व्यवस्थापनाचा विचार राष्ट्रीय शिक्षण धोरण 1986 द्वारा स्थापित एक लक्ष्य आहे. शिक्षण नितीची ही धारणा आहे की, प्राथमिक शिक्षणाचे व्यवस्थापनात ग्रामीण शिक्षण समितीच्या (UEC) रूपात प्रत्यक्ष स्वरूपात लोकसमुदायाचा हस्तक्षेप आहे. प्लान ऑफ एक्शन (POA) 1992 ने प्रत्येक बालकाची शैक्षणिक प्रगतीवर नियमित स्वरूपात दृष्टी ठेवण्याच्या प्रक्रियेच्या रूपात सूक्ष्म आयोजनावर भर दिला. पी. ओ. ए. चा उद्देश्य हा प्रत्येक बालक आपल्या पसंतीच्या ठिकाणी अभ्यास करेल आणि कमीत कमी 8 वर्षाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करू शकेल असे सुनिश्चित केले.

## 7.2.2 विकेंद्रिकरणावर भारताचा अनुभव

या गोष्टीशी तुम्ही सहमत असाल की, शिक्षण प्रणाली ही त्या समाजाहून वेगळे कार्य करू शकत नाही. आपली सामाजिक व्यवस्था, वर्ग, जाती, लिंग, तसेच धर्म इ. वर आधारित बऱ्याच स्तरावर विभागलेली दिसून येते. खूप मोठ्या सुविधावंचित श्रेणीच्या समाजातील वर्गांसाठी निवारा, पाणी, स्वच्छता, वीज, आरोग्य सुविधा, शिक्षण इ. सारख्या मुलभूत सुविधांचा अभाव आहे. बेसिक शिक्षण प्राप्त केल्याविना जीवन जगण्यासाठी हा गट संघर्ष करत आहे. भारतीय संविधानाच्या 73 व्या आणि 74 व्या संविधान दुरूस्तीने स्थानिक स्वशासनासाठी एक अनुकूल वातावरण निर्माण केलेले असून त्यामध्ये एक अधिक गतिशील आणि क्रिया अनुकूल भूमिका प्रदान करता येईल. या

Notes

परीवर्तनाने महिला, अनुसूचित जाति–जमाति, अल्पसंख्यांक तसेच अन्य व्यक्तिंसाठी आवाज दिला आहे. त्यामुळे ते आपल्या विरोधात होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवू शकतात. या संदर्भात इतर अनुभव निम्नलिखित योजनांद्वारे प्रतिबिंबित होती.

- समावेशीत बालविकास योजना (ICDS) अनुभवाने दर्शविले आहे. की, जन्मापासून 6 वर्षाच्या सुविधा वंचित व असुरक्षित बालकांच्या स्वास्थ्यासंबंधी तसेच पोषणासंबंधी स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी लोकांचा सहभाग अतिशय महत्त्वपूर्ण आहे.
- राष्ट्रीय साक्षरता मिशनने हे स्पष्ट केले आहे की, जेव्हा जिल्हा स्तरावर साक्षरता वाढविण्यासाठी अभियानाचे रूप स्विकारले गेले तेव्हा लोकांनी सक्रियता पूर्ण रीतीने भाग घेतला त्यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी याचा प्रभाव मोठा होता.
- जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम (डी. पी. ई. पी) ज्याची नोव्हेंबर 1994 मध्ये सुरुवात झाली. हे योग्य होते की, सरकारने यु. ई. ई. साठी देशभरात डी. पी. ई. पी. कार्यनीतीला संचालित करण्याचा निर्णय घेतला.
- डाइटला जिल्हा शैक्षणिक पशिक्षण संस्था आपआपल्या राज्याच्या माध्यमातून जिल्हा स्तरावर प्राथमिक शिक्षणाची विकास योजना बनविण्यासाठी मुख्य दायित्व देण्यात आले. या संस्था अशा आहेत ज्या प्राथमिक शिक्षणाच्या प्रगतीवर नजर ठेवणे आणि समन्वय करण्यासाठी अंतिम स्वरूपात उत्तरदायी आहे.

नियोजन आणि व्यवस्थापनामध्ये परिवर्तन करण्यासाठी शिक्षणाशी संबंधित व्यवसायिक तसेच प्रशासक जे शहरी स्थानीय प्रशासनावर आणि पंचायत राजसंस्था स्तरावर कार्य करत आहेत. त्यांना प्रशिक्षणासाठी सहाय्य देण्याची सहाय्यता देणे आवश्यक आहे. या उद्देशाच्या प्राप्तीसाठी शिक्षणामध्ये स्थानिक स्तरावरील संस्थांना विविध राज्यांमध्ये मजबूत बनवले जात आहे. कारण इ. सी. सी. ई. किंवा आय सी. डी. एस. द्वारे निर्मित आधाराचे सहाय्य घेणे तुम्ही हे जाणता की, आई. सी. डी. एस द्वारे निर्मित आधाराचे सहाय्य घेणे. तुम्ही हे जाणता की आय. सी. डी. एस शाळा पूर्ण बालकांचे स्वास्थ्य आणि पोषणसंबंधी स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी स्थानिक समुदायाच्या समर्थनावर अवलंबून आहे. स्थानिक समुदायात सहभागी होण्यासाठी आई. सी. डी. एस. ला आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्वाधिक सफल कार्यक्रमांमध्ये एक मानले गेले आहे.

स्थानिक समुदायाचा सक्रिय सहभाग घेण्यासाठी खालील संस्थांना सहभागी करणे आवश्यक आहे.

- पंचायत राज संस्था
- शाळा व्यवस्थापन समिती
- ग्रामीण / शहरी वार्ड / स्लम स्तरीय शिक्षण समिती
- पालक–शिक्षक संघ
- माता–शिक्षक संघ
- आदिवासी स्वायत्त विकास समिती

या व्यतिरीक्त अन्य तृणमूल स्तरीय समित्या संम्मिलीत आहेत ज्यांचा हेतू प्राथमिक शिक्षण तसेच शाळांचे व्यवस्थापन असा आहे.

**सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम :**

सर्व शिक्षा अभियानाचे दोन महत्त्वाचे टप्पे आहेत.

i) ही प्राथमिक शिक्षणासंबंधी योजनांच्या कार्यान्वयनासाठी एक आराखडा तयार करते.

ii) देशभरात प्राथमिक शिक्षण प्रणालीस महत्त्वपूर्ण घटकांना शक्ति देण्यासाठी ही एक विशेष बजेट प्रक्रिया समवेत एक कार्यक्रम आहे.

**तुमची प्रगती तपासा 1**

1) विकेंद्रिकरणाकडून कोणता अभिप्राय आहे?

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

2) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरणासाठी एक विकेंद्रिकृत व्यूहरचना का अवलंबिली पाहिजे?

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

## 7.3 सूक्ष्म स्तरावरील नियोजन :

कार्यवाहीच्या अपयशामध्ये लोकांचा विविध योजनामधील लोक सहभागाच्या अभाव हे महत्त्वाचे कारण आहे. पंचवार्षिक योजनांच्या सुरुवातीपासून या गोष्टीवर भर दिलेला आहे की, योजनांची निर्मिती आणि तिच्या प्रत्यक्ष कारवाईमध्ये लोकांचा सहभाग निश्चित केले जाणे आवश्यक आहे. स्थानिक व्यक्तिंचा सक्रिया सहभाग आणि समर्थनाशिवाय स्थानिक स्तरावरील वास्तविक गरजा आणि आवश्यक संसाधनांची माहिती घेणे शक्य नाही. यालाच मूलभूत स्तरावरील नियोजन किंवा सूक्ष्म नियोजन असे म्हटले जाते याचा अर्थ म्हणजे 1) मुलभूत गरजांची माहिती घेण्यासाठी स्थानिक व्यक्तिंचा लाभार्थींचा सहभाग 2) खालील स्वरुपात प्राप्त संसाधनांना उपलब्ध करणे. i) उपयोगात येणारी सामग्री ii) सहयोगात्मक कार्य पद्धती iii) प्रोत्साही प्रयत्नांद्वारे संसाधनांची निर्मिती 3) उपलब्ध संसाधनांच्या आधारावर ग्रामीण योजना तयार करणे.

### 7.3.1 नियोजनाचा अर्थ

सामान्य शब्दांमध्ये नियोजनाचे खालील सूचक आहेत.

- लोकांच्या गरजा पूर्तीसाठी अथवा उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी पद्धतशीरपणे केलेली कार्यवाही.
- सर्वांगीण हेतूच्या प्राप्तीसाठी कार्यनीतींची ओळख आणि त्यांच्या विकासाच्या प्रक्रियेसाठी योजना बनविणे.
- योजना तसेच कार्यनीतींना कार्यान्वित करण्यासाठी संसाधनांना एकत्रित करणे. प्रगतीची देखरेख आणि या प्रभावाचे मुल्यांकन करणे.

### 7.3.2 सूक्ष्म नियोजन

शाळेच्या आसपास राहणाऱ्या सर्व बालकांसाठी शिक्षण प्रदान करणे. त्या गावात राहणाऱ्या सर्व बालकांना प्राथमिक शिक्षण उपलब्ध करण्यासाठी स्वामित्व आणि जबाबदारी सांभाळण्याचे निश्चित केले आहे. सर्व बालकांच्या गरजांवर फक्त एक शिक्षक लक्ष्य देवू शकत नाही. या प्रक्रियेतील सर्व लाभार्थी जसे महिला समुह, ग्रामीण शिक्षण समितीचे सदस्य, पंचायतराज संस्था सदस्य इ. न सहभाग घ्यावा लागेल. सर्व सहभागी व्यक्तिंच्या मदतीने हे सुनिश्चित करावे की, समाजातील सुविधावंचित बालकांसहीत सर्व बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देता येईल.

Notes

### 7.3.3 सूक्ष्म नियोजन प्रक्रियेत लोक समुदायाचा सहभाग घेण्यासाठीच्या पायाऱ्या / टप्पे

सूक्ष्म नियोजन प्रक्रियेमध्ये लोक समुदायाचा सहभाग घेण्यासाठी खालील पायऱ्यांचा समावेश करणे गरजेचे आहे.

**i) समुदायाचे सबलीकरण**

- यासाठी ग्रामीण शिक्षण समिती (VEC) शाळा व्यवस्थापन समिती (SMC) माता शिक्षिका संघ इ. ना प्रशिक्षित करण्यासाठी प्रशिक्षण कार्यशाळेची व्यवस्था केली पाहिजे. तसेच त्यांना क्षमतेचा विकास करणे आणि ते प्राथमिक शिक्षणासाठी बालकांच्या अधिकारांची ओळख करू शकतील आणि त्यांची उत्तरे शोधणे शक्य होईल.
- शिक्षणाचा अधिकार अधिनियमाच्या प्रक्रियेची लोक समुदायास जाणीव करून देण्यासाठी जागरूकता अभियान चालवले जावे. या व्यतिरिक्त या अभियानातून लोक आपली भूमिका आणि जबाबदारी प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात सरकारद्वारा केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची जाणीव होईल. या अभियानांतून खालील कारवाईत्मक योजनांचा समावेश करता येईल.
  - मीना अभियान
  - माता-बेटी मेळावा
  - महिला संमेलन
  - किशोरी मेळावा
  - बालक शिशु मेळावा
  - प्रभात फेरी
  - नावनोंदणी अभियान
  - सांस्कृतिक कार्यक्रम

पथनाट्यांमध्ये विविध सामाजिक मुद्द्यांचा समावेश - जसे नावनोंदणीतील वृद्धीदर गळतीचे प्रमाण कमी करणे. शाळेतील प्रवेशासाठी प्रमाणपत्र मिळविणे, मुलींचे शिक्षण सुविधावंचित लोकसमुह जसे अनुसूचित जाति / जमाति, आदिवासी / वंचित वर्ग, भटके तसेच प्राणी सांभाळणारे बालकांना मिळणाऱ्या योजनांची व अधिकारांची माहिती देणे इ.

**ii) नियोजन संघांची ओळख :**

नियोजनासाठी आवश्यक माहितीला एकत्रित करण्यासाठी एक सरकारी अधिकारी आणि एक शिक्षक पुरेसा नाही. यु. ई. ई. च्या प्रत्येक घटकांवर विचार करणे आणि उपयुक्त माहिती प्राप्त करण्यासाठी कोअर दल / संघ बनविण्याची आवश्यकता असून त्यामध्ये लोकसमुदायाचे स्वामित्वाची भावना निर्माण करणे, त्यांची सहाय्यता मिळविणे आणि ते मुख्य सहभागी म्हणून भाग घेवून हेतू निश्चिती करणे तसेच, प्राधान्य क्रमाने निर्णय घेण्यासाठी सकारात्मक योगदान करतील. या प्रकारच्या एका कोअर नियोजन दलास समावेश करण्याची योजनेला वैधता दिली पाहिजे.

या कोअर नियोजन दलाची निर्मिती करण्यासाठी लोकसमुदाय आणि लक्ष्य समुदायाशी चर्चा केल्याने त्या सदस्यांची ओळख सहजगत्या होईल. ज्यांना या संघामध्ये सामिल करून घेणे आवश्यक आहे. या संघांमध्ये काही सुशिक्षित, काही राजकीय दृष्टीने जागरूक काही सामाजिकरीत्या वैचारीक लोक, काही असे लोक की जे तज्ञ आहेत अशाचा समावेश करणे आवश्यक आहे. तसेच काही महीला अल्पसंख्याक शिक्षित परंतु बेरोजगार व्यक्तिंना समाविष्ट करता येईल या सर्वांचा समावेश केल्याने लोकसमुदाय आणि शाळा यांच्यातील संबंधांची जोपासना होवून शक्ती वाढेल या

संघाची निर्मिती करताना ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, यामध्ये काही योजनेशी असहमत लोकांचा समावेश करावा जेणे करून ते योजनेतील नकारात्मक बाबींवर चर्चा करतील. प्राथमिक शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचले जावे यासाठी संघामध्ये सर्व प्रकारच्या व्यक्ति असाव्यात. वास्तविकमध्ये हा कोअर नियोजन संघ असा असावा की त्यामध्ये सर्व लोक समुदायाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकांचा समावेश असावा.

**iii) कोअर नियोजन संघाची क्षमता बांधणी**

नियोजनाची गुणवत्ता कोअर नियोजन संघाच्या क्षमतेवर अवलंबून आहे. प्रस्तावित योजना जिल्हा स्तरावर पूर्ण करता येण्यासारख्या प्रायोगिक असाव्यात समस्त नियोजन प्रक्रिया सहभागी स्वरूपात असावी आणि शैक्षणिक विकासाच्या सर्व घटकांवर ध्यान देता येईल असे सुनिश्चित करावे. त्याच बरोबर ही गोष्ट पण गरजेची आहे की कोणता एखादा विशिष्ट समुह आपले वर्चस्व निर्माण करणार नाही याकडे लक्ष असावे.

शाळा विकास योजनांचे संघटन करणे. हा कोअर नियोजन संघाचा मुख्य हेतू असावा. हा संघ शालेय विकास योजनेअंतर्गत ग्रामीण स्तरावरील शाळांच्या गरजांना प्रभावीरीत्या सादर करेल. ग्रामीण गरजांना ब्लॉक स्तरावर तसेच ब्लॉक स्तरावरील गरजा जिल्हा स्तरावर सादर करून त्यांना सर्व शिक्षा अभियानाचे उद्देश, लक्ष्य, मापनदंड इ. ची ओळख करून देण्यासाठी दोन-तीन वेळा कार्यशाळांचे आयोजन करण्याची आवश्यकता असू शकते. त्यांना ही बाब समजावून देण्याची गरज आहे की कलस्टर, ब्लॉक आणि जिल्हा स्तरावर संसाधन म्हणून पाहिले जाते.

**iv) हस्तक्षेप करण्यायोग्य आवश्यक मुद्द्यांची ओळख :**

नियोजन संघ / समितीच्या निर्मितीनंतरचा पुढचा टप्पा म्हणजे त्या मुद्द्यांची ओळख करणे ज्यांचा संबंध प्राथमिक शिक्षणाची उपलब्धता नाव नोंदणी, अवधारणा, तसेच गुणवत्तेशी असेल आणि या मुद्द्यांना ग्रामीण स्तरावरच कसे सोडवता येईल याचेदेखील निर्णय घेतले जावेत. अथवा जिल्हा वा खंड स्तरावर सोडविण्याची आवश्यकता असेल तर तसे निर्णय घ्यावेत. सदरचे मुद्दे हे -

- प्रशासनासंबंधी असू शकतात.
- योजनेत बदल करण्यासाठी असू शकतात.
- असे निर्धारीत केलेल्या मापनदंडाना अद्ययावत करणे.
- सहयोगात्मक प्रश्न सोडविण्यासंबंधी मुद्दे असू शकतात.
- जिल्हा वा राज्य स्तरावरील अधिकाऱ्यांची पाठिंबा असावा.

या स्तरावर संसाधनांची प्राप्ती करण्यासाठी शाळा, गाव, गट अथवा जिल्ह्याच्या मध्ये एक स्पर्धा लागू शकते ज्यामध्ये ते आपल्या क्षेत्रांतील समस्या, आव्हाने या मुद्द्यांवर इतरांपेक्षा स्वत:ची आवश्यकता अधिक असल्याचे स्पष्ट करता येईल. या परीस्थितीत यांना शिक्षण योजना देण्यासाठी निर्धारीत स्पष्ट संख्यांचा आधार असणे आवश्यक असून त्याच्या आधारावर प्राधान्यक्रम देता येणे शक्य असेल. बऱ्याचवेळा अनुभवाची देवाण-घेवाणसाठी जिल्हाअंतर्गत योजना कार्यशाळांचे आयोजन करता येईल.

**v) सांख्यिकी माहितीचे स्रोत**

सर्व योजना या वेळनिश्चित असतात त्यामध्ये विशिष्ट उद्दिष्टांची प्राप्ती करण्यासाठी स्पष्ट आदेश असतात कारण शिक्षणाचा अधिकार अवबोधाचे स्पष्ट कथन असून सर्व विद्यार्थी आठ वर्षाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करतील तसेच, या संदर्भात खालील मुद्द्यांवर योग्य सांख्यिकी माहितीची प्राप्ती करतील.

- 14 वर्ष वयाचे सर्व बालके (मुलं-मुली) यांचे तसेच नावनोंदणी न झालेले आणि मध्येच शाळा सोडलेल्यांची नावनोंदणी

Notes

- शाळांची संख्या – सरकारी, विना अनुदानीत, मान्यता प्राप्त विना अनुदानित व गैर मान्यता प्राप्त खाजगी शाळा.
- स्वयंसेवी संस्थाद्वारे (NGO) चालविले जाणाऱ्या अनौपचारिक शाळा
- संरक्षित संस्थांमध्ये असणारे विद्यार्थी
- अनुसूचित जाति / जमाती – भटक्या जमती अधिक वंचित / मागास जाति इ. जनजातीतील बालके.
- अपंगांच्या शाळा
- बालकामगार शाळा
- बालगुन्हेगार मुले
- स्थलांतरीत विद्यार्थी
- विस्थापित परीवारातील मुले
- रस्त्यावरील आणि सार्वजनिक ठिकाणी राहणारे मुले
- गुन्हेगारांचे आणि वेश्या व्यवसायातील मुले
- इतर सोयीसुविधा वंचित बालके.

यामधून प्राप्त माहितीमधून शाळेत नावनोंदणी करण्यायोग्य विद्यार्थ्यांचा शोध घेता येईल.

नियोजनाचा अर्थ आहे की, विशिष्ट वयाच्या समुदयामधील, प्रत्येक बालकावर लक्ष केंद्रित करणे. तसेच माहितीच्या आधावर प्रत्येक बालकाच्या प्रगतीची देखभाल करता येईल.

वेगवेगळ्या वर्गातील विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी वेगवेगळ्या शिक्षण पद्धतींचा माहिती शासकीय कार्यालयात असेल. आवश्यकतेनुसार शिक्षक प्रशिक्षण शिक्षक प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम विकास यांना विकसित करण्यासाठी आवश्यक संसाधन इ. चे नियोजन वा आकलन करता येईल.

वरील सूचनांचा अधिकांश भाग शाळा / सरकारी विभागांत उपलब्ध असून त्याचा वापर करता येईल. फक्त वर्तमानकाळासाठी माहिती जमा करणे हा एकमेव माहिती एकत्रीकरणाचा हेतू नसून या माहितीचा उपयोग समस्यांचे निराकरण, विशिष्ट गरजांची ओळख, अपेक्षित संसाधनांचे आकलन अध्यापनाचे नियोजन, तसेच संसाधनांची मागणी करण्यासाठी करता येईल. माहिती आधारीत नियोजन हे उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर करण्यासाठी करता येईल. कुटुंब सर्वेक्षणद्वारे एकत्रित माहिती निवासी स्तरावरील नियोजनासाठी आधारभूत ठरते. याप्रमाणे माहिती एकत्रित करून ती संगणकावर साठविण्यासाठी वापर केला जातो. त्यावर Village Education committee मध्ये चर्चा केली जाईल.

**vi) सूक्ष्म नियोजन अभ्यास :**

कोअर नियोजन समितीची स्थापना, त्यांची क्षमता निर्मिती, नंतर हस्तक्षेप करण्यायोग्य कार्यनितीचा अवलंब, माहितीच्या स्त्रोतांची जमवाजमव इ. नंतर सूक्ष्म नियोजन अभ्यासाला सुरुवात केली जाते. या अभ्यासामध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

- नावनोंदणीचे उद्दिष्टे, गळती प्रमाण, अवबोध, विद्यार्थ्यांचे उत्तीर्णता प्रमाण, विद्यार्थ्यांच्या वर्गानुसार (जाती / जमाती) शिक्षक विद्यार्थी प्रमाण यावर लक्ष्य केंद्रित करणे. या सर्व बाबी एका वर्षाच्या माहितीसाठी जमा करायच्या.
- अध्यापनात घेण्यात येणाऱ्या कार्यनीती ठरविणे.
- क्रियाकल्पांना क्रमवारी देणे.

- हेतू प्राप्तीसाठी विविध टप्पे निर्धारीत करणे.
- विविध क्रियाकल्पांना कार्यान्वित करण्यासाठी संबंधित अधिकारी तसेच संस्थाची जबाबदारी ठरविणे.
- आवश्यक वेळेचे नियोजन करणे.
- प्रत्येक घटकासाठी लागणारा खर्च याचा अंदाज घेणे.
- योजनेचा प्रस्ताव तयार करणे.

थोडक्यात कार्यवाहीचा संकल्प आराखडा तयार केला जातो. कार्यवाहीसाठी आराखड्याचे हेतू, संबंधित क्रियाकल्प, व्यक्ति ज्या क्रियेचे संपादन करेल, कार्यवाहीचे वेळापत्रक, वित्तीय नियोजन, अपेक्षित निष्कर्ष यांचा समावेश होतो.

अध्ययन अध्यापन प्रक्रिया आणि वर्ग आंतरक्रिया यांच्या स्वरूपात जे काही संपादित होते ते महत्त्वपूर्ण असते. कारण हे सर्व नियोजित कार्यनीतींच्या विकासाचे प्रतिबिंब ठरते. तसेच वर्ग आंतरक्रियाद्वारा कशा प्रकारे अध्ययन प्रक्रियेचे संपादन होते हे जाणणे महत्त्वपूर्ण आहे.

वर्गामध्ये अध्ययन–अध्यापन प्रक्रियेतील महत्त्वाचे घटक खालीलप्रमाणे :

- वर्ग वातावरण (भौतिक आणि सामाजिक वातावरण)
- वर्ग व्यवस्थापन (बैठक व्यवस्था, रूपरेषा, अध्ययन–अध्यापन प्रक्रियेचे संचालन, अभ्यासासाठी साधनसामुग्री आणि उपलब्धता, वापर)
- विद्यार्थी–शिक्षक प्रमाण
- अध्यापन पद्धती आणि कार्यनीती
- शैक्षणिक साधनसामुग्री अथवा साहित्याची उपलब्धता आणि वापर
- वर्गातील क्रियाकल्पांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग (शाब्दिक / अशाब्दिक)
- वर्गात अध्यापनासाठीच्या अद्ययावत सोयीसुविधा
- शिक्षकाद्वारे नाविन्यपूर्ण प्रासंगिक वा प्रायोगिक अध्यापन पद्धती वापरण्याच्या संधी
- शैक्षणिक तसेच सहाय्याची अध्यायनासाठी विशेषज्ञांचा वापर करताना स्थानिक शिक्षण स्नेही व्यक्तीची सहाय्यता घेवून पालकांचा समावेश करून संबंधीत कार्यनीतींची कारवाई करणे.

अध्ययन अध्यापन क्रिया केवळ वर्गातच घडून येते असे नाही. बऱ्याचदा मुलांना निसर्गाच्या सानिध्यात घेवून जैव विविधतेविषयी अध्यापन केले पाहिजे. या प्रक्रियांसाठी बजेट ठरविणे आवश्यक आहे. यास शिक्षण योजना प्रसारामध्ये सामिल केले पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शिक्षणासाठी तसेच विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकाससाठी शाळा प्रथमत: खेळ, योगा, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रकल्प योजना, क्रियाआधारीत अध्ययन, जीवन कौशल्य विकास यासारखे कार्यक्रम राबविले जातात. यामुळे शाळेला एक सामाजिक संस्थेच्या रूपात सामुदायिक क्रियाकल्पांचा केंद्रबिंदू आहे कार्यानुभव मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना व्यावसायिक, शेतकरी, शिल्पकार यांच्याशी संलग्नित करून त्यांना सामाजिक आणि प्राकृतिक संदर्भात प्राविण्य मिळविण्यासाठी मदत होईल. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण शारीरिक सामाजिक भावनिक तसेच मानसिक विकासासाठी विविध कार्यनीतींचा अवलंब अध्ययन अध्यापन प्रक्रियेत करणे अनिवार्य आहे. या कार्यनीतींसाठी आवश्यक नियोजन, वित्तीय नियोजन, क्रिडांगण, शारीरिक शिक्षण, योगा शिक्षक, खेळाचे साहित्य, आंतर शालेय खेळाच्या स्पर्धा आणि इतर स्पर्धा यांची सूक्ष्म स्तरावर नियोजनात समावेश करण्याची गरज आहे.

Notes



राष्ट्रीय शिक्षण योजना 1926 च्या योजनेनुसार शिक्षणात विविध नाविन्यपूर्ण योजना – खडू – फळा मोहिम, शिक्षक शिक्षण, अनौपचारिक शिक्षण, महिला समस्या, प्राथमिक शिक्षणासाठी पोषणासंबंधी राष्ट्रीय कार्यक्रम आणि काही विशेष स्वरूपात निर्मित शिक्षण योजना जसे–बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान, आंध्र प्रदेश यांच्या योजनांचा समावेश होतो. या सर्व योजनांचा मुख्य हेतू साक्षरतेचा प्रसार तसेच प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण असा आहे.

खालील बाबी योजनेच्या प्रस्तावात असतील.

शाळेमध्ये केल्या जाणाऱ्या कार्याचा फोकस बाल–अनुकूल शाळा योजना निर्माण करणे होय. शाळा अशा जमिनीवर स्थापित असावी की जी जमीन संकटात नाही. (जसे पाणी साचेल असे उतारावरील ठिकाण, वीजेच्या तारा असणारे धोक्याचे क्षेत्र) सर्व विद्यार्थी सहजासहजी पोहोचू शकतील. शाळेचा परीसर कार्यात्मक आणि आकर्षक असावा. वर्गांमध्ये योग्य प्रकाश योजना, हवा, फळा दिसेल अशी जागा असावी. रॅम्प, हँडल, अपंग व्यवस्थापन अनिवार्य आहे. याव्यतिरिक्त शौचालये, पिण्याचे पाणी, विद्युतीकरण, कुंपणभिंत, खेळाचे मैदान, प्रत्येक शाळेत अनिवार्य आहे. कॉम्प्युटर, शैक्षणिकसाहित्य या सर्व प्रक्रियेसाठी वित्त व्यवस्था बजेट असणे गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक जाणून घेवून प्रस्ताव करणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित आराखड्याचे नियोजन (प्रपोजल) करताना खालील बाबी असणे अनिवार्य आहे.

- संदर्भ / पार्श्वभूमी / समस्या यामध्ये जनसांख्यिकीय माहिती असावी.
- उद्देश्य
- कार्यनीती
- स्टाफ संबंधी माहिती
- आधारभूत सुविधा
- कार्यक्रम / क्रियाकल्प
- शिक्षक प्रशिक्षण, पाठ्यपुस्तक संशोधन, मॉड्युअल यासाठी अवलंबिलेल्या व्यहरचनांचे विवरण
- विद्यार्थी विकासाचे कार्यक्रम
- योजना काळात सुरू केलेले नवीन कार्य
- प्रकाशित केले जाणारे अहवाल
- सुरु करण्यात येणारे मुल्यांकन सामाजिक ऑडिट
- प्रत्येक घटकासाठी लागणारी अंदाजे रक्कम
- मागील वर्षातील केंद्रिय तसेच राज्याच्या भागातील निधींची स्थिती
- आवर्ती अनुदानाच्या स्वरूपात खर्च न केलेला निधी / रक्कम जी आर्थिक वर्षाच्या शेवटी रद्द होते.
- मागील वर्षी खर्च न केलेली रक्कम चालू वर्षाच्या बजेटमध्ये घेणे.
- इतर स्त्रोतांकडून वित्तीय सहाय्य
- चालू वर्षासाठी आवश्यक बजेट स्टेटमेंट

क्रियाकल्पांवर खर्च निर्धारीत मापन दंडानुसार होईल. योजनेच्या प्रस्तावात कारवाई झालेला अहवाल, प्रक्रियेला समजून घेण्यासाठी आकलन, राज्य स्तरावरील अधिकारी प्राप्त नैतिक तथा प्रशासकीय योजना, तसेच, मापनदंडांना सोडून काही योजनेत सुधार करण्यासाठी मत व्यक्त केले असतील तर त्यांना प्राधान्य दिले पाहिजे.

योजना प्रतिपादन प्रक्रिया योजना बैठकीचे विवरण, कार्यशाळा आणि सेमिनार इ. चे कोअर योजना संघटनेतील सदस्यांसोबत झालेल्या सर्व सुधारांना स्पष्ट स्वरूपात उल्लेखित करून शिक्षणाचा अधिकार योजनेद्वारा (RTE) एक अपेक्षित संविधानिक प्रयत्न करता येईल. यामध्ये बॉटम अप अध्ययन पद्धतीचा प्रयोग केला जातो.

बॉटम अप पद्धती म्हणजे कोणत्या ग्रामीण भागाच्या क्षेत्रात खाजगी, अनुदानित, गैर अनुदानित, सरकारी स्वयं विकास योजनेचे शाळा प्रस्ताव तयार करतील मूलत: सूक्ष्म नियोजन प्रक्रियादेखील शाळेच्या नियोजनामध्ये लागू पडू शकते.

वस्ती स्तरावर शाळेचे नियोजनाचे प्रस्तावांमध्ये सरकारी सहाय्यांची आवश्यकता आहे. यू. ई. ई. अंतर्गत एक समुदाय आधारीत दृष्टीकोन आला आहे.

**तुमची प्रगती तपासा 2**

1) नियोजन म्हणजे काय? सूक्ष्म नियोजन म्हणजे काय?

2) यू. ई. ई. साठी सूक्ष्म नियोजनाला का स्विकारण्यात आले आहे?

3) सूक्ष्म आयोजनाच्या पायऱ्या कोणकोणत्या आहेत?

## 7.3.4 डी. ई. ओ., डी. आर. सी. (डाइट) बी. ई. ओ., बी. आर. सी आणि सी. ई. ओ. सी. आर. सी. यांच्या भूमिका व कर्तव्ये

वरील संस्थांच्या भूमिका आणि कर्तव्य यांचे विवरण क्रमबद्धरीत्या खालीलप्रमाणे देण्यात आले आहेत.

**क) जिल्हा स्तर :**

जिल्हा स्तरावर जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी (डी. ई. ओ.) तसेच याचे नियोजन आणि आयोजन करणारे संबंधित अधिकारी, समन्वय, तसेच मॉनिटर करण्याचे काम करावे लागते. प्राथमिक शिक्षणात त्यांना पुढील जबाबदारी पार पाडावी लागते.

- बलकाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करू शकतील असे अनुकूल वातावरण बनवावे लागते.
- प्राथमिक आणि उच्च प्राथमिक स्तराच्या शाळांच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देणे.
- प्राथमिक स्तरावरील सर्व वयाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या जवळपासच्या ठिकाणी शिक्षणासाठी भौतिक आणि सामाजिक सोयींची उपलब्धता करणे.
- जे विद्यार्थी शाळेत येत नाहीत. त्यांच्यासाठी विशेष उपक्रम राबवून ते शाळेत येतील आणि त्यांचे शिक्षण पूर्ण करू शकतील असे पाउल उचलणे. याव्यतिरिक्त जर त्यांना निवासाची सोय नसेल तर ती उपलब्ध करून देणे. शाळाबाह्य, स्थलांतररित, रस्त्यावरील मुले, SCST, भटक्या जमातीमधील मुले, अपंग इ. यांना संधी देणे.

Notes

- विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड बनविण्यासाठी 18 वर्षापर्यंतच्या सर्व बालकांच्या जन्माची नोंद करण्यासाठी अभियान चालविणे.
- शाळेतील शिक्षकांच्या रिक्त पदांची माहिती करून घेणे व ती उच्च शिक्षण अधिकाऱ्याकडे पाठविणे.
- जिथे आवश्यकता असेल तिथे शिक्षक प्रशिक्षण आणि पायाभूत सोयी सुविधांचे व्यवस्थापन करणे.
- विविध शाळा व्यवस्थापन समितीच्या क्षमतेचा विकास करणे, शिक्षकांची उपस्थिती विद्यार्थ्यांची उपस्थिती, शैक्षणिक स्तर आणि अध्ययन-अध्यापन सामुग्री यांची उपलब्धता करून देणे.
- मुली आणि विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी मोफत वाहन पास / सुविधा देण्यासाठी प्रयत्न करणे.
- जे विद्यार्थी दूर्गम वा पहाडी भागात राहतात. जिथे शाळा बनविणे शक्य नाही अशा विद्यार्थ्यांना निवासाच्या सोयीसुविधा देणे.
- अध्ययन-अध्यापन सामुग्री, इतर उपकरणे, बालस्नेही आणि अडथळेमुक्त शाळा वातावरणाची निर्मिती करणे.
- हे निश्चित करण्यासाठी सुविधावंचित वर्गातील मुलांना सोबत गैरव्यवहार होत नाहीत, विविध क्षेत्रांतील जिल्हा स्तरीय अधिकाऱ्यांसोबत सहकार्य करणे. सुविधावंचित समुहात अनुसूचित जाति/जमातितील विद्यार्थी, भटक्या समुहातील विद्यार्थी, इतर मागास जाती, मुसलमान आणि इतर अल्पसंख्यांक मुली, शहरी वंचित बालके, गल्ली-गल्लींमध्ये राहणारे विद्यार्थी बालकामगार प्रवासी/ स्थलांतरीत परीवारातील बालके आणि असुरक्षित बालकांचा समावेश होतो.
- तक्रार निवारण समितीची स्थापना करणे.
- लैंगिक आणि सामाजिक समावेशकतेसाठी इतर मुद्द्यांचे सामाजिक ऑडिट प्रक्रिया असावी.
- एक जिल्हा शिक्षण समितीची स्थापना करून त्यामध्ये सर्व वर्गाचे निर्वाचित प्रतिनिधींचा समावेश असावा. उदाहणार्थ : विशेषण माता-पिता (पालक) महिला, बाल कल्याण विभाग, आरोग्य विभाग, पोलिस विभाग, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते मुख्याध्यापक इ. चा समावेश असावा.
- वार्षिक परीक्षा नसावी. विद्यार्थी अनुत्तीर्ण असू नये. शारीरिक दंड देवू नये तसेच विद्यार्थ्यांच्या कोणत्याही प्रकाराच्या अधिकारांची हानी होऊ नये हे सुनिश्चित करणे.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, जिल्हा शिक्षण अधिकारी शाळा, गाव, खंडांद्वारे तयार केलेल्या योजना प्रस्तावांना संघटित करतो आणि जिल्हा योजना आराखडा तयार करतो. प्राथमिक शिक्षणाशी संबंधित वर्तमान स्थितीचा अंदाज घेण्यासाठी जसे सर्व विद्यार्थ्यांसाठी थोड्या अंतरावर शाळा उपलब्ध आहे. इत्यार्दीसाठी तीन किंवा चार वर्षाचे शाळांचे मानचित्रण/मापन केले गेले पाहिजे.

**तुमची प्रगती तपासा 3**

1) मॉनिटरींग म्हणजे काय? लोक समुदाय यू. ई. ई. च्या कारवाईचे कसे मॉनिटरींग करतो?

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

2) यू. ई. ई. च्या कार्यवाहीसाठक्ष जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याचे कार्य लिहा.

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

Notes

**ख) स्थानिक आणि सामाजिक मानचित्रण :**

आसपासचे विद्यार्थी एकापेक्षा अधिक शाळेत शिक्षण घेत असतील किंवा एका शाळेत येणारे विद्यार्थी एकापेक्षा अधिक ठिकाणांहून येत असतील असे संभव असू शकते. परंतु, एका शाळेसाठी ही प्रक्रिया सुनिश्चित करणे शक्य नाही की, सर्व विद्यार्थी शाळेत येतील आणि शिक्षण प्रक्रियेत सामील होतील. काही ठिकाणी शाळा असतील. परंतु विद्यार्थी शाळेत येत नसतील किंवा ते काही महिन्यांनंतर शाळा सोडून जातील किंवा बरेच दिवस शाळेत अनुपस्थित असतील आणि यामुळे अभ्यासात इतर मुलांपेक्षा मागे पडतील. यासाठी शालेय मापनाची आवश्यकता आहे.

**शालेय मापन :**

- जे विद्यार्थी सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक किंवा व्यवस्था संबंधित कारणांमुळे शाळेत येवू शकत नाहीत त्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे.
- शैक्षणिक सेवांसाठी एक गतिशील दृष्टीकोन बनविण्यासाठी सहाय्यक असून आधारभूत सेवा सुविधा, शिक्षक आणि आवश्यक साधनसामुग्रींचा समावेश करावा त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना जात, धर्म, लिंग किंवा अंतराचा विचार न करता गुणवत्तापूर्ण शिक्षण देता येईल.

शाळा मापनाच्या प्रक्रियेत खालील घटकांचा समावेश होतो.

i) गावात वातावरण निर्मिती करणे.

ii) ग्रामीण शिक्षण समितीची शाळा मापनासाठी निर्मिती.

iii) ग्रामीण शिक्षण समितीच्या सदस्यांना शालेय मापन प्रक्रियासाठी प्रशिक्षित करणे.

iv) गावाचे एक स्थायिक मानचित्र तयार करणे.

v) कुटुंबाचे सर्वेक्षण करणे.

vi) विविध कुटुंबातील विद्यार्थी संख्या आणि त्यांची नावनोंदणी स्थिती दर्शविण्यासाठी अंतिम मापन तक्ता बनवावा.

vii) गाव / शालेय शिक्षण अहवालासाठी रजिस्टर तयार करणे.

viii) तयार केलेले मापनचित्र आणि घरांचे विश्लेषण लोकांच्या समोर सादर करणे आणि सत्यता तपासणे.

ix) लोकांचे मतांची नोंद करणे.

शालेय मानचित्रण तयार करण्यासाठी जिल्हा संसाधन केंद्र (DRC) आवश्यक सहाय्यता प्रदान करते. या प्रकारची योजना जिल्हा स्तरावर यु. ई. ई. च्या प्रगतीस मॉनिटर करण्यासाठी मार्गदर्शनाचे काम करते.

**ग) नियोजनासाठी संसाधन केंद्र :**

डाइट आणि डी. पी. ई. पी. जवळ प्रत्येक एक नियोजन आणि व्यवस्थापनाचे घटक आहेत. या प्रकारणाचे मुख्य कार्य जिल्हा तसेच वार्षिक नियोजन बनविणे आहे. क्लस्टर संसाधन केंद्र. ब्लाक संसाधन केंद्रांकडून हे अपेक्षित आहे की, वार्षिक आणि शिक्षण विकास योजना तयार करण्यासाठी शालेय स्तरावर, शिक्षकांची, ग्राम पंचायतीच्या कर्मचाऱ्यांची तसेच पंचायत समितीला मदत करू शकतील

**घ) जिल्हा योजनांचे मूल्य निर्धारण :**

जिल्हा योजनेला अंतिम स्वरूप प्राप्त करेपर्यंत एका प्रक्रियेतून जावे लागते त्यास मुल्य निर्धारण असे म्हणतात. मुल्य निर्धारणात खालील बाबींचा समावेश करता येऊ शकतो.

- जी माहिती पुरविलेली आहे ती वास्तविक आहे की नाही ते माहिती करून घेणे.

Notes

- आवश्यकतांचे औचित्य प्रतिपादन विश्वासार्ह आहे की नाही ते माहीत करून घेणे.
- वर्तमान स्थिती अणि यू. ई. ई. च्या अंतिम उद्दिष्टांच्या मधील अंतरास भरून काढल्याने प्रगती होवू शकते.
- प्रस्तावित शिक्षण योजना निर्धारीत वेळेनुसार कार्य करू शकतील की नाही?
- प्रस्तावित योजना या आर्थिक, तांत्रिक, सामाजिक, आणि राजनैतिक स्वरूपात व्यवहार्य आहेत की नाही ते माहीत करून घेणे.
- या योजनेतील कमतरता आणि संधीची जाणीव करून घेणे.

सकारात्मक मूल्य निर्धारण प्राप्त केल्यानंतर निर्धारीत योजनांचे राज्य सरकारच्या शिक्षण विभाग, विल विभाग, बाल आणि महिला विकास विभागांद्वारा सूक्ष्म निरीक्षण केले जाते. राज्याचे सरकारी विभाग या योजनांना आंशिक रूपात अथवा संपूर्ण स्वरूपात अनुमोदन देवू शकतात किंवा कारणे विचारू शकतात अथवा लक्ष प्राप्तीसाठी मत व्यक्त करू शकतात. या स्वीकृत योजनांना कार्यान्वित करण्याचे आणि करवून घेण्याचे कार्य जिल्हा शिक्षण अधिकारी यांची जबाबदारी असते. जे खाजगी शाळा, स्वयंसेवी संस्था आणि इतर कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने या योजनांना कार्यान्वित करता येते.

**ड) कार्यान्वय / कारवाई :**

जिल्हा स्तर अथवा जिल्हा स्तरावरील नियोजन हे एकमात्र सुरुवात आहे. योजनांना कार्यन्वित करावे लागते. ही बाब महत्त्वाची आहे की जिल्हा शिक्षण समिती असो, गट शिक्षण समिती असो अथवा शाळा व्यवस्थापन समिती असो या आपल्या कार्य पद्धतींमध्ये बदल करून शिक्षक, स्वयंसेवी संस्था तसेच स्थानिक समुदायांच्या प्रतिनिधींचा समावेश करून त्यांना निर्णय प्रक्रियेमध्ये महत्त्वाचा घटक बनावे लागेल. कारण शिक्षणाचा अधिकार अधिनियमाच्या आदेशाच्या योग्य भावनेची कारवाई घडवून आणता येईल. शिक्षक समुदायाला नियोजन प्रक्रियेत सामावून घेण्याच्या हेतूने म्हणजे शाळेच्या भागातील स्थानिक समुदायांसोबत एकत्र येवून यु. ई. ई. च्या कारवाईमध्ये सहभागी संस्थांच्या रूपात पुढे येवू शकेल.

लोकसमुदायास नियोजन प्रक्रियेत सभावेशित केल्यामुळे विद्यालय क्षेत्रातील रहिवासी असणाऱ्या लोकसमुदायासोबत यु. ई. ई. च्या कार्यक्रमात संस्था सहभागी आहेत.

गट शिक्षण अधिकारी (BDO) आणि त्यांचे सहकारी गट संसाधन केंद्राच्या स्वरूपात कार्य करत आहेत. प्रत्येक वर्षी नाविन्यपूर्ण अध्ययन–अध्यापन साहित्य सामुग्रीची निर्मिती करण्यासाठी गट संसाधन केंद्र प्रत्येक शाळेला मदत करेल.

या व्यतिरिक्त, बरेचसे संकुल संसाधन केंद्र असे असतात की, प्रत्येक 15 गावासाठी एक खंड संसाधन केंद्र किंवा संकुल संसाधन केंद्र प्रत्येक महिन्यातून एकदा शाळेचे सर्वेक्षण करतील आणि शिक्षकांना पाठ्यक्रमाविषयक मार्गदर्शन करतील.

यु. ई. ई. च्या उद्दिष्ट प्राप्तीसाठी जिल्हा योजनांना कार्यान्वित करण्यासाठी काही इतर संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण असून पुढे वर्णन करण्यात आलेले आहे.

**तुमची प्रगती तपासा 4**

1) शालेय स्तरावर प्राथमिक शिक्षणाच्या विकासासाठी प्रस्ताव तयार करण्यासाठी माहितीचे स्त्रोत कोणते आहेत?

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

Notes

2) योजनेचे मुल्य निर्धारण म्हणजे काय? जिल्हा शिक्षण विकास योजनेचे मुल्य निर्धारण कोण करतात?

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

**सरकारी आणि खाजगी संस्थांमधील सहभागीत्व :**

केवळ सरकारी संस्था शिक्षणाच्या वाढत्या मागणीला पूर्ण करू शकत नाहीत यामध्ये इतर खाजगी संस्थांची सहाय्यता अनिवार्य आहे. आणि प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण (यु. ई. ई) च्या कार्यात खाजगी संस्थाना सदस्य बनविण्यासाठी सरकार मुक्तपणे तयार आहेत. राज्य सरकार आणि स्थानिक प्रशासन, इतर खाजगी संस्थांनी एकत्र येवून प्राथमिक शिक्षणाचे कार्य पूर्ण करण्यासाठी तयार आहेत आणि या दिशेने समर्पक कार्य करत आहेत. एक व्यापक स्वरूपात सरकारने सर्व स्तरांवर एन. जी. ओ. सोबत सहभागी करण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या खाजगी संघटन काही वर्षापासून समाजाच्या विकास कार्यात कार्यरत होत्या, आज हे केयर सेंटर, चालते-फिरते केंद्र बालवाडी, कुरणशाळा, प्राथमिक आणि पूर्व प्राथमिक शाळा चालवत आहेत जे विद्यार्थी शाळेत येत नाहीत. त्यांना शाळेत आणण्यासाठी या सर्व संघटनांचा सहभाग आवश्यक आहे.

एन. जी. ओ. सोबत भागिदारी हे शासनाचे धोरण आहे.

- केंद्र आणि राज्य सरकारद्वारे वित्त सहाय्य देणे.
- काही विशिष्ट राष्ट्रीय आणि राज्य संसाधन संस्थांच्या माध्यमातून आणि
- लोक समुदायाच्या क्रियाकल्पास कार्यान्वित करण्यासाठी ग्रामीण शिक्षण समितीद्वारे वित्त सहाय्य देणे.

शिक्षणाचा अधिकार संकल्पनेमध्ये एन. जी. ओ. सोबत भागीदारी खालील क्षेत्रांमध्ये विचारात घेतली आहे.

- जाणीवजागृती वाढविणे.
- क्षमता निर्माण : शिक्षक प्रशिक्षण परिणामकारक क्षमतेचा विकास, लोकसमुदाय क्षमता निर्माण आणि संस्थांच्या पायाभूत सुविधांची क्षमता निर्माण, करणे व कार्यवाही करणे.
- संशोधन : मुल्यमापन यु. ई. ई. चे मॉनिटरींग
- नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींचा विकास
- शालाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात आणणे.
- सरकारला लिंग शिक्षणासंबंधी जागृत करणे.
- विशेष गरजा असणाऱ्या बालकांसोबत काम करण्यासाठी
- जबाबदारीची निश्चिती करण्यासाठी
- पारदर्शिकता विकास : कार्यक्रम निर्मिती आणि उपलब्ध कार्यक्रमांच्या मूल्य निर्धारणात पारदर्शिकता आणणे.

## 7.3.4.1 शाळेचे निरीक्षण आणि पर्यवेक्षण :

**लोकसमुदायाची भूमिका :**

शाळेच्या कार्याची देखरेख आणि पर्यवेक्षण करण्यासाठी लोक समुदायाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. यासंदर्भात शाळेतील उपलब्ध शैक्षणिक सुविधांची देखरेख आणि विद्यालयांचे पर्यवेक्षण करणे

Notes

शिक्षण समिती आणि लोकसमुदायाचे कर्तव्य आहे. योजनांच्या कार्यान्वयाची देखरेख आणि पर्यवेक्षण करणे यासाठी महत्त्वपूर्ण आहे की,

- सर्व विद्यार्थी नियमित शाळेत येतात.
- मुली आणि इतर सुविधा वंचित समुदायांच्या शिक्षणासंदर्भात नावनोंदणी आणि अवबोध निरिक्षण करणे.
- विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते.
- स्थानिक पातळीवर शिक्षकांची भरती करणे.
- शाळेचे वेळापत्रक ग्रामीण शिक्षण समिती आणि पालक यांच्या समन्वयातून तयार केले जाते.
- शाळा आधारीत सुविधांचा उपयोग योग्य होतो.
- अनुदान योग्य रीतीने वापरले जाते की नाही ते पाहणे.
- पर्यायी शालेय केंद्राची योग्य देखरेख करणे.
- अध्ययन-अध्यापन साधनसामुग्रीची उपलब्धता आणि त्याचा उपयोग योग्य होतो की नाही ते पाहणे.

**गट शिक्षण अधिकारी भूमिका :**

गट शिक्षण अधिकारी आणि त्याअंतर्गत इतर अधिकाऱ्यांची खालील भूमिका असते.

- प्रत्येक शाळा, विना अनुदानित खाजगी शाळा तसेच इतर त्यांच्या अधिकार क्षेत्रातील शाळांची पाहणी करणे.
- शाळा इमारत व सुविधा विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था यांचे निरीक्षण करणे.
- शाळेतील पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छता शौचालये मध्यांन भोजन शिजविण्याचे स्वयंपाक घर यांची विशेष पाहणी करणे.
- शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्या विविध नोंदीची तपासणी करणे.
- या तपासणीअंतर्गत शाळेस आवश्यक गरजांची माहिती जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यास देणे.
- परीसर तसेच शाळेच्या बाबतीत जणगणनात्मक माहिती प्राप्त करणे, त्यामध्ये गावांची संख्या, पंचायतींची संख्या, संकुल, निवासी जागा, अनुसुचित जाति/जमाती, वंचित/मागास जातींची संख्या शाळा अनुचित मुले व मुलींची संख्या, तसेच शाळेत येणारे व न येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या विशेष गरजा असणारे विद्यार्थी यांची संख्यांची संख्या विशेष गरजा असणारे विद्यार्थी यांची सांख्यिकी नोंद घेणे.
- शाळेत जाण्यायोग्य विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या खाजगी शाळांची माहिती घेणे.

वरील (BDO) शैक्षणिक आराखडा एक तपासणी प्रक्रियेच्या स्वरूपात प्राप्त केलेला असून वार्षिक जिल्हा कार्य योजना / बजेट तयार करण्यासाठी उपयुक्त पडू शकते.

**तुमची प्रगती तपासा 5**

1) सरकारी खाजगी सहभागीत्व म्हणजे काय? ते का आवश्यक आहे?

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

2) बिगर सरकारी संस्था (NGo) यांची यु. ई. ई. मधील भागीदारी कोणत्या स्वरूपात आहे?

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

3) यु. ई. ई. साठी सूक्ष्म नियोजनामध्ये जिल्हा शिक्षण अधिकाऱ्याची भूमिका स्पष्ट करा.

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

## 7.4 प्राथमिक शिक्षणातील व्यवस्थापन व जबाबदारी

### 7.4.1 शासनात्मक जबाबदारी

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करताना काही शासनात्मक अडचणी असून त्यांचे निवारण करणे गरजेचे आहे. एक असे रचनातंत्र स्थापित करणे गरजेचे आहे ज्यामध्ये बालकाचा शाळेत येणाऱ्या अधिकार अधिक प्रबल होईल तसेच त्यामध्ये शाळा प्रवेशासंबंधीचे धोरण सुलभ असावे आणि प्रत्येक शाळेने एक वार्षिक अहवाल तयार करून त्याद्वारे आवेदन पत्र संख्या आणि प्रवेश संख्या घोषित करावी. काही अनुदानांवर आंशिक स्वरूपात रोक लावणाऱ्या तरतूदी आणि प्रमाण दर्जा संबंधी विषयावर विचार करता येईल. विद्यार्थ्यांचे आकलन कसे होते किती प्रमाणात होते? त्यासाठी कोणते पर्याय असावेत? यांची उत्तरे सुचविणे अनिवार्य आहे. कमीत कमी सर्व विद्यार्थ्यांची शाळेत नावनोंदणी सुनिश्चित करणे आवश्यक आहे. या सर्व विषयांबाबत समाधानकारक सफलता मिळाली नाही तर परीणामी भारतीय संविधानाने दिलेल्या समान शैक्षणिक संधींची असफलता असेल.

शासनासंबंधी अडचणी पुढीलप्रमाणे :

- केंद्र सरकारकडून स्थानिक संस्थांना मिळणारे अनुदान प्राथमिक शिक्षणासाठी उपयुक्त आहे की नाही किंवा त्याचा योग्य वापर होतो की नाही?
- विविध स्थानिक संस्थांना अनुदान कसे दिले जाईल?
- प्राप्त अनुदानाच्या वापरासाठी स्थानिक अधिकारामध्ये कोणते स्वातंत्र्य असेल?
- जर स्थानिक संस्था स्वत: आपल्या अनुदानाची सोय करत असेल तर कोणते स्त्रोत उपयुक्त ठरतील?
- जर स्थानिक संस्थांना कर लावण्याचा अधिकार असू शकतो का की ज्याच्यामुळे पुरेसा निधी प्राप्त होईल?
- स्थानिक संस्थाच्या प्राप्त वित्ताचे निरीक्षण आणि ऑडीट कोण करेल?

यामधील बऱ्याचश्या प्रश्नांचे निराकरण शिक्षणाचा अधिकार अधिनियमामध्ये सुचविण्यात आलेले आहे.

### 7.4.2 शिक्षकांची भरती आणि व्यवस्थापन

शिक्षणाचा अधिकार अधिनियम, शिक्षक विकेंद्रिकृत व्यवस्थापनास प्रोत्साहन देते. शिक्षकांची मर्हता, भरती करणे, नोकरीत ठेवणे, बढती करणे या संदर्भात संभाव्य स्त्रोत यांचे निराकरण कायद्यांतर्गत केले जाते. जेव्हा आपण म्हणतो. की, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण व्यापक संस्थागत विकासाची आवश्यकता आहे. तेव्हा आपले लक्ष शासनात्मक व्यवस्थापनावर जाते. संपूर्ण प्रक्रिया दीर्घ विलंबाची असते हे होवू नये.

राज्याला आपल्या मापदंडांचे अनुकरण करण्याचे अधिकार व नियमावली एन. सी. टी. ई. द्वारा निर्मित नियमांशी सुसंगत असतात. सरकार शिक्षक भरती करू शकतात आणि या प्रक्रियेत

Notes

लोकसमुदायाचा देखील अधिकार असू शकतो. परंतु, गुणवत्तेबाबत कोणताही समझोता नसावा. शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार राज्यामध्ये एकही एक शिक्षकी शाळा नाही असे आश्वासन देणे अनिवार्य आहे. तसेच, 50% महिला शिक्षिका असाव्यात याचे पालन करणे गरजेचे आहे.

शिक्षकांच्या पगाराबाबतीत विविधता दिसून येते. खाजगी शाळा वा NGO चालविल्या जाणाऱ्या शाळांमुळे हा प्रश्न अधिक बिकट झालेला आहे. तसेच शिक्षकांचे वर्तमानातील पगार हा एक जटील विषय असू शकतो.

### 7.4.3 शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका :

शिक्षणाची गुणवत्ता विकसित करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. शिक्षणाचे सर्व घटक एकत्र करण्यामध्ये ही एक व्यापक आणि योग्य निर्णय प्रक्रिया घेवू शकते. प्रत्येक शाळेस मान्यता मिळविण्यासाठी सहा महिन्यांच्या आत एक शालेय व्यवस्थापन समिती नेमणे आवश्यक असते. याची कालावधी दोन वर्ष असणे आवश्यक आहे.

- शालेय व्यवस्थापन समितीमध्ये 75% सदस्य पालकांमधून असतील.
- 25% सदस्यांमध्ये खालील विभाजन आहे.
- एक तृतीयांश सदस्य स्थानिक अधिकारी निर्वाचित सदस्यांमधून एक तृतीयांश सदस्य शाळेतील अध्यापकांमधून, उर्वरीत 'सदस्य स्थानिक शैक्षणिक कार्यकर्ते' आणि विद्यार्थ्यांमधून असतील ज्यांची नेमणूक समितीतील नियुक्त पालक करतील. समितीच्या भूमिका पुढीलप्रमाणे :

**विद्यार्थ्यांच्या अधिकारांचे रक्षण**

विद्यार्थ्यांचे काही महत्त्वर्पू अधिकार असून त्याची सुरक्षा अनिवार्य आहे.

- जीवन जगण्याचा अधिकार
- अभिव्यक्ति संदर्भातील अधिकार
- आरोग्य आणि विकासाचा अधिकार
- गैरवापर आणि शोषण संबंधी सुरक्षा अधिकार
- शिक्षणासाठी समान संधीचा अधिकार
- दर्जा आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार
- संस्कृती व वारसा.
- गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अधिकार
- किमान मूलभूत सुविधांचा अधिकार
- पुस्तके, फळा, विज्ञान प्रयोग शाळा
- युनिफॉर्म, पोषण आहार, पुस्तके मोफत
- करमणूक केंद्र

शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या अधिकारांची पूर्ती करण्याचे दायित्व शिक्षक, मुख्याध्यापक तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे असेल.

**शालेय व्यवस्थापन समितीद्वारे शालेय विकास योजनेची निर्मिती :**

शालेय व्यवस्थापन समिती आर्थिक वर्षाच्या शेवटी कमीत कमी तीन महिने अगोदर एक शालेय विकास योजना तयार करेल. ही योजना तीन वर्षे कालावधीपर्यंत चालेल आणि यामध्ये तीन वार्षिक उपयोजना असतील. या योजना पुढीलप्रमाणे :

- प्रत्येक आर्थिक वर्षासाठी वर्गानुसार मापनोंदणीचे नियोजन
- भरती होणारे अतिरीक्त शिक्षक त्यामध्ये मुख्याध्यापक विषयानुसार शिक्षक तसेच पार्ट टाईम काम करणारे शिक्षकांचा समावेश असेल हे सर्व वर्गानुसार आणि निर्धारीत मापन दंडाअनुसार होईल.

- अतिरीक्त आधारीत सोयीसुविधा आणि आवश्यक उपकरणांचे निर्धारणमापनदंडानुसार होईल.
- तीन वर्षासाठी प्रतिमहिना आवश्यक वित्तीय नियोजन
- शिक्षकांना विशेष प्रशिक्षण देण्यासाठी वित्तीय नियोजन
- विद्यार्थ्यांसाठी मोफत पुस्तके गणवेश, स्टेशनरी इ.साठी वित्तीय नियोजन

**सरकारी विभागाच्या संदर्भात शालेय व्यवस्थापन समिती भूमिका :**

शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार प्रत्येक बालक शाळेत जाणे अनिवार्य आहे. म्हणजेच बालकामगारी मिटवणे होणे. शिक्षणाचा अधिकार अधिनियमाअंतर्गत समोवशित शिक्षणाच्या माध्यमातून शालेय व्यवस्थापन समिती सर्व अनुसुचित जाती/जमाती शैक्षणिक दृष्ट्या अप्रगत वर्गाशी संबंध प्रस्थापित करेल जेणेकरून त्यांना त्यांच्या हक्काच्या सुविधा उपलब्ध करून देता येतील.

शालेय व्यवस्थापन समितीला त्या सर्व सरकारी विभागांसोबत काम करावे लागेल ज्यांचा संबंध वंचित विद्यार्थ्यांचे शिक्षण विकसित करण्यावर भर असेल. त्यामुळे विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाचे समान संधी उपलब्ध करून देता येतील.

अशा प्रकारे गरीबी निर्मुलन कार्यक्रमात गती आणण्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीला ग्रामीण विकास विभाग तसेच पंचायत राजसोबत काम करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे घरकाम व मजदूरी करणारे विद्यार्थी शाळेत येवू शकतील. शालेय व्यवस्थापन समितीस पंचायत राज व्यवस्थेला शिक्षणाचा अधिकार अधिनियम अंतर्गत आपले काम पूर्ण करण्याचे सुनिश्चित करणे गरजेचे आहे.

बालक अधिकारांतर्गत शारीरिक शिक्षा आणि छळ यापासून सुरक्षा यांचा समावेश होतो. तसेच शालेय व्यवस्थापन समितीने बालक अधिकारांच्या राष्ट्रीय/राज्य आयोगांशी जवळीक साधावी आणि त्यांना सहाय्यता करावी. याप्रमाणे महीला आणि बालकल्याण विभागाने सहाय्यता करून बालकांना दूर्व्यवहारापासून सुरक्षा मिळावी यासाठी सहाय्य करावे.

**तुमची प्रगती तपासा 6**

1) शाळेमध्ये बालक अधिकाराच्या सुरचनेसाठी कोण जबाबदार आहे?

2) शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्यांचे कार्य काय आहे?

3) शालेय व्यवस्थापन समितीची जबाबदारी कोणती आहे?

4) ते सरकारी विभाग कोणकोणते आहेत त्यासोबत समिती बालक अधिकारांची सुरक्षा करण्यासाठी काम करतात?

## 7.5 शालेय व्यवस्थापनाअंतर्गत शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 (RTE-ACT)

शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 च्या अनुसार प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाअंतर्गत (यु. ई. ई.) शाळेच्या काही जबाबदाऱ्या असतात. सरकारी शाळेव्यतिरिक्त प्रत्येक शाळा जिची स्थापना या अधिनियमाच्या लागू येण्याअगोदर तीन महिन्याच्या आत संबंधित जिल्हाअधिकारी यास फॉर्म क्रमांक 1 वर खालील मापनदंड किंवा अटींच्या पालनासंबंधी घोषित करेल की,

क) शाळा ज्या संस्थेद्वारे चालविली जात आहे जी संस्थांची नावनोंदणी अधिनियम 1860 च्या अधीन कार्य करते आणि एक सामाजिक संस्थेद्वारे चालविली जात असून त्याची संविधानिक स्वरूपात स्थापना केली आहे.

ख) शाळा कोणतीही व्यक्ती व्यक्तिसमुह संघ अथवा इतर व्यक्तिंना लाभ मिळविण्याच्या दृष्टीने चालविली जात नाही.

ग) ही शाळा भारतीय संविधानातील निर्धारीत मुल्यांनुसार चालविली जात आहे.

घ) शाळेची इमारत तसेच इतर बांधकाम, मैदान यांचा वापर शैक्षणिक कौशल्य विकासासाठी करण्यात येतो.

ड) शाळेची तपासणी कोणत्याही राज्य सरकार निर्धारीत अधिकारी वा स्थानिक प्रशासन अधिकारीद्वारा केली जाऊ शकते.

च) शाळेतील आवश्यक सुविधा नियमावलीप्रमाणे आहेत.

छ) शाळा वेळोवेळी जिल्हा शिक्षण अधिकाऱ्याद्वारे मागितलेल्या सूचनेसंबंधी अहवाल सादर करत असते आणि राज्य सरकार वा स्थानिक प्रशासनाद्वारे निर्धारीत मुल्यांचे पालन करून शाळा मान्यतेच्या अटींची पूर्तता करत असते आणि शाळेच्या संचालनात येणाऱ्या कमतरतेची उणीव भरून काढण्याचा प्रयत्न करत असते.

शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 चे कलम भाग IV कलम 7 (1, 2, 3) अंतर्गत जर कोणते सरकार, सहाय्यता प्राप्त अथवा गैर सहाय्यक प्राप्त सरकारकडून मान्यता मिळवू इच्छित असेल तर, त्यास समाजातील गरीब आणि सुविधावंचित समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा लागेल. जर कोणतीही शाळा असे करत नसेल तर त्यास सुचित करून मान्यता रद्द केली जाऊ शकते. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे या विद्यार्थ्यांसोबत असामान्य वर्तवणूक करता कामा नये तसेच सर्वांप्रमाणे समान शिक्षण देण्यात येईल. त्यांच्यासोबत कोणताही पक्षपातीपणा होणार नाही. जसे, सुविधा प्राप्तीचा हक्क, मोफत पुस्तके, गणवेश, ग्रंथालय, क्रीडा, ICT सहशालेय उपक्रम यात भेदभाव करणार नाही.

काही राज्य सरकार / स्थानिक प्रशासनाने काही विशिष्ट वर्गातील विद्यार्थ्यांसाठी हजेरी भत्ता देण्याची योजना केली आहे. यामध्ये वंचित गटातील विद्यार्थीनी, दुर्बल वर्गातील विद्यार्थी वंचित विद्यार्थी यांचा समावेश केला जातो.

शाळेकडून ही अपेक्षा आहे की, एन. सी. टी. ई., एन. सी. ई. आर. टी. ने निर्धारीत केलेल्या अर्हताप्राप्त प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. तर एखादी शाळा प्रशिक्षित शिक्षक नियुक्त करत नसेल तर त्यांची मान्यता रद्द करण्यात येते. जर एखादे राज्यात पर्याप्त संख्येत शिक्षक प्रशिक्षण संख्या नसतील आणि अर्हताप्राप्त शिक्षक उपलब्ध नसतील तर तेवढ्या शिक्षकांची आवश्यकता आहे तेवढ्यांची संख्या राज्य सरकार केंद्र सरकारला शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 लागू झाल्यानंतर या आशयाचे प्रार्थना पत्र पाठवावे लागते. अशा परीस्थितीत केंद्र सरकार निर्धारीत अर्हता अटींमध्ये काही प्रमाणात सुट देण्याचा विचार करू शकते. या अटीअंतर्गत नियुक्त

शिक्षकांना पाच वर्षाच्या आत शैक्षणिक अधिकाराद्वारा निर्धारीत निम्नतम अटींना प्राप्त करावे लागते. या अटी त्या शिक्षकांना पण लागू होतात जे शिक्षणाचा अधिकार अधिनियम लागू होण्याच्या वेळी निर्धारीत अर्हतेअटीस पूर्ण करत नाहीत.

**तुमची प्रगती तपासा 7**

1) शिक्षणाचा अधिकार अधिनियम अंतर्गत कोणत्याही खाजगी शाळेस मान्यता प्राप्त करण्यासाठी कोणत्या अटींची पूर्तता करावी लागते?

2) कोणत्याही खाजगी शाळेकडून सुविधा वंचित विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची अपेक्षा का करण्यात येते?

3) कोणतीही एखादी शाळा कोणत्याही विद्यार्थ्यास प्रवेश देण्यास मनाई करू शकते का?

4) कोणत्याही प्रशिक्षित / अर्हताप्राप्त शिक्षकाची नियुक्ती का करण्यात येते?

## 7.6 प्रभावी व्यवस्थापन आणि क्षमता निर्मितीसाठी नेटवर्कींग (जाळे)

संयुक्त राष्ट्रीय विकास कार्यक्रम (UNDP) च्या अंतर्गत क्षमतेची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे. व्यक्ती, संस्था, आणि संघटनांना प्रक्रिया पूर्ण करणे, समस्या निर्मूलन आणि उद्दिष्ट निर्धारीत करणे तसेच त्यांना प्राप्त करणेच्या योग्यतेला क्षमताअसे म्हटले आहे.



क्षमता निर्मिती किंवा क्षमता विकास असे शब्द मानव आणि संस्थात्मक क्षमता निर्मिती करण्यासाठी वापरले जातात.

क्षमता निर्मितीसाठी उपयुक्त उदाहरण, जे प्रामुख्याने विकसनदेशाशी सुसंगत आहे, ते आहे पाणी, शेती, पोषण, आरोग्य इ. क्षेत्रशत कार्यरत प्रतिनिधींना प्रशिक्षण देणे वेगवेगळ्या संस्था वा संघटना जसे स्थानिक लोकसमुदाय, क्षमता निर्मिती कार्यक्रमाचे महत्त्वपूर्ण संप्रेरके आहेत आंतरीक व्यवस्थापन संरचना माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाची पोहोच (आकलन) तसेच नेटवर्किंगचे संस्थात्मक क्षमता निर्मिती करणे आवश्यक आहे.

Notes

### 7.6.1 प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरणासाठी व्यवस्थापनासाठी माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) :

माहिती आणि संप्रेणण तंत्रज्ञान हे असे तंत्रज्ञान आहे की ज्याचा वापर यु. ई. ई च्या प्रभावी हस्तांतरणासाठी माहिती प्रदान निर्माण करणे. साठवणूक करणे, व्यवस्थापन तथा विनियोग करण्यासाठी उपयोग करण्यात आला. शाळा नेटसाठी वापरकर्त्यांना ऑनलाईन संप्रेषण करणे, मदत तसेच विनियोग (आदान-प्रदान) करण्याची क्षमता विशेषत्वाने महत्त्वाची आहे. ह्या संदर्भात माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानचा संकेत संगणक, संगणक जाळे, इंटरनेट/आंतर जाल, टेलीफोन, दूरदर्शन, आकाशवाणी आणि दृक श्राव्य उपकरणे आणि इतर असे साधने त्यांचा वापर आंतरजालाशी संबंधित योग्य साधनांमध्ये होतो. ज्या व्यक्ती माहिती आणि संप्रेण तंत्रज्ञानाशी विविध क्रियाकल्पांद्वारे सामिल होवू शकतात, तेच या साधनांचा वापर करू शकतात. असे समजले जाते की, माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान संबंधी आवश्यक संरचना आणि उपकरणाची उपलब्धता असूनदेखील बऱ्याचश्या व्यक्तींचे शिक्षण होवू शकत नाही. किंवा त्यांचा वापर कसा करणे हे माहिती नाही. माहिती आणि संप्रेषणाच्या तंत्रज्ञानास डिजिटल डिव्हाइस ही संज्ञा दिली जाते.

माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचे तीन चालक (ड्राइव्हर) आहेत. (1) भाषा - (अशा भाषेचा उपयोग ज्याचा वापर व्यापक स्वरूपात आंतरजालासाठी केला जातो.) सीरता (विशेषता अध्ययन संस्कृती) अधिगम (शैक्षणिक उपलब्धी स्तर) असे होय. ज्ञान समाज, आर्थिक विकास आणि संपन्नतेसाठी शिक्षण हे एक महत्त्वाचा घटक आहे. शिक्षण केवळ साधन नसून त्याद्वारे व्यक्ती समाज आणि अर्थव्यवस्थेत योग्य भागीदार बनता येते. माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाच्या वापराच्या प्रसारामध्ये हा पण एक मुख्य चालक आहे. माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाच्या विकास असे वातावरण करेल ज्यामध्ये व्यक्ती ज्ञानाची भागीदारी करू शकतील आणि ज्या ज्या व्यक्तिंना हे ज्ञान मिळेल. त्यांचा ज्ञानात्मक विकास अधिक होईल.

माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा उपयोग शिक्षणाशी संबंधित अनेक समस्यांचे निराकरण करण्यासाठी होवू शकतो जसे - शालेय प्रशासन व अध्यापन कौशल्य वाढविणे, काही विशिष्ट क्षेत्रांत (पाठ्यपुस्तक, शिक्षकांसाठी अध्यापनयुक्त सादन सामुग्री) संसाधनांचा विकास नाविन्य पूर्ण अध्यापन पद्धतींचा स्विकार करण्यासाठी सज्ज शिक्षकांना अध्यापनासंबंधी नवीन आव्हानांचा सामना करण्यासाठी केला जावू शकतो.

### 7.6.2 शाळा जाल (नेट) म्हणजे काय?

शाळा नेट अनेक शाळांच्या इंटरनेटला जोडून प्राथमिक शिक्षणासाठी एक माहिती प्रणाली तयार करण्यासाठी प्रोत्साहन देते, ज्याच्या माध्यमातून विविध विद्यार्थी, शिक्षक शाळा, प्रशासनातील घटक / संस्था, पालक आणि सामान्य लोक एकमेकांशी जोडले जातात आणि माहितीच्या साधनांचे आदान प्रदान (देवाण घेवाण) केली जाते. याप्रकारे हे नेटवर्कशी संबंधीत शैक्षणिक संस्थाच्या कौशल्यपूर्ण वा प्रभावी व्यवस्थापनास मदत करते. थोडक्यात स्कूल नेट शैक्षणिक, प्रणाली, शाळा, शिक्षक, पालक, लोक समुदाय आणि व्यापक शैक्षणिक संसाधनांचे जाळे आहे. स्कूल नेट हा शब्द आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वीकृत संज्ञा असून ज्याचा संबंध शालेय शिक्षण प्रशासन तंत्राची माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान आधारीत इ. व्यवस्थापन एक संघटनात्मक रूपात विविध स्वरूपात अस्तित्वात आहे. स्कूल नेट एक कोणत्याही सरकारी विभागातील स्थापित कार्यक्रम असून हा खाजगी संघटन किंवा खाजगी कंपनी अथवा खाजगी शाळेत असू शकते हे कोणत्याही कोपऱ्यातील संबंधीत व्यक्तीला यु. ई. ई. च्या संदर्भात माहिती प्राप्त करण्यामध्ये सक्षम बनवते. दुसऱ्या शब्दात स्कूल नेट एक राष्ट्रीय राज्यस्तरीय कार्यक्रम असून ज्याचा हेतू शाळेमध्ये माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर विकसित करण्यासाठी केला जातो.

प्रामुख्याने स्कूलनेट संस्थांना एकत्रित करणे, शैक्षणिक माहिती तंत्राच्या व्यवस्थापनावर नियंत्रण आणि प्रभावी शैक्षणिक सेवा देण्यासाठी माहितीची आधार प्रणाली तयार करते. तसेच जर माहिती संप्रेषण तंत्रज्ञनाचा प्रभावीवापर करावयाचा असेल तर विविध सरकारी विभागांमध्ये सुगमरीतीने सहाय्यता देण्यासाठी राष्ट्रीय सहाय्यतेची आवश्यकता पडेल.

### 7.6.3 स्कूल नेटचे कार्य / सेवा

**तंत्रज्ञानात्मक सेवा / कार्य :**

- जोडणी (कनेक्टीविटी) संबंधी सेवांसाठी सरकारी अधिकाऱ्यांसाठी तसेच सामान्य लोकांसाठी इंटरनेट सर्व्हिस प्रोवाइडर (ISP) कार्य करते आणि विविध संघटनांची भागीदारी सुगम बनवते.
- शाळेच्या उपयुक्त संसाधनांची पूर्तता करणे.
- शाळेमध्ये शिक्षण देण्यासंबंधी व्यवस्थापनासाठी उपयुक्त सॉफ्टवेअर सोलूशन विकसित करणे.

**विषयवस्तूसंबंधी कार्य :**

- शिक्षक विद्यार्थ्यांना उपयुक्त आंतरजाल संबंधित माहिती देण्यासाठी पोर्टल साहय्य बनवणे
- विशेष तंज्ञांद्वारे मुळतत्त्वावर व्यावसाकि स्तरावर आशय वस्तूंचा विकास करणे.

**सहयोगात्मक प्रकल्प :**

- ऑनलाईन प्रकल्पांमध्ये विविध संसाधन केंद्राचा समावेश वा सहयोग सहज बनवणे.
- देश पातळीवर सहयोगात्मक प्रकल्पांचे संचालन तसेच आराखडा बांधणी करणे.

**व्यावसायिक विकास :**

- अध्यापन आणि शिक्षणातील माहिती संप्रेण तंत्रज्ञानाचा वापर करून माहिती संप्रेषण तंत्रज्ञान कौशल्यांचे शिक्षकांना सेवाकालीन प्रशिक्षण देणे.

**संशोधन नाविण्यपूर्णता / समर्पन :**

- विविध वातावरण / परीस्थितीवर आधारीत प्रायोगिक प्रकल्प
- अध्यापनासंबंधी सर्वोत्तम पद्धतींचा विकास वा प्रचार-प्रसार करणे.
- शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या वापरात नाविण्यता आणण्यासाठी प्रोत्साहन देणे.

**शाळा वा संसाधन व्यवस्थापन :**

- निर्णय प्रक्रियेसंबंधी माहितीचे आदान प्रदान करणे.
- योजना निर्धारीत करण्यासाठी माहितीची देवाण-घेवाण करणे.

### 7.6.4 स्कूल नेट एक शैक्षणिक व्यवस्थापन प्रणालीच्या स्वरूपात

माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाच्या शाळेची इत शाळांपेक्षा माहिती साठवणूकीच्या वेगामध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करू ाकते. आणि प्रशासनात लागणारे श्रम कमी करू शकते. असे बरेच माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान तसेच प्रणाली आहेत ज्या प्रशासनीय कार्यात कमी करण्याचा प्रयत्न करतात.

जेव्हा शाळा स्कूल नेटमध्ये प्रवेश करते तेव्हा बऱ्याच गोष्टींमध्ये परीवर्तन दिसून येते. माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान कौशल्य अंतर्गत बरेच कौशल्य येतात. जसे ईमेल पाठवणे. उच्च स्तरीय कौशल्य विविध प्रकारच्या स्त्रोतांना माहिती पुरविणे व विकास. त्यांचे मूल्यमापन करणे, विश्लेषण वा

Notes

संश्लेषण करण्याची योग्यता असणे. या सर्व उच्च स्तरीय कौशल्यांचा प्रयोग व्यवस्थापन संबंधी सर्व क्षेत्रात केला जातो.

## 7.7 आर्थिक व्यवस्थेसंबंधी आराखडा

सर्व शिक्षा अभियानाच्या संचालनासाठी भारत सरकारने जागतिक बँक, यु. के. सरकार इ. चे विकासात सहाय्यता मिळविली आहे. तसेच विविध योजनांना सहाय्यता देण्यासाठी आनुदानाचे वितरणात सर्व कायदेशीर बाबींचे पालन करावे लागेल. याचा अर्थ असा की आंतरराष्ट्रीय स्तरावर देणग्या प्राप्त करण्यासाठी शाळा पातळी, गाव, गट जिल्हा, राज्य पातळीवर कार्याचा अहवाल आणि खर्चाचा वित्तीय अहवाल वेळेवर द्यावे लागेल.

**खर्च वितरणाची व्यवस्था :** सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत उपयुक्त खर्च वितरणाच्या व्यवस्थेवर आधारीत होती. केंद्र आणि राज्य सरकारमध्ये हे गुणोत्तर आधार नववी पंचवार्षिक योजनेमध्ये 85 : 15 होती, दहावी पंचवार्षिक योजनेत 75 : 25 आणि त्यानंतर याचा आधार 50 : 50 करण्यात आला होता. राज्य सरकारकडून ही अपेक्षा होती की ते यु. ई. ई. च्या वित्त व्यवस्थेकडे अधिक जबाबदारी घेतील. राज्य सरकारकडून खर्च वितरणासाठी अहवाल लिखित स्वरूपात घेतला जातो.

**राज्य कार्यान्वयन सोसायटी :** राज्य सरकारसाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी राज्य कार्यान्वयन सोसायटीला एक धर्मादाय सोसायटीच्या रूपात नोंदणी करणे अनिवार्य आहे. भारत सरकार या प्रकारच्या अनुदान केवळ राज्य सरकार संघीय क्षेत्रांना देते. राज्य सरकार अनुदानाचा दुसरा हिस्सा हा या अगोदर राष्ट्रीय वा राज्य सरकार प्राप्त हिस्सा राज्य कार्यान्वयन सोसायटीत स्थानांतरीत झाल्यावर देईल. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत नियुक्त शिक्षकाचे वेतन केंद्र वा राज्य सरकार उपयुक्त घटकात विभाजित करते.

प्राथमिक शिक्षणातील राष्ट्रीय पोषण सहाय्यता कार्यक्रम (मध्यान्ह भोजन) हे सर्व शिक्षा अभियानाचा भाग नाही. या कार्यक्रमात खाद्यान्न आणि त्याचा प्रवास खर्च केंद्र सरकार देते तसेच भोजन बनविण्याचा खर्च राज्य सरकारकडून मिळतो. केंद्र सरकारचे प्राथमिक शिक्षणासंबंधी उर्वरीत सर्व योजना नवव्या पंचवार्षिक योजनेनंतर सर्व शिक्षा अभियानात समावेश करण्यात आला. (राष्ट्रीय बाल भवन व NCTE व्यतिरीक्त) जिल्हा शिक्षण योजनांना विविध योजनांअंतर्गत उपलब्ध निधी / संसाधनाची स्पष्ट माहिती देणे अनिवार्य आहे. या योजना प्रधानमंत्री ग्रामोद्योग योजना, जवाहर ग्रामीण समिती योजना, सुनिश्चित रोजगार योजना, राज्य योजना, विदेशी निधी (असेल तर) सर्व स्त्रोतांकडून प्राप्त निधी शाळेमध्ये सुधारणा घडवून आणणे. इमारतीची देखभाल, डागडुजी, करण्यासाठी होईल. अध्ययन-अध्यापन सामग्री आणि स्थानिक शासनाच्या क्षमता निर्मितीला ग्रामीण शिक्षण समिती/शालेय व्यवस्थापन समिती, ग्रामीण पंचायत इ. ना स्थानांतरीत करावे लागेल. प्राप्त निधीचा योग्य निकषाद्वारे सर्वाधिक वापर करणे हे या संस्थेचे कार्य आहे.

**तुमची प्रगती तपासा 8**

1) केंद्र व राज्य सरकारची UEE च्या खर्चाबाबतच्या तरतुदी कोण त्या?

2) UEE हा खर्चाच्या तरतुदी उदाहरणासह लिहा.

Notes

**तुमची प्रगती तपासा 9**

1) यु. ई. ई. मध्ये केंद्र आणि राज्य सरकारमधील वित्तीय जबाबदारी विकरणाचा आराखडा सांगा.

**क्रियाकल्प 1**

- आपल्या शाळेत अल्पसंख्याक वर्गातील मुलींची नावनोंदणी वाढविणे आणि त्यांना शाळेत कायम येण्यासाठी एक योजना तयार करा.

**क्रियाकल्प 2**

- उपर्युक्त क्रियेसाठी बजेट तयार करा.

- तुम्ही ही योजना आणि त्याचे बजेट कोणाकडे सुपूर्त कराल?

## 7.8 सारांश

या प्रकरणात आपण शिक्षणाचा अधिकार अधिनियम अंर्गत यु. ई. ई. च्या कार्यान्वयास विकेंद्रीकृत केले आहे. तसेच या पाठात आपण जिल्हा, गट, गाव आणि शाळा स्तरावर सूक्ष्म नियोजनातून काय अपेक्षित आहे ते शिकलो. सूक्ष्म स्तरावर शिक्षण विकास योजना कोण तयार करू शकतात, शिक्षण विकास योजनेची घटक कोणते असतील. या योजनेचे मुल्यनिर्धारण म्हणजे काय आणि याला कसे अनुमोदन घेतले जाते. आणि या योजनेच्या कार्यवाहीची तपासणी कोण करतील हे आपण अभ्यासले.

या व्यतिरिक्त आपण प्राथमिक शिक्षणाचे विकेंद्रिकृत व्यवस्थापनामध्ये प्रशासनासंबंधी समस्यांचे अध्ययन केले आहे. तसेच खाजगी अनुदानित विनाअनुदानित प्राप्त शाळेला मान्यता कोण देते याची प्रक्रिया कोणती आहे. जसे की शिक्षणाचा अधिकार अधिनियमात निर्धारीत केलेले आहे.

या प्रकरणात कोणत्याही बालकाला शाळेत प्रवेश देण्यासाठी मनाई करता येणार नाही. विद्यार्थ्यांच्या अधिकारांची सुररक्षेस कोण जबाबदार आहे. प्रकरणाच्या उत्तरार्धात माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचे उपयोगातून स्कूल नेट वर्किंग कशाप्रकारे राष्ट्रीय, राज्य, जिल्हा, खंड आणि शालेय स्रावर प्राथमिक शिक्षणाची अधिक उत्तम क्षमता निर्मिती आणि व्यवस्थापनासाठी सहाय्यक ठरू शकते. तसेच प्राथमिक शिक्षणाच्या अनुदानाबाबत या वित्तीय आराखड्याबाबतचा देखील अभ्यास केला आहे.

Notes

## 7.9 संदर्भ

**Education planning and management in small states: concepts and experiences.**

By Godfrey Baldacchino, Charles Farrugia. Commonwealth Secretariat

**A comprehensive Study of Education -** By S. Samuel Ravi

http://ssa.ap.nic.in/

http://en.wikipedia.org/wiki/Sarva_Shiksha_Abhiyan

http://www.educationforallinindia.com/page112.html

http://scertdelhi.info/

## 7.10 प्रकरण अभ्यास

1. सूक्ष्म नियोजन म्हणजे काय? आपल्या क्षेत्रात लोक समुदाय स्वामित्वाच्या संदर्भात विवेचन स्पष्ट करा.
2. आपल्या जिल्ह्यात BRC व CRC यांचे प्राथमिक शिक्षणाबाबत त्यांच्या भूमिका आणि जबाबदारी विशद करा.